# प्रथम वर्ष कला

## सत्र - II (CBCS)

## तत्त्वज्ञान अभ्यासपत्रिका क्र. - I

# नैतिक तत्त्वज्ञान

## विषय कोड : UBA 2.26

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि
प्रमुख कला शाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. साहेबराव निगळ**
निवृत्त प्राध्यापक,
तत्त्वज्ञान विद्यापीठ, पुणे

**लेखक :** : **प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे

: **डॉ. सुगीता पांडे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय, बदलापूर,

: **डॉ. सुनीलदत्त गवरे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
शिवळे महाविद्यालय, शिवळे

: **डॉ. नारायण गडदे**
तत्त्वज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **डॉ. ऋता वैती**
तर्कशास्त्र विभाग,
शासकीय विधी महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई

**फेब्रुवारी २०२१, मुद्रण - १**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
**व मुद्रण** विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र - २** | |
| १) | स्वहितवादी नैतिकता (स्वहितार्थवादी नैतिकता) | ०१ |
| २) | आधुनिक नैतिक उपपत्ती | १५ |
| ३) | पर्यायी नीतिशास्त्रीय उपपत्त्या | ४२ |
| ४) | शिक्षेच्या उपपत्त्या | ५५ |


❖❖❖❖

## Semester - II

**Unit 1: Morality of Self-interest [ 15 lectures]**

(a) Hedonistic Egoism: Epicurus

(b) Psychological Egoism: Thomas Hobbes

(c) Ethical Egoism: Ayn Rand

**Unit 2: Modern Ethical Theories [ 15 lectures]**

(a) Ethics of altruism: David Hume: nature and origin of morality: sentiment (sympathy) versus reason; Virtues: artificial and natural

(b) Deontological Ethics: Immanuel Kant: Categorical Imperative: formula of Universal law and formula of End-in-itself, critical appraisal.

(c) Utilitarianism: John Stuart Mill: Critique of Jeremy Bentham's view; Greatest Happiness principle, higher and lower pleasures, two sanctions, critical appraisal.

**Unit 3: Alternative Ethical Theories [15 lectures]**

(a) Augustinian Ethics: Happiness and Virtue, love of God and neighbour

(b) Feminist Ethics: Ethics of Care: Carol Gilligan (against the backdrop of Lawrence Kohlberg's 'Stages of Moral Development')

(c) Existentialist Ethics: Jean Paul Sartre

**Unit 4: Theories of Punishment [15 lectures]**

(a) Retributive theory, critical appraisal

(b) Deterrent theory and reformative approach to punishment; critical appraisal

(c) Capital punishment: retentionists versus abolitionists

❖❖❖❖

विभाग-२

# घटक -१

# स्वहितवादी नैतिकता (स्वहितार्थवादी नैतिकता)

**घटक रचना :**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ एपिक्युरिअन्स स्वार्थ सुखवाद

१.२.१ सुखाच्या मार्गातील सुखवाद

१.३ थॉमस हॉब्ज यांचा मानसशास्त्रीय स्वहितवाद

१.३.१ नीतिशास्त्र व मानवी स्वभाव

१.३.२ आत्मरक्षण व आत्महित

१.३.३ सामाजिक करार

१.३.४ मूल्यमापन

१.४ नीतिशास्त्रीय स्वहितवाद किंवा स्वहितवादी नीतीमत्ता

१.४.१ आयन् रँड यांचा नैतिक स्वहितवाद

१.४.२ ज्ञानाचे साधनमूल्य

१.४.३ मूल्यमापन

१.५ सारांश

१.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न


## १.० उद्दिष्टे

१) स्वहितवादी नीतिशास्त्राचे आकलन करुन घेणे.

२) एपिक्युरिअन्स स्वार्थ सुखवाद जाणून घेणे.

३) थॉमस हॉब्ज यांचा मानसशास्त्रीय स्वहितवाद व श्रीमती आयन् रँड यांचा नीतिशास्त्रीय (नैतिक) स्वहितवाद समजून घेणे.

४) बद्धिनिष्ठ स्वहित व स्वार्थत्यागमूलक नीती यांतील फरक जाणून घेणे.

५) स्वहितवादी नीती विरुद्ध केवळ परहितवादी नीती यांच्यातील फरक जाणणे म्हणजेच स्वार्थवादी नीती व परार्थवादी नीती समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

स्वहितवाद ही एक नीतिशास्त्रीय ध्येयाची व मूल्यांची मीमांसा करणारी अर्वाचीन काळातील विचारप्रणाली आहे. स्वहितवादी नैतिकता किंवा स्वहितार्थवादी नीतिमत्ता हे स्वहितवादी नीतिशास्त्राचे दुसरे नाव होय. स्वहितवादाचे दोन प्रकार आहेत. १) मानसशास्त्रीय स्वहितवाद (Psychological Egoism) २) नीतिशास्त्रीय स्वहितवाद (Ethical Egoism)

मानसशास्त्रीय स्वहितवादानुसार माणूस हा स्वभावतः स्वतःच्या हितासाठी प्रयत्नशील असतो. तो स्वतःच्या इच्छा आकांक्षा यांच्या पूर्तीसाठी झटत असतो. अर्थात माणूस स्वभावतः स्वार्थी असतो. ब्रिटिश तत्त्वज्ञ थॉमस हॉब्ज (इ.स. १५८८ते १६७९) हा मानसशास्त्रीय स्वहितवाद या मताचा आग्रही पुरस्कर्ता होता. नीतिशास्त्रीय स्वहितवादानुसार माणूस स्वभावतः स्वार्थी आहे की नाही? हे महत्त्वाचे नाही. तो स्वभावतः केवळ स्वतःचेच हित साधतही नसेल. परंतु त्याने बुद्धिनिष्ठ स्वहितवादी असावे. स्वतःच्या बुद्धिनिष्ठ हितासाठी त्याने प्रयत्नशील असावे. अमेरिकन विदुषी श्रीमती आयन् रँड (इ.स. १९०५ ते १९८२) या नैतिक स्वहितवादाच्या आग्रही पुरस्कर्त्या होत्या. त्या आग्रहपूर्वक सांगतात की बौद्धिक स्वार्थ हा सद्‌गुण आहे.

## १.२ एपिक्युरिअन्स स्वार्थ सुखवाद

एपिक्युरिअनचा जन्म ख्रि. पू. ३४१ मध्ये आशियामायनर मधील सामोस येथे झाला. तो गार्गेटसचा रहिवासी असल्याने त्याला 'गार्गेटसचा मुनी' म्हणतात. एपिक्युरचा आदर्श प्रज्ञानी (शहाणा मनुष्य) हा विषय भोगी, हावरा, व्यसनासक्त असा उथळ प्रवृत्तीचा नसून तो तृप्त, शांत, समाधानी, प्रसन्न, अक्षुब्ध, अनुद्विग्न, स्वस्थ व आराम अनुभवणारा सुखी मनुष्य असतो. त्याचे सुख किंवा आंतरिक समाधान, तृप्ती, संतोष व प्रसन्नता ही बाह्य जगतातील गोष्टींवर अवलंबून नसतात. ती बाह्य जगाच्या प्रभावापासून मुक्त व स्वतंत्र असते.

एपिक्युरसने पदार्थ विज्ञानात सर्व अस्तित्वाचा आधार अणू असतात असे ज्याप्रमाणे घोषित केले आहे. त्याचप्रमाणे सर्व कृतींचे लक्ष्य मानवी व्यक्ती असते असे त्यांने सांगितलेले आहे. जगातील चांगली व वाईट, शिव व दुरित यांचे मूल्यमापन करण्याचे प्रमाण व निकष माणसाचे 'भव' (feelings) असतात असे त्याचे मत आहे. सर्व माणसे जर कोणत्या एकाच ध्येयासाठी, एकाच उद्दिष्टासाठी धडपडत असतील तर ते म्हणजे सुख प्राप्ती होय; आणि माणसे जर सतत काही टाळत असतील तर ते म्हणजे दुःख होय. म्हणजे ॲरिस्टिपसप्रमाणे एपिक्युरस सुखाला जीवनाचे खरे व अंतिम ध्येय समजतो व दुःखाला दुरित समजतो. जीवनात जर कशाचा माणसाने सतत पाठपुरावा करावयाचा असेल तर तो शुद्ध, टिकाऊ व शांतिप्रदान करणाऱ्या सुखाचा होय असे एपिक्युरसचे मत होय. म्हणून आधुनिक परिभाषेत बोलायचे झाल्यास एपिक्युरस हा स्वसुखवादाचा किंवा स्वकेंद्रित सुखवादाचा (Egoistic Hedonism) पुरस्कर्ता आहे. एपिक्युरस हा सायरेनिक पंथाचा संस्थापक ॲरिस्टिपस याच्याशी 'सुख हेच शिव' या मताशी सहमत आहे. म्हणजे एपिक्युरस सुख हे श्रेयस् किंवा शिव यांच्याशी एकरुप असते असे मानतो असे दिसते. पण हे जर खरे असेल तर आपण काही सुखांना चांगले समजून

त्यांचा स्वीकार करतो व काही सुखे हलक्या प्रतीची व वाईट म्हणून त्यांचा अव्हेर करतो; असे का होते ? सुख व श्रेयस ही जर एकच असतील तर मग मानवाच्या आयुष्यात श्रेयसच्या किंवा शिवाच्या प्राप्तीसाठी काही वेळा मानसिक संघर्षाला तोंड देऊन सुखाचा त्याग करुन शिवाचे अनुष्ठान का करावे लागते ? कोणत्याही सुखवादी भूमिकेस या प्रश्नाला तोंड द्यावेच लागणार.

प्लेटोच्या 'प्रोटॅगोरास' या संवादातील प्रवक्ता सॉक्रेटिस म्हणतो की प्रत्येक मनुष्य त्याला जे सर्वोत्तम वाटते त्याची इच्छा करतो आणि सुखासच शव किंवा श्रेयस् समजतो आणि दु:ख हे वाईट किंवा दुरित समजून ते टाळण्याचा प्रयत्न करतो. तो ज्यामुळे सुखापेक्षा अधिक दु:खच निर्माण होते असे सुख टाळतो व जे दु:ख भोगूनही अधिक सुखाची प्राप्ती होणे शक्य होते त्या दु:खाचाही स्वीकार करतो. सॉक्रेटिसच्या या भूमिकेशी एपिक्युरस सहमत होता. सुख हे सदैव चांगले व शिव असते व दु:ख हे नेहमीच वाईट किंवा दुरित असते. पण त्याचबरोबर सुखाची नेहमीच नीवड करावयाची असते आणि दु:खाचा नेहमीच त्याग करावयाचा असतो असे मात्र नाही. या भूमिकेपासून एपिक्युरस कधीही ढळत नाही. कारण अनुभवावरुन असे दिसते की काही सुखांचे परिणाम दु:खदायक असतात आणि काही दु:खाचे पर्यवसान सुखद अवस्थेत होते. म्हणून कोणतीही कृती करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी तिच्या परिणामांचे योग्य असे मूल्यमापन किंवा तुलन (weigh) केले पाहिजे.

कोणतीही कृती परिणामी किती प्रमाणात सुखद किंवा दु:खद ठरणार आहे यावरुन तिचे मूल्य ठरवायचे असते व निवड करावयाची असते किंवा तिचे बरेवाईट परिणाम लक्षात घेतल्याशिवाय तिच्याविषयी निर्णय घ्यावयाचा नसतो. हे त्याचे मत व्यवहाराच्या दृष्टीने उचितच आहे. सॅरिस्टिपस क्षणाच्या सुखाच्या मागे धावणारा आहे तर संपूर्ण जीवन सुखमय झाले पाहिजे. केवळ काही क्षणापुरता, काही प्रसंगापुरता किंवा कालापुरता सुखाचा विचार करणे अदूरदर्शित्वाचे व शेवटी अहितकारक ठरते असे एपिक्युरसचे मत आहे. म्हणून जेव्हा सुखाची पार्श्वभूमी आणि परिणाम यांचाही विचार केला जातो तेव्हा सुख एखाद्या कृतीने मिळणारे न ठरता त्याच्यासाठी अनेक कृती कराव्या लागतात. त्यांचा सारासार विचार करुन संपूर्ण जीवनाचे हित लक्षात घेऊन त्यांची रचना करावी लागते आणि क्षणभंगुर इंद्रिय सुखांच्या मोहात वाहवुन जाणे अनिष्ट ठरते असे एपिक्युरस मानतो. अर्थात यात एपिक्युरसचा मानसशास्त्रीय दृष्टिकोन व्यक्त होतो. इच्छेचा उगम गरजेतून होतो आणि अतृप्त गरज आणि क्षुधा दु:खदायक वाटते.

एपिक्युरसही मनाच्या व बुद्धीच्या सुखांना शरीरसुखापेक्षा व इंद्रिय संवेदनापेक्षा श्रेष्ठ समजतो. पण त्याच बरोबर शरीराची प्रत्यक्ष सुखे व दु:खे ही महत्त्वाची असतात. आत्म्याची सुखे व दु:खे ही केवळ वर्तमानकालीन नसतात तर भूत व भविष्यकालिन घटनांनी सुद्धा आत्म्यास सुख व दु:ख अनुभवायला मिळत असते. भीती, स्मृती, आशा इत्यादींच्या भावनांचे प्रभुत्व एवढे मोठे असते की त्या माणसाला व्यथित व दु:खी आणि आनंदी व सुखी बनवू शकतात व या दृष्टीने मनाचे शरीरावर नियंत्रण चालत असते. अत्यंत तीव्र वेदना या क्षणजीवी असतात व त्या आपल्या जीवनाचा अंतही घडवू शकतात; पण ज्या वेदना व व्यथा मंद असतात त्या बौद्धिक आनंदाच्या पुढे फिक्या पडतात व त्या मनाच्या व बुद्धीच्या आनंदाच्या अनुभवांमुळे सहनही करता येतात.

एपिक्युरस हा सुखवादी असला तरी तो सुखाची निवड करताना तारतम्य सोडावयास तयार नाही. सर्वच सुखे सारख्या दर्जाची असतात असे नाही. विषयासक्त भोगी माणसांची सुखे

ही जरी सुखे असली तरी त्यांची उच्च प्रकारच्या सुखांशी तुलना होऊ शकत नाही. केवळ सतत खाणे, पिणे, चैन करणे व विषयोपभोग होणे यामुळे जीवन सुखी होत नसते. एपिक्युरसची सुखाविषयीची दृष्टी उथळ व थिल्लरपणाचाही नाही. तो सुखाचा जरी भोक्ता व पुरस्कर्ता असला तरी ज्यायोगे चित्ताला स्थिरता, शांती, प्रसन्नता यांचा लाभ होऊन ते स्वस्थता व आनंद अनुभवू शकेल असे सुख तो महत्त्वाचे समजतो. त्याच्या मते शरीराला वेदनांपासून व आत्म्याला गोंधळापासून मुक्त करावयास पाहिजे. दुःख असो किंवा सुख असो त्याने चित्तास अस्वस्थ, अशांत व क्षुब्ध करता कामा नये अशी त्याची मुख्य अपेक्षा आहे. एखादे सुख हे काही क्षणांपुरते उत्कट व तीव्र असू शकेल; पण परिणामी ते अधिक दुःखकारक ठरु शकेल किंवा उलट एखादी शरीराची शस्त्रक्रिया सुरवातीस दुःखद व त्रासदायक असू शकेल. परिणामी ती दीर्घकालीन सुख निर्मान करु शकेल. म्हणून सुख व दुःख यांचा केवळ क्षणिक, उथळ व तात्कालिक विचार करुन भागणार नाही. त्याचा सर्व बाजूंनी साधकबाधक व संपूर्ण जीवनाच्या दृष्टीने विचार केला पाहिजे आणि ज्यायोगे अधिकात अधिक सुखाची प्राप्ती होऊ शकेल असा मार्ग चोखाळला पाहिजे.

सुखाचा विचार करण्यात मापनाची कला अनुस्यूत आहे. सुख व दुःख यांचा योग्य प्रमाणात विचार करुन मानवाने आपल्या इच्छा व आकांक्षा यांची अशी जुळणी करावी व अशा कृती कराव्या की ज्यामुळे जास्तीत जास्त प्रमाणात त्रास, वेदना, व्यथा, दुःख आणि क्षोभ टाळता येतील व अधिकात अधिक प्रमाणात सुख, स्वास्थ्य, शांती आणि प्रसन्नता यांचा आनंद अनुभवता येईल. असा हा एपिक्युरिअन नीतिविषयक दृष्टिकोन ‘सौम्य वैराग्याचा’ व विवेकी संयमाचा पुरस्कार करतो.

एपिक्युरसच्या स्वतःच्या गरजा अत्यंत कमी होत्या. तो केवळ भाकरी व पाणी यावर दिवसचे दिवस सहज राहू शकत असे त्यांचे वर्णन केले आहे. एपिक्युरसच्या माते सुखाच्या मार्गात दुःख किंवा दारिद्रय यामुळे काही आडकाठी निर्माण होत नाही किंवा जीवनातील ज्या सर्वसाधारण चांगल्या गोष्टी असतात त्या न मिळाल्याने सुखात उणीव येत नाही. पण सुख जर कशामुळे नाहीसे होत असेल तर ते मनाचा संतोष व चित्ताची शांती व समतोलता यांच्यावर परिणाम घडविणाऱ्या भीती आणि इतर चित्तक्षोभक गोष्टींमुळे मनाचा संक्षोम ज्यामुळे होणार नाही आणि चित्ताची उल्हसित वृत्ती, प्रसन्नता, शांती व स्वास्थ्य ही जिच्यामुळे टिकून राहतील अशी वृत्ती व सवय माणसाने लावली पाहिजे.

थोडक्यात माणसाने बाह्यपरिस्थितीपासून मुक्त व स्वतंत्र बनले पाहिजे. आपले समाधान व आपला आनंद यांचा उगम अंतरंगातून झाला पाहिजे व बाह्य परिस्थिती अनुकूल किंवा प्रतिकूल, चांगली किंवा वाईट कशीही असते तिच्या विषयी तटस्थ व उदासीन राहून आपली शांती, समतोलता व प्रसन्नता आंतरिक किंवा आत्मिक सामर्थ्याने टिकविली पाहिजे. थोडक्यात चित्ताचे स्वास्थ्य, संतोष व प्रसन्नता यांच्या बाबतीत माणसाने पूर्णपणे स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनले पाहिजे अशी एपिक्युरसची शिकवण आहे.

**आपली प्रगती तपासून पहा**

प्रश्न: १) एपिक्युरिअन्सचा स्वार्थ सुखवाद स्पष्ट करा.

### १.२.१ सुखाच्या मार्गातील अडचणी :

सुखवादाच्या कोणत्याही उपपत्तीचे तर्कशास्त्र हे अराजकवाद असते पण एपिक्युरस अराजकवादी नाही. कारण अराजकवाद स्वास्थ्याला व शांततेला विघातक असतो. स्वतः एपिक्युरस राजकीय परिस्थितीमध्ये कोणतीही ढवळाढवळ करण्यापासून अलिप्त राहिला. या करिता त्याच्या शिकवणीमध्ये तर्कशुद्ध उपपत्ती मांडण्याचे त्याचे उद्दिष्ट नव्हते; पण ती त्याची एक व्यावहारिक कमाई होती असे म्हणता येईल; म्हणून त्याने त्याच्या काळातील प्रत्यक्ष परिस्थितीशी जुळणारी अशी उपपत्ती बसविली व्यक्तीने या जगात धर्म आणि संस्कृती यांना जर मज्जाव केला तरच व्यक्तीस सूख लाभू शकते असे त्याने निदर्शनास आणून दिले.

एपिक्युरसच्या मते माणसाच्या ह्रदयात बसणारे दुःख आणि त्याच्या आचारातील दुष्टता यांना मुखत; धर्म कारणीभूत असतो, या जगातील दुर्दशांचे मुख्य कारण हे माणसांना चिरडून टाळणाऱ्या धार्मिक श्रद्धांची भीती ही असते. त्याच्या मते धर्म हा माणसांच्या कल्पनांना कबुषित करतो, अंधश्रद्धांवर आधारलेल्या भीतींनी तो भविष्यकाळ झोकाळून टाकतो आणि सुख आणि स्वास्थ यांना आपल्या आवाक्याच्या बाहेर नेऊन ठेवतो. प्रथमतः धर्म हा मृत्यूचे भय निर्माण करणे एपिक्युरसच्या काळात मृत्यू म्हणजे सध्याच्या जीवनाचा व टार्टारसच्या काठावर उडत्या छायांचा जो अंधुक सूर्यविहीन प्रवेश आहे त्यात जाणे असा होता. मृत्यू आणि मरणोत्तर जीवनाविषयीची धार्मिक कल्पना जर मान्य असेल तर असे तात्त्विक मन सुखी होऊ शकणार नाही असे त्याचे मत आहे.

या जगाची निर्मिती देवांनी चमत्कारपूर्ण आणि अतिनैसर्गिक रीतीने केलेली आहे, असे धर्म म्हणतो. पण शांत मनाने मात्र ईश्वराच्या चमत्कारपूर्ण आणि शक्तिसंपन्न निरिक्षणाच्या तावडीतून मुक्त झालेल्या सृष्टीवर विश्वास ठेवला पाहिजे. ही सृष्टी विश्वसनीय असली पाहिजे. शिवाय धर्म हा माणसांच्या व्यवहारामध्ये जे सदैव मग्न असतात असे देव चितारीत असतो. त्यासाठी माणसांनी पूजाअर्चा आणि यज्ञयाग करुन देवाची मर्जी संपादन केली पाहिजे व त्यांचे राग व अवकृपा टाळत राहिले पाहिजे. अशा तऱ्हेने मनुष्य आपला वेळ फुकट घालवीत असतो आणि देवांना समाधान झाले नसेल या भीतीने स्वतःची मनःशांती घालवून बसतो. एपिक्युरिअन तत्त्वज्ञानाला व्यक्तीचे जीवन घडवायचे असते. जी सर्व गोष्टीपासून मुक्त व स्वतंत्र असते अशी शांती मनुष्य शोधत असतो. पण माणसाला हव्या असलेल्या प्रगाढ आंतरिक शांतीचे हे ध्येय धार्मिक श्रद्धा व धर्मात ढवळाढवळ करणारे देव असाध्य करुन टाकतात. म्हणून एपिक्युरिअन तत्त्वज्ञानाचे मुख्य उद्दिष्ट ईश्वर जगाचे शासन करतो. यासंबधीची प्रत्येक कल्पना या जीवनातून हद्दपार करण्याचे होते. देव असतात पण ते माणसांपासून पूर्णपणे दूर राहतात. त्यांच्या वास्तव्याच्या जागा या असंख्य जगाच्या दरम्यान जे आकाशस्थ अवकाश असतात तेथे असतात.

त्यांना या जगातील घटनांशी कोणतेही कर्तव्य नसते. हे देव म्हणजे आत्म्याला समाधान देणाऱ्या शांतीचे जे तात्त्विक आदर्श असतात त्यांचे गौरवान्वित साकाररुप असतात.

आल्याच्या अक्षुब्धतेस अडकाठी आणणारी दुसरी गोष्ट म्हणजे संस्कृती होय. स्टोइकांनी आचार व व्यवहार यांना सिद्धांतापेक्षा कमी लेखून गौण स्थान दिले. परंतु एपिक्युरसची मजल त्याच्याही पुढे सर्व संस्कृतीची निर्मर्त्सना करण्यापर्यंत गेली. त्याचे हे मत म्हणजे त्याच्या कालपर्यंत ग्रीसने ज्याचा ज्याचा पुरस्कार केला होता त्याचा एका पौर्वात्याने केलेला तात्त्विक निषेधच म्हणावयाचा. जे ज्ञान सुखाचे वर्धन करीत नाही ते निरुपयोगी समजावयाचे खरे म्हणजे ज्ञान अप्रत्यक्षरीतीने सुखास पोषक होऊ शकते असे फार तर म्हणता येईल. परंतु एपिक्युरसने वैया करण्याचे संशोधन, इतिहासकारांचे ज्ञान, गणिताचे शास्त्र, संगीताची उपपत्ती, काव्य, भाषालंकार शास्त्र, तर्कशास्त्र, वक्तृत्वशास्त्र या सर्वाविषयी तिरस्कर व्यक्त केला. त्याने जरी बौद्धिक सुखास शारीरिक सुखापेक्षा श्रेष्ठ स्थान दिले तरी त्याने 'सद्‌गुणासाठी सद्‌सुखापेक्षा', 'ज्ञानासाठी ज्ञान' याला कमीच महत्त्व दिले. अशा रीतीने प्लेटोच्या आदर्शाच्या विरुद्ध प्रवृत्तीस एपिक्युरसने आपल्या तत्त्वज्ञानातून व्यक्त रुप दिले.

स्वतः एपिक्युरस अत्यंत साधे, संयत, मिताचारी व संतुष्ट असे जीवन जगत होता व त्याने संतुष्ट किंवा समाधानी राहण्याच्या सिद्धांताचे प्रतिपादन केले. त्याच्या मते खरे म्हणजे आपल्या नैसर्गिक इच्छाही फारच थोड्या आवश्यक स्वरूपाच्या असतात व बऱ्याचशा अनैसर्गिक, कृत्रिम, अनावश्यक आणि मिथ्या असतात आणि त्यांच्या तृप्तीच्या मागे आपण लागण्याचे कारण नसते. अशा इच्छांमध्ये मानमरातब आणि गौरवाच्या इच्छा असतात. विलासी उपभोग घेऊच नये असे त्याचे मत नाही. पण अशा बाह्य गोष्टींवर आपण आपले समाधान मात्र कोणत्याही परिस्थितीत अवलंबून ठेवू नये असे त्याने आग्रहाने सांगितले. खरा मुद्दा कमी वापरण्याचा नसून गरजाच कमी असाव्यात असा आहे. खरे म्हणजे एखाद्यास जर जीवन जगणे असाह्य आणि अशक्य झाले तर त्याने स्वेच्छेने जीवनाचा अंत करावयासाठी हरकत नाही. येथ पर्यंत एपिक्युरसने आपले मत मांडले आहे.

**आपली प्रगती तपासून पहा**

प्रश्नः १) एपिक्युरअनचा सुखवाद सांगा.

२) सुखाच्या मार्गातील अडचणी सांगा.

## १.३ मानसशास्त्रीय स्वहितवाद- थॉमस हॉब्ज (PSYCHOLOGICAL EGOISM) :

या विचारप्रणालीचा पुरस्कार थॉमस हॉब्ज (इ.स. १५८८-१६७९) यांनी केला. थॉमस हॉब्जचा जन्म इंग्लंडमध्ये मॉल्मेसबरी येथे झाला. त्याने ऑक्सफर्ड विद्यापीठात स्कोलॅस्टिकवादाचा आणि ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्याची कॅव्हेंडिश कुटुंबाचा एक खाजगी शिक्षक म्हणून निवड झाली. त्याने साहित्याच्या वाचनासाठी खूप वेळ खर्च केला. तसेच तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, गणित व विज्ञान यांचे अध्ययन करुन तो निष्णात झाला. प्रवासात व युरोपमध्ये त्याचा अनेक तत्त्वज्ञानी व वैज्ञानिक यांच्याशी संबंध आला. विशेषतः गॅलिलिओ, फ्रांसीस बेकन, केप्लर, देकार्त, गॅसेंडी, मेरसेने या वैज्ञानिकांची व तत्त्ववेत्यांची ओळखही झाली. पुढे त्याची प्रतिक्रिया स्कोलॅस्टिकवादाविरुद्ध बनली. तत्त्वज्ञानातील जुनी मते सुधारकाप्रमाणे निपटून काढली व तत्त्वज्ञानाचा व्यावहारिक व वैज्ञानिक उपयुक्ततेवर त्याने भर दिला. त्याने अनेक ग्रंथही लिहिले. त्यापैकी 'लेव्हिएथन' हा ग्रंथ त्याचा प्रसिद्ध आहे. तो एक राजकीय विचारवंत म्हणून जसा ओळखला जातो, तसाच एक ब्रिटीश अनुभववादी तत्त्ववेत्ता म्हणूनही ओळखला जातो.

### १.३.१ नीतिशास्त्र व मानवी स्वभाव:

थॉमस हॉब्जवर पदार्थविज्ञान, गणितशास्त्र ह्या शास्त्रांचा परिणाम झाल्यामुळे त्याचा मानसशास्त्रीय दृष्टीकोन भौतिक स्वरुपाचा झाला आहे. त्याच्या मते संवेदना, कल्पना, भावना व मनोविकार ह्या सर्व मानसिक अवस्था असून त्या शरीराच्या अंतर्गत असलेल्या गतीचे अविष्कार आहेत. थॉमस हाब्जच्या कार्यावर दोन गोष्टींचा प्रभाव पडलेला आहे. पहिला प्रभाव सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचा आहे. त्याची प्रतिक्रिया धार्मिक अधिकाराविरुद्ध विशेषतः स्कोलॅस्टिकवादाविरुद्ध बनली. दुसरा प्रभाव विज्ञानाचा पडला. भौमितिक या वैज्ञानिक पद्धतीचे त्याला कौतुकही वाटले. ही भौमितिक पद्धती निश्चित आणि सार्वत्रिक ज्ञान आपणास देण्यास सक्षम आहे. या दोन्ही गोष्टींचा प्रभाव पडून हॉब्जच्या नैतिक व राजकीय विचारांवर त्याचा परिणाम झालेला आहे. त्याने मानसशास्त्रीय स्वहितवाद (Psychological egoism) या विचारसरणीचा पुरस्कार अर्वाचीन काळात केला. हॉब्जच्या मते माणूस हा स्वभावतः स्वतःच्या हितासाठी प्रयत्नशील असतो. तो स्वतःच्या इच्छा-आकांक्षा यांच्या पूर्तीसाठी झटत असतो. अर्थात माणूस स्वभावतः स्वार्थी असतो. हॉब्जच्या या विचारसरणीला 'मानसशास्त्रीय स्वहितवाद' असे म्हणतात. त्याने मानसशास्त्रीय स्वहितवादाचे जोरदार समर्थन केले. हॉब्जने मानवी स्वभावाचे (Human Nature) वर्णन 'लेव्हिएयन' या ग्रंथात केले. त्याने मनुष्य हा स्वभावतःच स्वार्थी, दुष्ट, क्रुर असा चित्रीत केला आहे. मानवी स्वभावाबद्दल हॉब्ज म्हणतो की मनुष्य आपली सर्व प्रकारची कार्ये स्वार्थाने प्रेरित होऊनच करतो. नीतीमत्तेचा जन्म हा स्वार्थी वृत्तीतून झालेला आहे. मनुष्य कर्तव्याचे पालन का करतो तर त्या कर्तव्यपालनाने कोणत्या ना कोणत्या स्वरुपात बक्षिस मिळते. आपण अहिंसेचे पालन का करतो? हॉब्ज म्हणतो की मी लोकांना मारले तर इतर लोक मला मारतील. परिणामी मला माझे सुख मिळणार नाही. आपण दया का करतो ? किंवा दुसऱ्याला दुःख झाल्यास आपल्याला दया का येते ? हॉब्ज म्हणतो की आपल्यालाही कदाचित तशी दुःखी अवस्था प्राप्त होईल अशी भीती निर्माण होते. म्हणजेच स्वतःचे भावी दुःख मनात येते म्हणून आपण दुसऱ्यावर दया करतो. एकूणच हॉब्जच्या मतानुसार मनुष्य स्वाभाविकतया स्वतःपुरता विचार करणारा म्हणजेच स्वार्थी असतो. स्वतःच्या हिताचे वा

सुरवाचे साधन म्हणून तो इतरांचा विचार करीत असतो. दुसऱ्याबद्दल वाटणारे दुःख वा दया का येते तर स्वतःवर तसा प्रसंग येईल या भीतीतून उत्पन्न होते.

### १.३.२ आत्मरक्षण व आत्महितः

हॉब्जच्या मते मानसाच्या ठिकाणी जन्मतःच आत्मरक्षण करण्याची प्रवृत्ती असते. मानवी आत्मरक्षणाचा नियम हा त्याच्या नैतिक व राजकीय जीवनाचे तत्त्व आहे. सर्व राजकीय संस्थांचा उगम त्याने आत्मरक्षण करण्यातून झाला आहे. स्वतः जगणे, स्वतःचे रक्षण करणे, सुखाने जीवन जगणे ही मानवाची जैविक प्रवृत्ती आहे. म्हणून माणूस आपल्या शरीराचे पोषण व रक्षण करण्यासाठी जे करणे आवश्यक आहे ते योग्य ठरते. हॉब्जच्या मते आत्मरक्षणासाठी व स्वहितासाठी व्यक्तीने कोणाचेही सहकार्य घ्यावे, कोणाचाही उपयोग करावा या नैसर्गिक स्वभावाला धरुन आत्मरक्षण व स्वहित हे सर्वश्रेष्ठ मूल्ये आहेत. हॉब्जच्या विचारात स्वतःच्या सुरक्षेचा, हिताचा विचार प्रमुख असून त्याचे मानवी स्वभावाचे व प्रवृत्तीचे निरीक्षण हे अत्यंत अचूक व भेदक आहे. तसेच ते वास्तववादी व परखडपणे मांडणारे विचार आहेत.

थॉमस हॉब्ज हा एक राजकीय विचारवंत म्हणूनही प्रसिद्ध आहे. मानव शांती, सुखा-समाधाने कसा राहू शकेल, नागरी संघर्षात्मक परिस्थितीत तो घातक आणि भीती यापासून कसा मुक्त होईल, अशी सामाजिक व राजकीय व्यवस्था निर्माण करणे हे त्याचे प्रमुख ध्येय होते. माणसाचे जीवन व्यवस्थित कसे होणार ? प्रत्येकजण स्वार्थ प्रवृत्तीने कृती करु लागला तर संघर्षात्मक परिस्थिती निर्माण होईल. अशा संघर्षात्मक परिस्थितीचा नाश करण्यासाठीच समाज आणि राज्य निर्माण झाले आहे. एकूणच समाजाची निर्मितीसुद्धा स्वार्थ वृत्तीतून झाली आहे. आत्महित, आत्मसंरक्षण व आत्मपोषण या तीन हेतूंमळे समाजाची निर्मिती झाली आहे. त्यामुळे माणसे एकत्र येतात. हॉब्जने हे पुढील उदाहरणाने स्पष्ट केलेले आहे. आपण रात्रीच्यावेळी घराचे दरवाजे व खिडक्या बंद करुन त्यांना कडी व कलूप लावतो. त्याचे कारण आपण झोपी गेल्यावर आपल्या घरातील वस्तू लोक सुरक्षित राहू देणार नाहीत याची खात्री वाटत नसल्यामुळे आपण घराचे दरवाजे, खिडक्या बंद करुन त्यांना कुलपे लावतो व त्याच्या किल्ल्या स्वतःजवळ ठेवतो. प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या हिताचा व सुरक्षिततेचा विचार करते. मनुष्य हा मानसिक दृष्ट्या स्वहितवादी आहे हे त्याचे निरीक्षण मार्मिक आहे.

### १.३.३ सामाजिक करार (Social Contract):

हॉब्जच्या मते आपले हक्क अबाधित राहण्यासाठी दोन अटी आवश्यक आहेत. पहिली अट म्हणजे प्रत्येकाने दुसऱ्याचे हक्क मान्य करण्याचा करार केला पाहिजे. तर दुसरी अट म्हणजे हा करार सुरक्षित राहण्यासाठी सामर्थ्यशाली एकात्मसत्ता निर्माण केली पाहिजे. त्यासाठी कायदे करुन त्याचे पालन करावे. हॉब्जच्या मतानुसार नीतीमत्तेची निर्मिती करणारा सामाजिक करार (Social contract) केला पाहिजे. तो करार मोडता कामा नये. समाजात राहावयाचे म्हणजे सामाजिक जीवनात माणसाने पाळवयाचे योग्य अयोग्य, चांगले वाईट, इष्ट-अनिष्ट याविषयीचे सर्व आदर्श सर्वसत्ताधिश शासनानेच ठरवावयाचे असतात. शासनाच्या सार्वभौमत्वापुढे व्यक्तीला स्वतःचे स्वातंत्र्य, वेगळे असे अधिकार, हक्क व नीती ही संभवत नाही. अन्याय कृतघ्नता, समानता यांना कायदेशीर बनविता येत नाही. युद्ध जीवनाचे रक्षण करील व शांतता जीवनाचा नाश करील असे कधीही घडू शकणार नाही. समाज व मानवता यांना टिकवून धरण्यात चांगले व वाईट ठरविणारे शास्त्र म्हणजे नैतिक तत्त्वज्ञान होय.

थॉमस हॉब्ज म्हणतो की, माणसाच्या प्रत्येक कृतीचा हेतू हा स्वहित (आत्महित), आत्मरक्षण व आत्मपोषण असल्यामुळे दुसऱ्या कशाचीही इच्छा माणसाला होत नाही हे योग्यच आहे. येथे बुद्धिपेक्षा निसर्गच माणसाला ध्येयासंबंधी योग्य मार्गदर्शन करु शकतो. बुद्धी ही माणसाला आपले ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक त्या साधनांचा विचार करावयाला लावते. या ध्येय साध्याच्या बुद्धीतून तौ नैतिक नियमांचे पालन करतो. जर या नैतिक नियमांचे पालन कोणी करीत नसेल तर राज्याने किंवा सार्वभौम सत्ता असलेल्या शासनाने ते नियम पाळण्यास व्यक्तीला भाग पाडले पाहिजे.

थोडक्यात मनुष्य हा समाजशील प्राणी आहे ही ॲरिस्टॉटलची कल्पना हॉब्जने चुकीची ठरवून मनुष्य हा स्वभावतः समाजोन्मुख नसून तो एकाकी, स्वार्थी, दुष्ट असून, कुणाचा कुणावर भरवसा वा विश्वास नसल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आत्मरक्षणासाठी, भीतीपोटी व शांततेचा मार्ग काढण्यासाठी तो बुद्धिने नियमबद्ध समाजाची मागणी करतो. समाजात राहाण्यासाठी करार करतो. त्याचा हा सामाजिक करार भीती व स्वार्थावर आधारलेला आहे. अर्थात हा करार सुरक्षित राहण्यासाठी सामर्थ्यशाली एकात्मसत्ता आवश्यक आहे. त्यासाठी सार्वभौम शासनाची आवश्यकता हॉब्ज मान्य करतो. त्यांनी लोककल्याण करावे. परंतु त्याला ईश्वराशिवाय कोणीही जाब विचारु शकत नाही. हॉब्जने राज्याला व तिच्या सार्वभौम सत्तेला महत्त्व देऊन त्याची त्यामागची भूमिका ही व्यक्तिच्या हिताची होती. हॉब्जच्या विचारात माणसाचे स्वहित हे त्याच्या सामाजिक हितात गुंतले आहे असे त्याच्या विचारसरणीहून दिसून येते. तसेच नीतीमत्तेचे मूळ सामाजिक भावनेत न शोधता बुद्धीत शोधण्याचे श्रेय हॉब्जच्या विचारात दिसून येते.

### १.३.४ मूल्यमापनः

हॉब्जच्या मनसशास्त्रीय स्वहितवादात मानवी स्वभावाचे चित्रण हे अतिरेकी स्वरुपाचे आहे. हॉब्ज मानवी स्वभावाची एकच बाजू सांगतो. मनुष्य जर स्वार्थी, दुष्ट, व क्रूर आहे तर त्यांच्यात सामाजिक करार करण्याची भावना कशी निर्माण झाली? जर सहकार्य, प्रेम ह्या भावना निर्माण होत नसतील तर मनुष्य अधिक दुष्ट होईल. सहकार्य व प्रेम भावना असल्याशिवाय सामाजिक करार घडून येत नाही. जॉन लॉकने हॉब्जच्या मानवी स्वभावर टीका करुन ती वेड्याच्या मेंदूतून निधालेली कल्पना आहे. रुसोच्या मते हॉब्जने केलेले मानवी स्वभावाचे चित्रण हे असत्य असून ते मानवी स्वभावाच्या विरुद्ध आहे.

हॉब्जची सार्वभौमत्वाची कल्पना ही व्यक्तीचे स्वातंत्र्य नष्ट करणारी आहे. सार्वभौम ही निरंकुश सत्ता असून प्रजेला त्यास विरोध करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे सर्व व्यक्तींची स्थिती ही गुलामासारखी होते.

व्यक्ती नीतीमत्तेचे व कायद्यांचे पालन दंडशक्तीच्या भीतीमुळे करीत नसून त्यांना उपयोगी व आवश्यक अशा कायद्याचे पालन व्यक्ती करतात. हा हॉब्जचा विचार मान्य केल्यास कायदे हे मनुष्याच्या इच्छेवर आधारित आहे असे म्हणावे लागते.

हॉब्जच्या विचारावर अनेकांनी टीका केली असली तरी तो एक क्रांतीकारी राजकीय विचारांचा जसा जनक होता तसाच तो एक सुधारणादी अनुभववादी विचारवंत होता. त्याने भौमितिक पद्धतीचा व वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे आपले नीतिशास्त्रीय व राजकीय विचार मांडले. त्याने मानसशास्त्रीय स्वहितवादाती मांडणी करुन एक मोलाचे योगदान दिलेले आहे. तो

भौतिकवादी (जडवादी), अनुभवसत्तावादी, मानसशास्त्रीय स्वहितवादी व विश्लेषक तत्त्वज्ञानाची मांडणी करणारा अर्वाचीन तत्त्वचिंतक होता.

**आपली प्रगती तपासून पहा**

प्रश्नः १) मानसशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ?

२) थॉमस हॉब्जचा मानसशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ?

३) थॉमस हॉब्ज मानवी स्वभावाचे चित्रण कसे करतो ?

४) मानसशास्त्रीय स्वहितवाद व नीतिशास्त्रीय स्वहितवाद यामधील फरक कोणता ?

## १.४ नीतिशास्त्रीय स्वहितवाद (ETHICAL EGOISM)

आयन रँड (इ.स. १९०५ ते १९८२) यांचा जन्म सोवियट् रशियात लेनिनग्राड येथे २फेब्रुवारी १९०५ रोजी झाला. १९१७ साली सोवियट रशियात साम्यवादी क्रांती झाली. या राजवटीत विचारस्वातंत्र्य व भाषण स्वातंत्र्य यांच्यावर बंदी आली. १९२६ साली रँड यांनी रशिया सोडला व त्या अमेरिकेत आल्या. १९३१ साली त्यांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले तेव्हापासून त्यांनी संघटीत धर्म व हुकूमशाही वा एकाधिकारशाही यांना विरोध सुरु केला. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने त्या वास्तववादी होत्या. तसेच त्या निधर्मी बुद्धीवादी होत्या. त्यांच्यावर ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वज्ञाचा प्रभाव आढळून येतो. व त्यांनी हा प्रभाव मान्यही केलेला आहे.

### १.४.१ आयन रँड यांचा नैतिक स्वहितवाद (Ethical Egoism):-

आयन् रँड यांच्या चिंतनावर जसा ऑरिस्टॉटलचा प्रभाव आहे. तसाच त्यांच्या नैतिक चिंतनावर ‘अमेरिकेत स्वातंत्र्याचा जाहीरनामा’ याचा ही प्रभाव आहे. या जाहीरनाम्यानुसार अर्थात स्वातंत्र्याच्या मसुद्यानुसार प्रत्येकाला स्वतःचे जीवन जगण्याचा मूलभूत अधिकार आहे. तसेच प्रत्येकाला स्वतःच्या स्वातंत्र्याचाही हक्क आहे. प्रत्येकाने स्वतःच्या सुखासाठी झटले पाहिजे. रँड म्हणतात. या मसुद्यात दुसऱ्याची सेवा करावी हा शब्दप्रयोग नाही.

आयन् रँड ही तत्त्ववेत्ती बुद्धीवादी, वास्तववादी व निरीश्वरवादी होती. ती आपल्या नैतिक चिंतनात तिच्या बुद्धिवादाची काही सुत्रे स्पष्टपणे मांडते. त्यातील पहिले तत्त्व असे आहे की मला जसा जगण्याचा अधिकार आहे, तसाच तो इतरांनाही आहे. दुसरे तत्त्व असे सांगते की प्रत्येकाने विचार करतांना संदर्भ लक्षात ठेवला पाहिजे. तिसऱ्या तत्त्वानुसार बुद्धिनिष्ठ राहणे म्हणजे लहरीनुसार जगणे नव्हे. बुद्धी सर्वांच्या हक्कांचा विचार मान्य करते. बुद्धिवादी असणे म्हणजे आपण मनाच्या वा बुद्धीच्या साहाय्याने जगतो हे मान्य करणे होय.

अनेकदा असे म्हटले जाते की मनुष्य आपले ध्येय वा साध्य बुद्धीने निर्धारित करु शकत नाही. बुद्धी फक्त साधने निर्धारित करण्यास मदत करते. श्रीमती रँड ह्या या मताच्या विरुद्ध होत्या. त्यांच्या मते माणसाने बुद्धीच्या साहाय्याने आपल्या जीवनाची उद्दिष्ट्ये निश्चित करुन त्याची निवड केली पाहिजे. या संदर्भात बुद्धीचा उपयोग न केल्यास विनाश अटळ आहे.

जगण्याच्या तीन पद्धती (प्रारुपे) प्राणीमात्रांमध्ये वा सजीवांमध्ये दिसून येतात.

१) वनस्पती मॉडेल /प्रारुप

२) प्राणीपक्षी मॉडेल /प्रारुप

३) मानवी मॉडेल /प्रारुप

**१) वनस्पती मॉडेल** - वनस्पतीना व वृक्षवल्लींना आपली जागा सोडून जीवनाला पोषक द्रव्ये शोधावी लागत नाही. ज्या जमीनीत वनस्पती वाढतात. त्या जमीनीतूनच त्या आपली जीवनपोषकद्रव्ये मिळवितात. त्यासाठी त्यांना आपले स्थान सोडून इतरत्र जावे लागत नाही.

**२) प्राणीपक्षी मॉडेल** - पक्षी व प्राणी यांना आपले अन्न व पाणी शोधावे लागते. सिंह हा जंगलाचा राजा समजला जातो. त्यालाही आपले खाद्य शोधावे लागते. त्यासाठी जंगलात फिरावे लागते.

**३) मानवी मॉडेल** - मानवाला आपले खाद्य शोधावे तर लागतेच परंतु त्यासाठी उत्पादक श्रमही करावे लागतात. त्यासाठी त्याला कर्मांची वा कृतींची निवड करावी लागते. एवढेच नव्हे तर त्यासाठी त्याला विचार करावा लागतो. ज्ञानही मिळवावे लागते. जगण्यासाठी त्याला विचार करणे व ज्ञान मिळविणे अत्यावश्यक असते. म्हणूनच 'स्वार्थ हा सद्‌गुण' आहे. या संदर्भात रँड म्हणतात - स्वार्थीपणा म्हणजे स्वतः बुद्धिनिष्ठ स्वहितांचा स्वतः पाठपुरावा करणे, तसेच स्वतःच्या बुद्धीने निर्णय घेवून स्वतःच्या उत्पादक श्रमावर जगणे होय. दुसऱ्यावर काहीही न लादता स्वतःच्या हितासाठी स्वतः कष्ट करणे होय. माणसे स्वभावाने परस्परांचे शत्रू नाहीत. तसेच स्वतःच्या बुद्धिनिष्ठ स्वार्थाचा विचार करणे, यात काहीही वाईट नाही. उलट तसे करणे चांगले आहे. स्वहितवादी माणूस हा आत्मप्रत्ययवान, स्वावलंबी व आत्मगौरववान असतो. तसाच तो प्रयत्नवादी व उत्पादक श्रमजीवी असतो. तो स्वतः त्याग करीत नाही व इतरांनाही त्याग करण्यास प्रवृत्त करीत नाही. स्वहिताविरोधी भूमिका घेणे म्हणजे आत्मप्रतिष्ठेला वा आत्मगौरवाला धक्का देणे होय. अशा अर्थाने 'स्वहित साधणे' हा मोठा सद्‌गुण आहे.

आयन रँडने केवळ परहितवादी नीतीला कडाडून विरोध केला. परहितवादानुसार दुसऱ्याच्या हितासाठी वा भल्यासाठी स्वतःच्या हिताचा त्याग करणे ही खरी नैतिकता होय. रँडच्या मते परहितवाद शक्य असला तरी योग्य मात्र नाही. त्यांच्या मतानुसार परहितवाद हा माणसांना 'यज्ञीय पशू' म्हणूनच वागवतो. प्रत्येक प्रकारचा हुकूमशहा हा परहितवादाचा पुरस्कर्ता असतो. परहितवादाची भाषा वापरुन तो इतरांच्या हक्कांची मुस्कटदाबी करतो. तो इतरांचे विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतो. रँडच्या स्वहितवादी नैतिकतेची वरील तत्त्वे सर्व मानवजातीला लागू होतात. कारण त्याच्या मते ही तत्त्वे बुद्धिनिष्ठ (Rational) आहेत.

### १.४.२ ज्ञानांचे साधनमूल्यः-

रँड यांच्या मते ज्ञानाला सुद्धा स्वगत मूल्य (साध्य मूल्य) नाही. त्याला साधनमूल्य आहे. ज्ञानाला व वैज्ञानिक ज्ञानाला मूल्य आहे कारण ते जीवनाचे रक्षण करते. त्यामुळे जीवन समृद्ध व व्यापक बनते. जे ज्ञान हे कार्य करीत नाही, अशा ज्ञानाला काहीही अर्थ नसतो. दुसऱ्याला मदत करणे हे सामान्यतः चांगले कर्म म्हणून मान्यताप्राप्त आहे. रँड म्हणतात दुसऱ्याला मदत करणे यात चुकीचे वा वावगे नाही. परंतु दुसऱ्याला मदत करणे, हे मानवाचे नैतिक कर्तव्य नाही. ते मदत करणाऱ्याच्या निवडीवर अवलंबून असते. एखादा माणूस समाजसुधारणेचे कार्य करतो. हे त्याच्यासाठी नैतिकदृष्ट्या बंधनकारक नसते. तसे कारणे ही त्यांची आवड व निवड असते. एखादी व्यक्ती विचारपूर्वक ठरवून इतरांच्या उपयोगी पडते. समाज सुधारणेचे काम करते. ही त्याची निवड असते व असावी. हा त्याचा त्याने स्वतंत्रपणे व बुद्धिनिष्ठपणे घेतलेला निर्णय हवा.

### १.४.३ मूल्यमापन :

श्रीमती आयन् रँड यांच्या स्वहितवादी नैतिकतेत व्यक्तीच्या बुद्धिनिष्ठ निर्णयाला व निवड स्वातंत्र्याला प्रधान मूल्य मानलेले आहे. स्वातंत्र्य, व्यक्तीची प्रतिष्ठा, स्वावलंबन, आत्मश्रद्धा, श्रमप्रतिष्ठा, प्रयत्नवाद ही महत्त्वाची मूल्ये रँड यांच्या नैतिक स्वहितवादात मान्य केलेली आहेत. सर्वसाधारणतः अतिरेकी व्यक्तीवाद व अतिरेकी समाजवाद घातक होत. माणूस हा समाजशील प्राणी असल्यामुळे त्याला इतरांच्या अस्तित्वाची व सामाजिक समस्यांची दखल ही घ्यावीच लागते. म्हणून माणसाने समाजात वावरताना वा वागतांना स्वहितवाद व समाजवाद, स्वहित वा स्वतःचे हित व इतरांचे भले यांच्यातील मध्य साधला पाहिजे.

एके ठिकाणी रँड समर्पक व उचित विधान करताना लिहितात. मी बुद्धीची (बुद्धिवादाची) समर्थक आहे. मी व्यक्तिवादाची वा भांडवलशाहीची समर्थक व रक्षक नाही. एकूणच आयन रँड ह्या एका विशिष्ट मानवतावादाच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यांच्या मते मानवी क्षमतांवर विश्वास म्हणजे मानवतावाद होय. त्यांचा मानवी कर्तृत्वावर विश्वास होता. माणसाने स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. माणूस हा बुद्धिमान प्राणी असल्यामुळे त्याने स्वतः विचार करुन मूल्यांची निवड केली पाहिजे, व त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. असे केल्याने तो त्याच्या नियतीचा, भविष्याचा शिल्पकार बनतो. मूल्यांची निवड करतांना त्याने प्रामाणिकपणे, निर्भयपणे व मुक्तपणे ती निवडली पाहिजे. रँड यांनी केवळ परहितवादाला विरोध केला. कारण परहितवादी नीतिमत्ता माणसाला परोपजीवी बनविते. दुसऱ्याच्या श्रमावर जगणारे लोक आळशी बनतात. काही इतरांचे शोषणही करतात. हुकूमशाही, दंडूकेशाही (फॅसिस्टस) व साम्यवादी या राजवटी सुद्धा परहितवादाचा पुरस्कार करतात. परिणामतः माणसे वापरली जातात. त्यांना यज्ञीयपशूंची वागणूक मिळते.

संकटकाळी वा आपत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात विचार मांडतांना त्या एक मार्मिक उदाहरण देतात. एखाद्याची प्रियपत्नी संकटात असेल तर काय करावे ? पतीने पत्नीचा जीव वाचविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करावेत आपला पैसा व वेळ खर्च करावा. हा बुद्धिनिष्ठ व नैतिक निर्णय आहे. पतीचे पत्नीवर अस्सल वा खरे प्रेम असेल तर तिला वाचविण्यासाठी केलेले कार्य हे त्याग नव्हे. ते स्वतःच्या बुद्धिनिष्ठ सुखाला उपयोगी वा पोषकच असते.

**आपली प्रगती तपासून पहा :**

१) नीतिशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ?

२) रँडच्या मते परहितवाद म्हणजे काय ? त्यांचा परहितवादाला का विरोध आहे ?

३) स्वार्थपरायणता हा सद्‌गुण आहे. (Virtue of Selfishness) असे रँड का म्हणतात ?

४) माणूस इतर माणसांना मदत करु शकतो का ? रँड माणसाच्या अशा वागण्याचे समर्थन कसे करतात ?

## १.५ सारांश

स्वहितवादी नैतिकतेचे दोन प्रकार आहेत. मानसशास्त्रीय स्वहितवाद व नीतिशास्त्रीय स्वहितवाद. माणूस स्वभावतःच स्वतःच्या हितासाठी झटत असतो. किंबहूना तो स्वाभाविकतया स्वार्थी असतो. ह्या विचाराचा पुरस्कार थॉमस हॉब्ज ह्या ब्रिटीश तत्त्वचिंतकाने केला. त्याने लेव्हिएथन या ग्रंथात मानवी स्वभावाचे वर्णन करुन मनुष्य आपली सर्व प्रकारची कार्ये स्वार्थाने प्रेरित होऊन करतो. आत्मरक्षण, आत्महित व आत्मपोषण या तीन हेतूमुळे समाजाची निर्मिती झाली. त्यामुळे माणसे एकत्र येतात. हॉब्ज नीतीमत्तेची निर्मिती करणारा सामाजिक करार केला पाहिजे असे म्हणतो. तो करार मोडता कामा नये. बुद्धी माणसाला ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक त्या साधनांचा विचार करावयाला लावते. तो नैतिक नियमांचे पालन करतो. या नियमांचे पालन करण्यासाठी सार्वभौम सत्ता असलेल्या शासनाने किंवा राज्याने प्रयत्न करावेत व व्यक्तीला नीतीमत्तेचे व कायद्याचे नियम पाळण्यास भाग पाडावे. थॉमस हॉब्जच्या विचारावर अनेकांनी टीका केली असली तरी तो एक क्रांतीकारक राजकीय विचारवंत होता. त्याने मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून स्वहितवादाची मांडणी करुन नीतिशास्त्रीय विचारात मोलाचे योगदान दिले आहे.

नैतिक स्वहितवादाची विचारसरणी आयन रँड या तत्त्ववेत्तीने प्रभावीपणे मांडली. माणसाने बुद्धीच्या सहाय्याने आपल्या जीवनाची उद्दिष्ट्ये (ध्येये) निश्चीत करुन त्यांची निवड केली पाहिजे. माणसाने विवेकनिष्ठ वा बुद्धिनिष्ठ स्वहितवादी असावे. रँडने जगण्याच्या तीन पद्धती स्पष्ट करुन स्वहितवादी माणूस हा आत्मप्रत्ययवान, स्वावलंबी, आत्मगौरवान, प्रयत्नवादी व उत्पादक श्रमजीवी असतो. अशा अर्थाने स्वहित साधने हा मोठा सद्‌गुण (स्रील द एत्प्हि) आहे असे आयन रँड म्हणतात. त्या परहितवादी नीतीला कडाडून विरोध करतात. कारण ही नीती इतरांचे हक्क, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य यावर गदा आणते. रँडने ज्ञानाला साधन मूल्य आहे असे म्हटले. दुसऱ्याला मदत करणे यात चुकीचे वा वावगे नाही. परंतु दुसऱ्याला मदत करणे हे मानवाचे कर्तव्य नाही. ते मदत करणाऱ्याच्या निवडीवर अवलंबून असते. म्हणून रँड म्हणतात की माणसाने स्वतंत्रपणे व बुद्धिनिष्ठपणे निर्णय घ्यावेत. अशाप्रकारे आयन रँड या नीतीशास्त्रीय स्वहितवादात बुद्धिवादाचे समर्थन करतात व स्वहित साधने यालाच मोठा सद्‌गुण

मानतात. रँडने हे विचार आपल्या स्वहित वा स्वार्थ परायणता एक सद्‌गुण (The virtue of selfishness) या ग्रंथात प्रभावीपणे मांडले आहे.

## १.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) मानसशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय? एपिक्युरअिन्‌सचा स्वार्थ सुखवाद सांगून त्याचे मूल्यमापन करा.

२) एपिक्युरअिन्‌सचा स्वार्थ सुखवाद म्हणजे काय? एपिक्युरअिन्‌सने सुखाच्या मार्गातील अडचणी कोणत्या सांगितले आहेत?

३) मानसशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ? थॉमस हॉब्ज यांचा मानसशास्त्रीय स्वहितवाद सांगून त्याचे मूल्यमापन करा.

४) नीतिशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ? आयन रँड यांचा नीतिशास्त्रीय स्वहितवाद स्पष्ट करुन त्याचे मूल्यमापन करा.

५) थॉमस हॉब्जचा मानसशास्त्रीय स्वहितवाद व आयन रँड यांचा नीतिशास्त्रीय स्वहितवाद यामधील फरक स्पष्ट करा.

६) आयन् रँड यांच्या मते परहितवाद म्हणजे काय ? त्यांचा परहितवादाला का विरोध आहे ? सविस्तर स्पष्ट करा.

७) ‘‘स्वार्थपरायणता वा स्वहित हा सद्‌गुण आहे.’’ सविस्तर चर्चा करा.

८) टिपा लिहा

अ) मानसशास्त्रीय स्वहितवाद

ब) नीतिशास्त्रीय स्वहितवाद

क) एपिक्युरअिन्‌सचा स्वार्थ सुखवाद

ड) सूखाच्या मार्गातील अडचणी

इ) स्वहितवाद व परहितवाद यांमधील फरक

फ) स्वार्थपरायणता व सद्‌गुण

ग) सजीवांमधील जीवन जगण्याची प्रारुपे (मॉडेल्स)

ह) नीतिशास्त्र व मानवी स्वभाव

य) हॉब्जचा सामाजिक करार

❖❖❖❖

# घटक -२

# आधुनिक नैतिक उपपत्ती
# (MODERN MORAL THEORIES)

**घटक रचना**


२.० उदिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
- २.१.१ परहितवादी नीतीशास्त्र (Ethics of Altruism) : डेव्हिड ह्युम
- २.१.२ नैतिकतेचा उगम आणि स्वरूप
- २.१.३ सद्‌गुणाचे प्रकार

२.२ एमान्युएल कांटचा निरुपाधिक आदेश
- २.२.१ कांटचे नीतिशास्त्र
- २.२.२ कांटची सत्संकल्प (सदिच्छा) संकल्पना
- २.२.३ सोपाधिक आदेश व निरुपाधिक आदेश
- २.२.४ निरुपाधिक आदेशाचे प्रकार
- २.२.५ कांटच्या निरुपाधिक आदेशाचे परीक्षण

२.३ सुखवाद / उपयुक्ततावाद
- २.३.१ सुखवादाचे प्रकार
- २.३.२ जेरेमी बेंथेंमचा उपयुक्ततावाद (Utilitarianism)
- २.३.३ परीक्षण
- २.३.४ मिल्लचा उपयुक्ततावाद / गुणात्मक उपयुक्ततावाद
- २.३.५ मिल्लच्या उपयुक्ततावादाचे परीक्षण

२.४ सारांश
२.५ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न


## २.० उदिष्ट्ये

१) डेव्हिड ह्यूम, एम्यान्युएल कांट, मिल्ल आणि बेंथाम यांच्या आधुनिक नैतिक उपपत्तींचा परिचय विद्यार्थ्यांना करुन देणे.
२) नैतिकतेचे स्वरूप, उगम, सद्‌गुणाचे प्रकार याविषयीची माहिती देणे.
३) कांटने सांगितलेल्या नितीमीमांसेचा आपणास अभ्यास करता येईल.
४) कृतीच्या प्रेरणाच्या विश्लेषणाच्या आधारित परिणाम कारक कृतींवर आधारित नैतिकतेचा अर्थ विकसित करणे.
५) सुखवादाचे प्रकार, उपयुक्ततावादाचा परिचय करुन देणे.

## २.१ प्रस्तावना

प्राचीन नैतिक उपपत्ती आणि आधुनिक नैतिक उपपत्ती यांत फरक आहे. आधुनिक नैतिक उपपत्तीचा या भावना, कर्तव्य किंवा परिणाम यावर भर देतात. नैतिक निर्णय देताना त्या कृतीचा उद्देश विचारात घेतला जावा कि त्या कृतीचे परिणाम विचारात घेतले जावेत या संदर्भात विविध विचारप्रवाह आढळतात. ह्युम त्याच्या नितिशास्त्रात भावनेला महत्त्व देतो, तर कांटचे नीतिशास्त्र कर्तव्यावर भर देणारे आहेत, तर मील्ल आणि बेथांम कृतीच्या परिणामाला म्हणजेच त्या कृतीतून मिळणाऱ्या सुखाला महत्त्व देतात. या प्रकरणात आपण डेव्हिड ह्युमचे परहितवादी नीतिशास्त्र, कांटचा निरुपाधिक आदेशाचा सिद्धांत आणि बेंथेंम आणि मिल्लचा उपयुक्ततावादाचा अभ्यास करणार आहोत.

नीतिशास्त्र समाजातील प्रचलीत चालीरीती, रुढी परंपरा यांवर अभ्यास केला जातो. व्यक्तीची वर्तणुक हि त्याच्या समाजाने आखून दिलेल्या नियमांवर आधारित असते. समाजात प्रचलीत असलेल्या नितीविषयक संकल्पनांचा अभ्यास नीतिशास्त्रात केला जातो. नैतिक निर्णय देताना जी कृती केली आहे, त्या कृतीमधील उद्देश किंवा कृतीचे परिणाम यांवर भर दिला जातो. मानवी जीवनाचे आदर्श काय आहे उच्च ध्येय किंवा 'Summun Bonum' काय आहे त्याच्या अनुषंगाने योग्य अयोग्यतेविषयी नैतिक निर्णय दिला जातो. नीतिशास्त्रात श्रेयस, योग्य, इष्ट या संकल्पनांचा जसा विचार केला जातो तसेच कर्तव्य संकल्पनेतील विचार त्यात केला जातो. एखादी गोष्ट इष्ट आहे याचा अर्थ ती अनुकरण करणे किंवा त्याचा अवलंब करावा का यावर विचार केला जातो. मानव हा समाजशील प्राणी आहे. तो समुहात राहत असतो. विविध समुहाच्या किंवा समाजाच्या चांगल्या व वाईटाच्या योग्य अयोग्यतेच्या कल्पना ह्या वेगवेगळ्या असतात. प्रत्येक समाजसेविकाही आदर्श असतात. त्या आदर्शाप्रत पोहोचण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करत असतो. जीवनाची ध्येये, प्रयोजन काय आहे आणि त्या ध्येयाप्रत जाण्यासाठी कोणत्या मार्गाचा तो वापर करतो. ध्येयाप्रत जाणारे मार्ग, साधन किंवा ते आदर्श या पैकी नैतिक निर्णय देताना कशाचा विचार केला जावा याबाबतीत विविध मतप्रवाह आहेत. नीतिशास्त्रातील सुखवादाची उपपत्ती सुख हेच मानवी अंतिम साध्य आहे असे मानते. स्वसुखवादी स्वतःच्या सुखाचा विचार करतात तर परहितवादी, उपयुक्ततावादी हे इतरांच्या सुखाचा विचार करावा असे मत मांडतात तर कर्तव्यवादी विचारसरणी ही कर्तव्य म्हणजेच कृतीच्या उद्देशाला महत्त्व देतात. एम्यानुअल कांटचे नीतिशास्त्रीय विचारात कर्तव्यावर भर देताना आढळतो.

### २.१.१ परहितवादी नीतीशास्त्र : डेव्हिड ह्युम (Ethics of Altruism : David Hume) :

डेव्हिड ह्युम हा स्कॉटिश तत्वज्ञ इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ चा जन्म ७ मे १७११ ला एडिसरा (स्कॉटलंड) झाला आणि त्याचा मृत्यू २६ ऑगस्ट १७७६ साली झाला. ह्युम हा अनुभववादी आणि संशयवादी म्हणून प्रसिद्ध होता. ह्युमचा दृष्टिकोन अनुभवाधारित आहे. त्याच्या मते मानवाचे ज्ञान केवळ जगातील फक्त संवेद्य घटनापुरते मर्यादित राहते. अनुभवाद्वारे आपणांस या संवेद्य जगाचे ज्ञान होत असते. त्याच्या मते आपणांस संस्कार व ठसे (Impressions) मिळत नाहीत त्यांना अस्तित्व नसते असे तो मानतो. ह्युम अनिवार्य कारण कल्पना मान्य करत नाही. कारण कार्य संबंध म्हणजे दोन कल्पनातील केवळ नियमित क्रम भाव असतो. संवेद्य जगाच्या पलीकडे जे आहे. उदा. द्रव्य, आत्मा, वगैरे हे सर्व अज्ञेय आहे असे ह्युम मानतो.

ह्युमने अनेक ग्रंथ लिहिले त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत. त्याचा Tractise on Human Nature हा ग्रंथ १७३८-१७४० या काळात तीन खंडात प्रसिद्ध झाला. याशिवाय 'The History of England', 'essays Moral, Political', 'An Enquiry concerning the Principles of Morals' या ग्रंथात त्याचे नीतिविषयक विचार आढळतात.

### २.१.२ नैतिकतेचा उगम आणि स्वरूप :

ह्युमने आपल्या Tractise on Human Nature च्या ३ ऱ्या खंडात नीतीच्या अधिष्ठानाची (Foundations of Morality) मीमांसा केली होती. शाफ्टसबरी, हचेसन व बटलर यांचे नीतिशास्त्रावरील कार्य पुढे चालू ठेवण्याची त्याची इच्छा होती. ह्यूमच्या मते नैतिक निर्णय हे भावनेवर (sentiments) आधारित असतात. नैतिक कृतीत भावना ही महत्त्वाची भूमिका बजावते. नैतिक निर्णय हे बुद्धीवर आधारित नसतात. बुद्धी (Reason) ही आपणास केवळ वस्तुस्थिती काय आहे हे सांगते. नैतिक निर्णय हे कृत्य चांगले आहे का हे सांगत असते. आपल्या रोजच्या जीवनात आपण विवेकबुद्धीचा (Reason) वापर करत नाही असे तो सांगत नाही. परंतु नैतिक निर्णय केवळ विवेक बुद्धीने घेतले जात नसुन त्यात भावनांची महत्त्वाची भूमिका आहे असे तो मानतो. ह्यूमच्या मते नीती ही जाणवत असते (Felt). विवेकबुद्धीने तिचा निर्णय केला जात नाही (Not Judged). माणुस हा स्वतःवर प्रेम करीत असतो, त्या स्वतःच्या सुखासाठी प्रयत्न करत असतो. परंतु अर्थातच ह्युम हा स्वसुखवादी नाही, कारण त्याच्या मते जेव्हा व्यक्ती इतरांची सुख किंवा दुःखे पाहत असतो तेव्हा स्वतः त्या अनुभवाशी समरस होऊ शकतो. हया त्याच्या प्रवृत्तीला सहानुभूती (Sympathy) असे म्हणतात. मानवी स्वभावातील ह्या सहानुभूतीच्या प्रवृत्तीवर सामाजिक जीवन आणि त्याचे सुख आधारित आहे.

या सहानुभूतीच्या प्रवृत्तीमुळे व्यक्ती स्वतःच्याच सुखाबरोबर इतरांच्या सुखाचा, हिताचा विचार करत असतो. माणसाचा स्वभावच असा आहे की दुसऱ्यांच्या दुःखात दुःखी होतो आणि सुखात सुखी होतो. इतरांच्या आनंदात तो आनंदी होतो. त्याच्यात असणारी ही सहानुभूतीची प्रवृत्ती ही परहितविषयीचा पाया बनत असते. त्याच्यामुळे स्वतःला आणि इतरांना सुख मिळते त्याच्या ठिकाणी उपयुक्तता असते. सहानुभूतीच्या ह्या प्रवृत्तीमुळेच आपण इतरांच्या भावना समजू शकतो. ह्यूमच्या मताप्रमाणे नीतिमत्ता आणि मानवाची सामाजिकता यात घनिष्ठ संबंध आहे. सहानुभूतीची भावना ही सार्वजनिक कल्याणाच्या विचाराचाही पाया बनते. या सहानुभूतीच्या भावनेमुळे स्वहित व परहित जोडले जाते.

नैतिक तत्त्वज्ञानात आपणांस बुद्धीवादी, अनुभववादी यांसारखे विविध विचार प्रवाह दिसून येतात. बुद्धीवादींच्या मते, नैतिक निर्णय हे बुद्धीवर आधारित असतात, यांच्यापेक्षा ह्युमची भूमिका वेगळी आहे. त्यांच्या मते नैतिक निर्णयामध्ये भावना ही महत्त्वाची भूमिका बजावते. भावनिक क्षमतेच्या आधारावर एखादी कृती योग्य आहे कि अयोग्य आहे हे ठरविले जाते. नैतिक मूल्यमापन हे मानवाच्या सहानुभूतीच्या क्षमतेवर आधारित आहे.

प्लेटो, ॲरीस्टॉटल यासारख्या तत्वज्ञांनी बुद्धीला अतिशय महत्त्व दिले आहे. मानव हा त्याच्या विवेक बुद्धीमुळे इतर प्राण्यांपासून वेगळा आहे असे मानण्यात येते, काही तत्वज्ञांच्या मते नैतिक मूल्यमापनात विवेक बुद्धीचे महत्त्वाचे स्थान आहे परंतु ह्युमच्या मते विवेकबुद्धीचे स्थान नैतिक निर्णयात दुय्यम आहे. ह्यूम म्हणतो की विवेकबुद्धी आपल्या विकारांची दासी असते व

असली पाहिजे आणि विकारांची सेवा करण्यापेक्षा व तिचे आज्ञापालन करण्याखेरीज तिने इतर काही करण्याचा आव आणू नये. नैतिक निर्णय हे केवळ वस्तुस्थितीवर आधारित नसून ते भावनांवर आधारित असतात व त्याद्वारेच ते मान्य किंवा अमान्य केले जातात. त्यांची मान्यता हि भावनिक प्रतिसाद असतो. नैतिक कृती ह्या व्यक्तीच्या चारित्र्य वैशिष्ट्यांनी (Character traits) प्रेरीत होतात.

योग्य अयोग्य हे ठरविताना भावनाची महत्त्वाची भूमिका आहे आणि विवेकबुद्धीद्वारे वस्तूस्थितीचे ज्ञान होऊ शकते. परंतु केवळ वस्तूस्थितीचे ज्ञान माणसाला कृती करण्यास प्रेरित करीत नाही. भूकंप आला आहे ही वस्तूस्थितीचे ज्ञान माणसाला घराबाहेर पडण्यास प्रेरीत करीत नाही. तर मला जीव वाचवायचा आहे ही भावना त्याला सुरक्षित ठिकाण शोधण्यास किंवा सुरक्षित ठिकाणी जाण्यास प्रेरीत करते, म्हणजेच जीव वाचवण्यातून मिळणाऱ्या सुखाची भावना ही कृती करण्यास प्रेरीत करते. योग्य, अयोग्य ठरविण्यातही भावना (Feelings & Emotions) महत्त्वाची भूमिका बजावतात. नैतिक निर्णय हे केवळ विवेक बुद्धीने घेतले जातात हे ह्यूम अमान्य करतो. पुढील विधानाद्वारे हे सिद्ध करता येईल.

नैतिकतेतील फरक हा मानवी कृती प्रेरित करतो केवळ विवेक बुद्धी ही मानवी कृती प्रेरीत करु शकत नाही म्हणून नैतिकतेतील फरक (moral distinctions) हा केवळ विवेक बुद्धीमुळे शक्य नाही.

वरील उदाहरणात जीव वाचविण्यातून मिळणारे सुख आणि जीव गमावले तर त्यातून मिळणारे दु:ख हे मानवाला सुरक्षित ठिकाणी जाण्यास प्रेरीत करते, म्हणजेच केवळ भूकंप आला आहे ही विवेकबुद्धी मानवी कृती प्रेरित करु शकत नाही. नैतिकतेतील फरक म्हणजे योग्य अयोग्य याचे नैतिक मूल्यमापन, आणि हेच नैतिक कृतीना उद्युक्त करते. हयूमच्या मते व्यक्ती योग्य काय अयोग्य काय हे फरक व्यक्ती करु शकते, आणि ही योग्य, अयोग्यतेची समज त्याला कृती करण्यास प्रेरणा देते.

ह्यूमच्या मते विवेकबुद्धी दोन प्रकारची आहे व ती म्हणजे demonstrative reason आणि probable reason आणि ही दोन्हीही मानवि कृतीच्या प्रेरणा ठरु शकत नाही. केवळ विवेकबुद्धीने मानवी कृती प्रेरीत होत नाही. सुख आणि दु:खाची भावना किंवा तीव्र उत्कट भावना (Passion) ही कृतीसाठी प्रेरक शक्ती (motivational force) असते. उदा. व्यायाम करणे हे आवश्यक आहे हे माहित असुनही जोपर्यंत एखाद्याची शरीर स्वास्थातून मिळणाऱ्या सुखाची उत्कट भावना नाही तोपर्यंत तो नियमित व्यायाम करणार नाही.

विवेकबुद्धी आणि भावना हया एकमेकांविरुद्ध नाही. परंतु नैतिक निर्णय हे विवेक बुद्धीच्या शुद्ध बुद्धिनिष्ठ विचारसरणीवर होत नसून माणसांना जे स्वहित व समाजहित साधण्याकरता योग्य, चांगले वाटते व म्हणून आपल्या भावनांच्या आधारावर नैतिक निर्णय घेतले जातात. "Reason is and ought to be the slave of passon" अर्थातच "विवेकबुद्धी आपल्या विकारांची (passion) दासी असते व असली पाहिजे" असे जे ह्यूम म्हणतो तेव्हा त्याच्या मते passion हे आपल्या कृती किंवा आपल्या ध्येयासाठी आपणांस प्रेरीत करते. विवेकबुद्धी हि त्यापर्यंत जाण्याचे आपणांस मार्ग दाखविते. विकार (Passions) भावनांपेक्षा अधिक तीव्र व उत्कट असतात.

कोणत्याही नैतिक निर्णयात साधारणपणे तीन घटक असतात.

१) Agent कर्ता

२) Receiver प्राप्तकर्ता

३) Spectatar श्रोता

जेव्हा कर्त्याद्वारे एखादी कृती केली जाते तेव्हा प्राप्तकर्त्याच्या भावनांमुळे त्या व्यक्तीच्या मनात त्या कृत्याविषयीची पसंतीची भावना निर्माण झालेली असते. तो आनंदी होतो. श्रोता ही त्या प्राप्तकर्त्याची आनंदाची भावना त्याच्यातील सहानुभूतीच्या प्रवृत्तीमुळे समजू शकतो आणि त्यामुळे तो नैतिक निर्णय देऊ शकतो. सहानुभूतीची क्षमता नैतिक निर्णयात महत्त्वाची भूमिका बजावते. एखाद्या कृत्याविषयीची पसंतीची भावना दोन प्रकारची असू शकते.

१) उपयुक्त ठरणारी कृत्ये

२) समाजहितासाठी किंवा परहितासाठी केलेली कृत्ये

एखादी कृती ही व्यक्तीच्या किंवा समाजाच्या हितासाठी असते अशा कृतींना योग्य ठरवले जाते. साधारणपणे जास्तीत जास्त हित ज्याद्वारे साधले जाते आणि आपल्या भावनात्मक प्रवृत्तीस अनुरुप जे ठरेल त्यानुसार नैतिक निर्णय दिले जातात.

विकारांचे किंवा उत्कट भावनांचे विवेकबुद्धीवर प्रभुत्व असते. आपण ज्या क्रिया / कृती करतो. त्यांचा उगम विवेकबुद्धीत नसून त्यांचा उगम अनुकूल प्रवृत्ती, त्यापासून निष्पण होणारे सुख व दुःख यात होत असतो. विवेकबुद्धी ही माणसाच्या जीवनात महत्त्वाचे कार्य करते. परंतु ह्युमच्या मतानुसार तीचे स्थान गौण असते ती केवळ युक्त / योग्य मार्ग दाखविते. माणसाच्या क्रियाशील जीवनाचा उगम त्याच्या विकारात व भावनात असते. मानवाच्या कृतीशीलतेत विकास, भावना व विवेकबुद्धी यांचे प्रत्येकाचे स्थान व परस्परसंबंध ह्युमने दाखविला आहे.

### २.१.३ सद्‌गुणाचे प्रकार :

मानव हा योग्य अयोग्य, उचित अनुचित यामध्ये फरक करीत असतो. नैतिक दृष्ट्या काय चांगले आहे किंवा वाईट आहे हे ठरविताना मानवाची विशिष्ट अभिरुची व निवड करण्याची अभिवृत्ती स्पष्ट होत असते. व्यक्तीच्या नैतिक कृती त्या त्या व्यक्तिच्या मुळ स्वभावावर आणि तिच्या सामान्य चारित्र्यावर अवलंबुन राहत असते. कृतिच्या योग्य किंवा अयोग्यतेच्या संदर्भात नैतिक भेद केले जातात. त्यात विवेकबुद्धी आणि भावना, विकार यात सहमती असते. ज्या गोष्टी नैतिक आहेत त्या अनुकूलतेची भावना निर्माण करतात. नैतिक सद्‌गुण सुखद भावनाची तर दुर्गुण किंवा दूराचार दुःखद भावनांची निर्मिती करीत असतात. ग.ना. जोशींच्या शब्दात (पाश्चात्य तत्वज्ञानाचा इतिहास खंड ३ पान क्र. ८८०) "ह्यूमच्या मते नैतिक स्थायीभाव हे कृती, गुण किंवा चारित्र्य याविषयी अभिरोचनाच्या किंवा पसंतीच्या (Approbation) भावना असतात."

ह्यूमच्या मतानुसार ज्या कृती किंवा गुणांमुळे पाहणाऱ्याच्या मनात पसंतीची भावना निर्माण होते. ते सद्‌गुण आणि याविरुद्धची कृती, गुण असतात किंवा प्रतीकूलतेची भावना निर्माण होते ते दुर्गुण, परहितेच्छा, दानशूरपणा ह्या गुणांना सद्‌गुण म्हणता येईल. नैतिक सद्‌गुणांना जे मूल्य प्राप्त होते. त्यांचे कारण म्हणजे ते व्यक्तीला किंवा समाजाला उपयुक्त असते. नैतिक

सद्‌गुण चांगले असतात याचे कारण त्यांचे केवळ व्यक्तीला नव्हे तर समूहाला व संपूर्ण समाजाला हितकारक व पोषक असे परिणाम होत असतात. जर सद्‌गुणांमुळे चांगले व पोषक म्हणजेच समाजहिताचे कार्य होत नसेल तर त्याला सद्‌गुण म्हटले जाणार नाही. म्हणजे जे स्वतःला किंवा इतरांना सुख मिळवून देते त्याच्या ठिकाणी उपयुक्तता (Utility) असते.

सद्‌गुण दोन प्रकारचे मानले आहेत.
१) नैसर्गिक सद्‌गुण
२) कृत्रिम सद्‌गुण

नैसर्गिक सद्‌गुण हे मानवाच्या स्वतः प्रवृत्तीने विकसित होतात आणि त्यांची जाणीव मानवाच्या नीतिसंवित (Moral Sense) प्रत्यक्षपणे होत असते. ते उपयुक्त असतातच त्याचप्रमाणे ते लोकांना भावतात. दानशूरपणा, नम्रता, दयाळूपणा, नम्रता, धैर्य, परोपकारीवृत्ती, मनमिळावू इ. सद्‌गुणांना नैसर्गिक सद्‌गुण म्हणता येईल. ज्या कल्पना मानवाने निर्माण केलेल्या आहेत किंवा ज्या सामाजिक परस्पर संबंधावर आधारित आहेत अशांना कृत्रिम सद्‌गुण म्हटले जाते. हे कृत्रिम सद्‌गुण समाजात शांतता आणि सुसंवादासाठी आवश्यक असतात. सामाजिक सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सद्‌गुणांना कृत्रिम सद्‌गुण म्हटले जाते. न्यायाची संकल्पना मानवाच्या कल्पनेने निर्माण केलेली असते आणि म्हणून ती कृत्रिम असते. न्यायात सार्वजनिक हित अभिप्रेत असते. न्याय हे मानवाच्या सामाजिक जीवनाची एक गरज म्हणून त्याने तयार केलेली युक्ती असते. समाजात विविध प्रकारच्या व्यक्ती असतात. त्यांच्या स्वार्थांना आवर घालून सर्व व्यक्तीचे परस्परांशी विसंगत असलेले हितसंबंध हे एकत्र गुंफून सर्वांना अभय, सुरक्षितता व शांतता समाजात प्रस्थापित करण्यासाठी ते आवश्यक आहे त्यांना कृत्रिम सद्‌गुण म्हणता येईल. समता, न्याय, निष्ठा, वचनपालन ही कृत्रिम सद्‌गुणाची काही उदाहरणे आहेत.

ह्यूमच्या सद्‌गुणांच्या विचारात साधारणपणे पुढील वैशिष्ट्यांच्या श्रेण्या आढळतात.
१) असे गुण जे इतरांच्या हितासाठी आहेत. उदा. परोपकारी वृत्ती, दानशूरपणा वगैरे
२) काही गुण जे स्वहितासाठी उपयुक्त असतात उदा. शिस्तबद्धता, संयम,
३) असे गुण जे इतरांना मनभावन किंवा सुखकारक असतात उदा. व्यवहार ज्ञान, स्वच्छता वगैरे
४) असे गुण जे लागलीच स्वतःच्या पसंतीस उतरतात. उदा. स्वाभिमान, स्व-आदर वगैरे

ह्यूमची नीतिविषयक भूमिका मुख्यतः अनुभवाची, भावनावादी व उपयुक्ततावादी आहे. ह्यूम हा विवेकबुद्धीच्या विरुद्ध नाही, परंतु विवेकबुद्धीची भूमिका दुय्यम आहे असे तो मानतो. परहितविषयी आणि समाजहिताविषयी वाटणारी सहानुभूतीची भावना ही महत्त्वाची आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. नैतिक कृतीचा उगम कशात आहे ?

२. नैतिक कृती त्या केवळ विवेक बुद्धीने प्रेरीत होत नाही हे ह्यूम कशारीतीने दाखवतो ?

३. सद्‌गुणांचे प्रकार कोणते ते स्पष्ट करा.

## २.२ एमान्युएल कांटचा निरुपाधिक आदेश

### २.२.१ कांटचे नीतिशास्त्र

कांटचा जन्म २२ एप्रिल १७२४ रोजी जर्मनीतील कोनिग्जबर्ग (Koenigsberg) येथे एका सामान्य कुटुंबात झाला. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात त्यालामहान प्रज्ञावंत ज्ञानर्षी मानले जाते. कांटचे नीतिशास्त्र हे कर्तव्यवादी नीतिशास्त्र आहे.कांटने अनेक ग्रंथ लिहिले. त्यातील काही ग्रथांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

1) Critique of Pure Reason
2) Critique of Practical Reason
3) The Critique of Judgement
4) Metaphysics of Morals

कांटने त्याच्या तत्त्वज्ञानाद्वारे बुद्धिवाद आणि अनुभववाद यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे.

### २.२.२ कांटची सत्संकल्प (सदिच्छा) संकल्पना:

नीतिशास्त्रात कितीही नवीन मते आली तरी त्यातील कोणत्याही मताला कांटन सांगितलेल्या उपपत्तीची उपेक्षा करून चालणार नाही. शाश्वत स्वरुपाचा असाकाही नैतिक विचार कांटच्या नीतिशास्त्रामध्ये निश्चीतपणे आहे. कर्तव्यवादी नीतिविचारकांमध्ये तो नेहमीच अग्रगण्य राहील. पण Metaphysics of Morals (नैतिकतेची सत्ताशास्त्रीय आधारभूमी) या पुस्तकाचीसुरुवात तो प्राप्तव्याच्या संकल्पनेपासून करतो. कर्तव्यरत असणे हेच परम प्राप्तव्यहोय अशा तऱ्हेचा त्याचा अंतिम निष्कर्ष आहे. 'जिला निःसंदेहपणे नेहमी चांगले म्हणतायेईल, संदर्भ कोणताही असला तरी पुढील परिणाम काहीही झाले तरी जिला चांगलेचम्हणता येईल अशी गोष्ट कोणती आहे ? कोणती गोष्ट अशी आहे की जी प्राप्त झाल्यावर आणखी प्राप्तव्य असे काही उरतच नाही. अमक्यासाठी म्हणून चांगली असेनव्हे तर स्वयमेव चांगली आहे, कोणत्याही परिस्थितीत चांगलीच ठरेल अशी गोष्ट कोणती आहे ? या प्रश्नांची उत्तरे त्याने सुरूवातीलाच दिली आहेत. या जगात अथवा जगाच्या बाहेरही, सत्संकल्पाशिवाय दुसरी कोणतीही गोष्टअशी नाही, की जिला विना अट निरूपाधिकपणे चांगली म्हणावे.

बुद्धिमत्ता, शक्ती, संपत्ती, किर्ती, रूप, यौवन अशा कितीतरी गोष्टींना चांगले म्हणता येईल. पण त्यांचा चांगलेपणा सोपाधिक असतो. त्याला 'जर...तर'ची मुरड असते. त्याला काही अट असते. बुद्धिमत्ता ही गोष्ट चांगली असते हे खरे. पण त्याला अट आहे. तिचा निट उपयोग केला तरच ती चांगली ठरते. शक्तीसुद्धा चांगलीच गोष्ट आहे. पण दुर्बलांना छळण्यासाठी ती वापरली तर तिला चांगले म्हणता येणार नाही.संपत्ती, रुप इत्यादी बाबतीतही हेच म्हणणे लागू पडते. पण सत्संकल्पाचा चांगुलपणा अशा कोणत्याही बाह्य उपाधींवर अवलंबून नसतो. परिणाम काहीही झाले आणि इतर परिस्थिती कशीही असली तरी सत्संकल्पाला सदैव चांगलेच म्हणावे लागते. एखाद्या रुप-लावण्यवती स्त्रीच्या ठिकाणी सत्संकल्प आढळला अथवा जरा-जर्जर कुरुपस्त्रीच्या ठिकाणी तो प्रतीत झाला तरी एखाद्या स्वयंप्रकाशी रत्नाच्या तेजाप्रमाणे त्याचा चांगुलपणा अविचलच राहतो. निसर्गाचे दातृत्वात कद्रूपणा केला असेल तर (म्हणजे,ती व्यक्ती दुर्बळ, आंधळी, पांगळी अथवा बहिरी असेल तर) एखाद्या व्यक्तीचा संकल्प हा नुसता संकल्पच राहील. तो कृतीत परिणाम पावणार नाही. असे झाले तरीसत्संकल्पाची तेजाळता रतिमात्रही कमी होणार नाही. सत्संकल्प म्हणजे केवळ चांगली इच्छा नव्हे. इच्छा निराळी, संकल्प निराळा.सर्व माणसे सुखी होवोत अशी नुसती इच्छा करणे सोपे आहे. पण नुसती इच्छा म्हणजेसंकल्प नव्हे. इच्छा सफल होण्यासाठी जे जे करणे शक्य आहे ते ते सर्व करण्याचीमनापासूनची तयारी, किंबहुना जे जे करण्याचा आंतरिक प्रयत्न म्हणजे संकल्प होय.कैलास पर्वत पाहावा, मानस सरोवर पाहावे, हिमालय पाहावा अशी इच्छा करणे ही एकगोष्ट आहे. आणि हिमालयावर प्रत्यक्ष जाण्याचा संकल्प करणे ही त्याहून भिन्न अशी दुसरी गोष्ट आहे. इच्छेचे रुपांतर कृतीत होईलच असे नाही दरिद्रि माणसाच्यामनोरथाप्रमाणे ती जागच्या जागी विरुनही जाईल. पण काही बाह्य अडथळा आला नाही तर संकल्पाची परिणती कृतीत होतेच. बाह्य अडथळे येऊ न देणे ही आपल्या स्वाधीनची गोष्ट नसल्याने कांट म्हणतो की खरा चांगुलपणा हा संकल्पाच्या ठिकाणीच राहतो.मग प्रश्न निर्माण होतो की, संकल्प सत् कशामुळे ठरतो? सत्संकल्पाची नियामक गोष्ट कोणती? संकल्पात जे उद्दिष्ट अंतर्भूत असेल त्याच्या स्वरुपामुळे तोसत् अथवा चांगला ठरत नाही ही तर कांटची अगदी मूळची भूमिका आहे. इतरांना सुख द्यावे असा माझा संकल्प असेल तर त्या उद्दिष्टांमुळे तो चांगला ठरणार नाही.कारण अशा तऱ्हेचा चांगूलपणा हा आवश्यक स्वरुपाचा नव्हे. तो बाह्य गोष्टींवर अवलंबून असल्यामुळे स्वप्रतिष्ठ नसतो. त्याचा चांगुलपणा अंतर्गत असावयास हवा.म्हणून कांटने म्हटले की, संकल्पाचा चांगुलपणा त्याच्यात अंतर्भूत असणाऱ्या प्रेरणेच्या स्वरुपामुळे ठरतो. ही प्रेरणा अनुकंपा, करुणा अशांसारख्या नैसर्गिक प्रवृत्तींची असेलतरीसुद्धा त्यातून स्फुरणाऱ्या संकल्पाला नैतिक मूल्य नाही; कारण नैसर्गिक प्रवृत्ती यामानसशास्त्रीय नियमांवर अवलंबून असतात; माझ्या स्वत्त्वांवर नव्हे. अनुकंपा मलावाटेल किंवा न वाटेल. ती माझ्या ठिकाणी नसल्यास ती मला अथवा आणखीकोणालाही मुद्दाम उत्पन्न करता येणार नाही. कर्तव्यप्रेरणा ही मात्र माझ्या ताब्यातील गोष्ट आहे. 'माझ्या ठिकाणी कर्तव्यबुद्धी नाही; मी काय करु?' असे कोणालाच म्हणता येणार नाही. 'कर्तव्यासाठी कर्तव्य' या एकाच भावनेतून जो संकल्प प्रेरित होतो तोच सत्संकल्प होय. कर्तव्य हे करावयाचे ते कशासाठी करावयाचे या प्रश्नास उत्तर नाही;कारण अमक्यासाठी करावयाचे म्हटल्यास ती गोष्ट कर्तव्याची उपाधी ठरेल आणि त्यामुळे कर्तव्याची कर्तव्यता नष्ट होईल. कर्तव्य भावनेविषयी आदरबुद्धी आपल्या मनात असतेच. कर्तव्यासाठी कर्तव्य याचा अर्थ कर्तव्यविषयक वा आदरबुद्धीच्या पोटी केलेले कर्तव्य असा होतो. केवळ कर्तव्यप्रेरणेतून मिळणारा आदेश निरुपाधिक असतो.तो फलनिरपेक्ष अथवा निष्काम असतो. निरुपाधिक आदेशाच्या सिद्धांताने कर्तव्याची ही फलनिरपेक्षता सांगितली जाते. निरुपाधिक आदेशाच्या सिद्धांताच्या अर्थाचा एक भाग आहे.कांटच्या नीतिशास्त्रीयमीमांसेत, त्याचा निरुपाधिक आदेशाचा सिद्धांत प्रसिद्ध आहे. त्याचा 'क्रिटिक ऑफ प्रॅक्टिकल रीझन' हा

ग्रंथ प्रसिद्ध आहे. नीतिचे सार्वभौमतत्त्व शोधून काढणे व ते प्रस्थापित करणे, हा या ग्रंथाचा प्रमुख उद्देश  आहे.माणसाला नैतिक निर्णय घेण्याचा प्रसंग कोणत्या परिस्थितीत येतो व तो निर्णय घेताना, कोणता विशेष बुद्धि व्यापार मनुष्य करतो याचा शोध कांटने घेतला आहे, माणूस काही अंशी पशूसारखा वासनांच्या आहारी जाणारा आहे. तर काही अंशी विवेकशीलही आहे.माणसाचे निर्णय हे वासनात्मक असू शकतात व नैतिक ही असू शकतात. न्रैतिक निर्णय घेताना काहीतरी लाभण्याची अपेक्षा माणूस ठेवीत नसतो, तर कोणत्या तरी सार्वभौम तत्वाच्या प्रेरणेने मनुष्य नीतिमूल्यविषयक निर्णय घेतो. त्याप्रमाणे वर्तन करतो.

**आपली प्रगती तपासा.**

१) कांटचे नीतिशास्त्र स्पष्ट करा.

२) सत्संकल्प स्पष्ट करा.

---

---

---

---

---

**कांटचा निरुपाधिक आदेशाचा सिद्धांत :**

कांट हा जगातल्या सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञापैकी एक होय. त्याचे नीतिशास्त्र कर्तव्यवादी वा फलनिरपेक्षवादी, नीतिशास्त्रीय दृष्टिकोनाचे सर्वोत्तम विवरण आहे.त्याचा नैतिक सिद्धांत ''कर्तव्यासाठी कर्तव्य'' या तत्वावर भर देणे हा आहे. हा सिद्धांत उपयुक्तवादाच्या संपुर्ण विरुद्ध आहे. कांटचे नीतिशास्त्र हे कर्तव्याचीसंकल्पना, नैतिक नियम आणि शुभसंकल्प यांचा मध्यबिंदू आहे.कांटचा बुद्धिवाद प्रामुख्याने योग्य आणि अयोग्य या तत्वाचा विचार करतो.सुखवाद परिणामांना महत्व देतो. तर बुद्धिवादानुसार कृतीची योग्य, अयोग्यता तिच्या हेतूवरुन ठरत असते. कोणतीही कृती कर्तव्यानुसार झाली तर तिचे परिणाम लक्षात न घेता ती कृती इष्ट समजावी. योग्य कृती म्हणजे ती जी कर्तव्यानुसार केली जाते. जी अशी योग्य कृती करते, ती व्यक्ती चांगली व्यक्ती आहे.सुखवाद सुखद प्रवृत्तींना महत्व देत असतो. तर बुद्धिवाद कर्तव्यांना महत्व देत असतो. सुखवाद भावनेवर आधारीत आहे तर बुद्धिवाद बुद्धिवर आधारीत आहे.सुखवाद योग्य आणि इष्ट यात भेद मानत नाही. ते इष्ट आहे तेच योग्य आहे या उलट कांटच्या मते योग्य (Right) हे इष्ट (Good) पेक्षा उच्च दर्जाचे आहे. एखादी गोष्ट जरी इष्ट वाटली तरी योग्य असेलच असे नाही. त्यांच्या मते, कर्तव्य हे योग्य आहे.कृतीची योग्य, अयोग्यता ठरवित असताना ती कृती कर्तव्यानुसार झाली आहे की नाही ते पाहिले जाते. कोणत्याही परिस्थितीत प्रत्येकाने आपल्या कर्तव्याचे पालन करावयास हवे.

कांटचे नीतिविषयक तत्व प्रामुख्याने 'मेटाफिझिक्स ऑफ मॉरल्स' या पुस्तकात आढळते. या विश्वात शुभेच्छा, शुभसंकल्पना खेरीज (सत् संकलल्पाखेरीज) कोणतीही गोष्ट अंतिम परमशिव नाही. या सिद्धांताने कांट आपल्या नीतिशास्त्राच्या विवरणास प्रारंभ करतो त्याच्या मते, या जगात किंवा या जगाच्या बाहेर नीतिशास्त्र जगाच्या बाहेर देखील सत् संकल्पाशिवाय एकही वस्तू मुलतः किंवा उपाधी शिवाय इष्ट नाही. ज्या गोष्टी सामान्यतः चांगल्या मानल्या जातात. उदा. सुख, भौतिक संपत्ती,प्रभुत्व इत्यादी. त्या वाईट चारित्र्य

असलेल्या माणसांत आढळल्या तर त्या एकतर उपयोगी किंवा पूर्णतः अशिल, अर्धम्य, रुप धारण करतात.उपाधीशिवाय कोणतीही गोष्ट इष्ट राहू शकते काय? हे ठरविण्यासाठी कांटने पुढील दोन निकषांचा आधार घेतला आहे.

अ) जी वस्तू मुलतः अथवा उपाधीशिवाय इष्ट असते त्या वस्तूचा इतरांशी संबंध आल्यास त्याचा परिणाम अनिष्ट होत नाही.

ब) अशा वस्तूंचा अंतर्भाव दुसऱ्या वस्तूमध्ये झाल्यास वस्तू अनिष्ट ठरत नाही.

हे दोन्ही निकष केवळ सत्संकल्पालाच लागू पडतात. मनुष्याच्या नैतिक स्वभावातूनच असा संकल्प उदयास येतो. हा सत्संकल्पच आपल्याला कोणत्याहीपरिणामांची अपेक्षा न ठेवता कृत्य करण्यास मार्गदर्शन करतो. कृतीची योग्य-अयोग्यता कृतीच्या हेतूवर सर्वस्वी अवलंबून असते. कोणतीही इच्छा म्हणजे संकल्प नाही. नैतिक नियमांचे पालन करण्यासाठी एकमेव हेतूने नैतिक नियमांच्या वृद्धिकरणासाठी माणसाच्या अंतःकरणात झालेली इच्छा म्हणजे शुभसंकल्प (Good will) किंवा सत्संकल्प होय. यात साधारणपणे दोन कृती आढळतात.१) भावनेमुळे होणारी कृती.२) तत्वामुळे होणारी कृती.

योग्य कृती ही भावनेमुळे निर्माण झालेली नसते. योग्य कृती ही केवळ तत्वामुळे केली जाते. तेव्हा ती व्यक्ती कोणीही असली तरी ती कृती एकसमान असते.जी कृती बुद्धीनुसार केली जाते, तीच कृती खऱ्या अर्थाने कर्तव्य समजली जाते.बुद्धीनुसार कृती करणे म्हणजे सामान्य तत्वानुसार कर्तव्यासाठी कर्तव्य करणे होय.कांटच्या मते तत्वानुसार होणारी कृती दोन आदेशामुळे होऊ शकते.१) सोपाधिक आदेश२) निरुपाधिक आदेश

### २.२.३ सोपाधिक व निरुपाधिक आदेश :

सोपाधिक व निरुपाधिक आदेशात पुढील प्रमाणे फरक आहे.

१) सोपाधिक आदेश म्हणजे असे तत्व जे कोणतेही विशिष्ट ध्येय संपादनकरण्याकरीता उपयुक्त असते. तर निरुपाधिक आदेश म्हणजे असे तत्व की, जे कोणतेही ध्येय साध्य करण्याकरिता नसून मुलतःच त्याला महत्व प्राप्त होतअसते.

२) सोपाधिक आदेश सर्वांना उद्देशून नसतो तर ज्या व्यक्ती विशिष्ट प्रयोजन साध्यमनात बाळगून कार्यरत असतात. त्यांच्यासाठीच असते ज्यांच्या डोळ्यापुढे विशिष्ट उद्दिष्ट असते त्यांनीच त्याचे पालन करायचे असते. या उलट निरुपाधिक आदेश प्रत्येक व्यक्तीस बिनाशर्त उद्देशून सांगितला जातो. आपले हेतू, उद्दिष्ट्ये जरी वेगवेगळी असली तरी त्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

३) सोपाधिक आदेशाचे स्वरुप जर 'क्ष' हवे असेल तर 'य' करावे असे असते. तरनिरुपाधिक आदेशाचे स्वरुप 'अ' कर असे असते.

४) सोपाधिक आदेश सर्व व्यक्तींना मान्य होणे शक्य नाही कारण व्यक्ती तितक्या प्रकृती या तत्वानुसार निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळ्या गोष्टींची इच्छा ह्यॊ शकते. निरुपाधिक आदेश मुलतः योग्य असतो आणि म्हणून तो सर्व बुद्धिनिष्ठ माणसाला पटेल असा असतो. नैतिक नियम निरुपाधिक किंवा निरपेक्ष आदेश असतात. निरुपाधिक आदेशही आपल्याच सद्सद्विवेक बुद्धीने दिलेली अंतिमआज्ञा होय. निरुपाधिक आदेश अमुक एक उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी नसतो.कृतीत अनुस्युत असणाऱ्या तत्वासाठी ती करावी असा आदेश असतो.

५) नैतिक नियम हे एकाच व्यक्तीस नव्हे तर प्रत्येक व्यक्तीस सर्व संभवनीय परिस्थितीत लागू असतो. निरुपाधिक आदेशामध्ये केवळ रुपात्मक साम्य असते द्रव्यात्मक साम्य नसते.

**आपली प्रगती तपासा.**

१) सोपाधिक व निरुपाधिक आदेशातील फरक सांगा.

## २.२.४ निरुपाधिक (निरपेक्ष) आदेशांचे प्रकार

कांटच्या मते निरपेक्ष/निरुपाधिक आदेशाचे चार प्रकार असून ते सार्वकालिक वसार्वत्रिक स्वरुपाचे आहेत. ते चार प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

१) ''नेहमी अशीच कृती करीत जा की, तिच्यामागील तत्व हे सार्वत्रिक नियम व्हावा अशी इच्छा त्याच समयी तुम्ही करु शकतील'' या आदेशाचा अर्थ असा की, एखादे तत्व नियम म्हणून कधी स्वीकारलेजाते ? तर जेंव्हा एखाद्या तत्वाचे सार्वत्रीकरण झाले असेल. सर्वच व्यक्तींनी एखाद्या तत्वाला मान्यता दिली की तो नियम बनतो. परंतू एखाद्या तत्वाचे केवळ सामान्यीकरण होऊन चालत नाही. तर अशा तत्वानुसार जे आचरण घडते, त्यापासून कोणती ही विसंगती निर्माण होणार नाही हे ही पाहिले पाहिजे. एखाद्या तत्वाचे आपण सामान्यीकरणकेले आणि त्याचा परिणाम हितावह झाला तर अशा तत्वास नैतिक तत्व समजून त्यानुसार आचरण केले पाहिजे. जर का अशा तत्वापासून विसंगती निर्माण होत असेल तर अशा तत्वास अनैतिक तत्व समजून त्याचा त्याग करावा असे कांटचे प्रतिपादनआहे. या निरुपाधिक आदेशाचा उदाहरणांनी खुलासा करु या. समजा अडचणीत सापडल्यावर सुटका होण्यासाठी पुढे ते मोडण्यासाठी बुद्धीने एखाद्यास काही वचन द्यावे काय असा प्रश्न उपस्थित झाला तर निरुपाधिक आदेशाच्या तत्वाप्रमाणे तसे वचन देऊ नये अथवा दिल्यास ते वचन पाळावे असे निघेल. कारण, वचन पाळण्याचे तत्वच सार्वत्रिक होऊ शकेल. दिलेले वचन मोडावे असा नियम करु गेल्यास वचने दिलीघेतलीजाणार नाहीत. आणि मग अर्थात ती मोडताही येणार नाहीत. या आदेशाच्या तत्वानुसार वचन पाळावे हे कर्तव्य होय असे ठरते. उदा. चोरी करणे आणि सत्य बोलणे। या तत्वाचे सामान्यीकरण करुन ती आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणली तरयातील पहिल्या तत्वापासून समाजात विसंगती निर्माण होते. त्यामुळे अनैतिक ठरते. म्हणून अशा तत्वांचा त्याग केला पाहिजे. याउलट सत्य बोलणे या तत्त्वाचे सामान्यीकरण केल्यास त्याचा चांगला परिणाम होतो. कसलीच विसंगतीनिर्माण होत नाही. म्हणून अशा तत्वानुसारच वागले पाहिजे असे कांट सूचित करतो.अशाप्रकारे अयोग्य कृती आत्मविसंगत असते. दुसऱ्याने आपल्याशी जसे वागावे अशी तुझी इच्छा असते तसे तू दुसऱ्याशी वर्तन ठेव अशी एक धर्माज्ञा आहे. तिला सुवर्णनियम म्हणतात. तिचा अर्थ कांटच्याआदेशाशी मिळताजुळता आहे. विल ड्युरंटने म्हटले आहे की, शेजाऱ्याचे आचरण ज्या तत्वाला धरुन असावे अशी आपली इच्छा असते ते नीतीचे तत्त्व होय.

२) ''अशा रीतीने कृती कर, की तुझ्या कृतीमागील तत्त्व जणू तुझ्यासंकल्पामुळे निसर्गनियम बनणार आहे'' (Act as the maxim of youraction were to become, through your will, a general natural law.)

नीतीच्या आदेशात बंधकत्व असते; कारण तो कोणतेही उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी नसतो. याला तो निश्चितार्थक आदेश असे नाव देतो. या ठिकाणी उद्दिष्टअसते. पण त्याच्या बाबतीत 'जर ते असेल तर....' असे म्हणावे लागत नाही. थे उद्दिष्ट वस्तुतः आहे. सुख हे ते उद्दिष्ट होय. सर्व माणसांना साधारण असे उद्दिष्ट आहे. 'सुख मिळवावेस' हा आदेश निश्चितार्थक आहे. माणसांना सुख पाहिजे असते आणि त्याच्यासाठी ती कृती करतात ही वस्तुस्थिती आहे. म्हणून या आदेशाच्या ठिकाणी आवश्यकता आणि बंधकत्व नाही. म्हणून 'सुख प्राप्त करुन घे' असा आदेश नैतिक नव्हे. नीतीच्या आदेशात बंदकत्व असते. कारण तो अमुक एक उद्दिष्ट प्राप्तकरण्यासाठी नसतो. तोच निरुपाधिक आदेश. कृतीत अनुस्यूत असणाऱ्या तत्त्वासाठीच ती करावी असा तो आदेश असतो. ते तत्त्व म्हणजे नियमाच्या नियमपणाचे अथवा सार्वत्रिकतेचे तत्त्व होय. नैतिकता ही बाह्य परिस्थितीत सामावलेली नसते. नैतिक नियम व्यक्तीवर बाहेरुन लादता येत नाहीत. नैतिकता ही आंतरिक स्वरुपाची असते. जेंव्हा एखादानियम माझ्यावर बंधनकारक लादला जातो तेंव्हा तो खऱ्या अर्थाने नैतिकदृष्ट्या माझ्यावर बंधनकारक नसतो. परंतु आंतरिक प्रेरणेने, सारासार विचार करुन, निरपेक्ष बुद्धीच्याद्वारे एखादा नियम मी जेव्हा स्वतःवर लादून घेतो, तेव्हाच तो नियम नैतिकदृष्ट्या माझ्यावर बंधनकारक ठरत असतो असे कांटचे प्रतिपादन आहे.

कांटच्या मते ''कर्तव्यासाठी कर्तव्य'' करणे किंवा आदेशाचे पालन करणे हाच सद्‌गुण आहे. सद्‌गुणच व्यक्तीजीवनातील परम शिवतत्व (Supreme Good) आहे.

३) ''मनुष्य व्यक्तीला, मग ती स्वतः तू असो वा इतर कोणीही असो केवळ साधन म्हणून न वागविता ती एक साध्यमूल्य आहे या दृष्टीने तुझे आचरणअसू दे'' (Act so as to treat humanity whether in your ownperson or in that of another, always as an end, nevermerely as a Means.) या आदेशाचा अर्थ असा की, तुम्ही स्वतःला मानव समजत असाल तरइतरांनाही मानव समजणारे तुमचे वर्तन असले पाहिजे. समाजातील कोणत्याहीव्यक्तीचा धर्म, वंश, जात, लिंग, आर्थिक परिस्थिती या भेदावर साधन म्हणूनस्वतःच्या हितासाठी वापर करता कामा नये. वंशावर आधारित केला जाणार काळागोरा असा भेद, गुलामगिरी पद्धत, वेश्याव्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अशा गोष्टींचा कांट निषेध करतो, कारण अशा गोष्टीत आपण इतर व्यक्तींना आपल्याहिताचे साधन समजतो. दैनंदिन जीवनात आपली इतर व्यक्तींना आपल्या हिताचे

साधन समजतो. दैनंदिन जीवनात आपली दृष्टी अशीच असते. रिक्षावाला, हमाल,मोलकरीण, मजूर यांना आपण माणूस न समजता आपल्या हिताचे, गरजपूर्तीचे साधन समजत असतो. कांटच्या मते प्रत्येक व्यक्तीला स्वचःचे साध्य असते. तिचा आपल्याला साधन म्हणून वापर करता येणार नाही. एवढेच नाही तर व्यक्तीलास्वतःलाच स्वतःचे साधन म्हणून वापर करण्याचा नैतिक हक्क नाही. त्यामुळेच कांटआत्महत्या किंवा गैरव्यवहार करण्याच्या प्रवृत्तीचा निषेध करतो. कारण आत्महत्या करणारी व्यक्ती स्वतःच्या फायद्यासाठी स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा वापर करत असते.म्हणून कांटच्या मते कोणतीही व्यक्ती स्वतःला मानव समजत असेल तर तिने इतरांनाही तसेच समजून वागले पाहिजे. प्रत्येकास इतरांचा साधन म्हणून वापर तर करता येणार नाहीच. परंतु स्वतःस देखील साधन समजता येणार नाही. प्रत्येक मानवी व्यक्ती हे साध्यमूल्य आहे याचा अर्थ असाही घेता येईल की,माणसाशिवाय ज्या इतर गोष्टींना चांगल्या म्हटले जाते त्या कशासाठी चांगल्या आहेत असे विचारता येते. त्याला उत्तर म्हणून त्या

सर्व गोष्टी माणसासाठी चांगल्या असतात असे सांगता येईल. पण माणसाचा चांगलेपणा (म्हणजे सत्संकल्प) कसासाठी असावा;माणसाने चांगले का असावे असे विचारता येत नाही. तो चांगलेपणा अंतिम आहे.निरुपाधिक आहे. सत्संकल्पाचा चांगलेपणा निरुपाधिक आहे हा कांटचा विचार प्रत्येकमानवी व्यक्ती हे साध्यमूल्य आहे या रीतीनेही सांगता येईल.

४) ''साध्यमूल्यांच्या एका सुरचित जगाला किंवा साम्रज्याचा स्वतःला एकघटक समजून तू आचरण करीत जा.'' (Always act as a member ofthe kingdom of ends). या आदेशाद्वारे कांट असे प्रतिपादन करतो, की प्रत्येक व्यक्तीने साध्याच्यासाम्राज्याचे नागरिक म्हणून जीवन जगले पाहिजे. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे कीसाध्याचे साम्राज्य ही स्थलकालविशिष्ट मूर्त संकल्पना नाही. तर साध्याचे साम्राज्यम्हणजे बुद्धिनिष्ठ नैतिक माणसाचा असा समूह आहे की ज्यात संघर्ष, भेदभाव अशा गोष्टींना स्थान नसते. नैतिकतेच्या नियमांचे पालन करणाऱ्या व्यक्तींचा हा समूह असतो. या साम्राज्याची नागरिक असणारी प्रत्येक व्यक्ती एकाच वेळी दोन प्रकारच्याभूमिका पार पाडत असते. जेंव्हा अशा व्यक्ती समाजाच्या हिताचे नैतिक नियम तयार करत असतात तेंव्हा त्या ईश्वराची किंवा राजाची भूमिका पार पाडत असतात. जेंव्हा आपणच केलेले नियम इतर व्यक्ती ज्या आदरणीय भावनेतून पाळतात, त्याचभावनेतून आपण इतर व्यक्ती पैकीच एक आहोत असे समजून स्वतःदेखील त्यानियमांचे प्रामाणिकपणे पालन करतात. तेंव्हा या व्यक्ती प्रजेची भूमिकादेखील पार पाडत असतात. म्हणून कांटच्या मते प्रत्येक व्यक्तीने अशा साम्राज्याचा किंवा सुरचितजगाचा नागरिक समजून जीवन जगले पाहिजे. कांटचा हा विचार महात्मा गांधीच्याविश्वस्त वृत्तीशी (Trusteeship) मिळता जुळता आहे. गांधीजींच्या मते- ज्याव्यक्तीजवळ जी संपदा आहे तिच्यावर त्याचा हक्क असतोच परंतु त्याने असेहीसमजले पाहिजे की माझ्या संपदेवर माझ्याएवढाच इतरांचाही समान हक्क आहे. याजगात मी एकटाच नाही इतरही अनेक व्यक्ती आहेत म्हणून माझ्या आचरणाची रीतअशी व्हावी की त्यांनाही ती मान्य व्हावी. अशा परिपूर्ण नैतिक जगात समरुपता असेल.सर्व समान असतील.

**आपली प्रगती तपासा.**

१) पहिला व दुसरा कांटचा निरुपाधिक आदेश थोडक्यात सांगा.

२) तिसरा व चौथा कांटचा निरुपाधिक आदेश थोडक्यात सांगा.

## २.२.५ कांटच्या निरुपाधिक आदेशाचे परीक्षण :

१) मानवी स्वभावात दोन प्रमुख घटक आढळतातः बुद्धी आणि भावना. सुखवाद्यांनीकेवळ भावनांचाच विचार केला तर बुद्धिवाद्यांनी केवळ बुद्धीचाच विचार केला.म्हणून दोन्ही मते एकांगी आढळतात. आपल्या आयुष्यात भावना देखील महत्वाच्याअसतात. वास्तविक कृतीचा उदय भावनेतूनच होत असतो भावना किंवा इच्छा कृतीला प्रेरणा देणाऱ्या असतात म्हणून इच्छांचा अंत केल्याससर्वच कर्मांचा आणित्या बरोबर नीतिचाही अंत होईल.

२) कांटच्या मताप्रमाणे भावनांचे आपण निर्मूलन केल्यास नैतिक कर्मातील आशयनिघून जाऊन त्या जागी आकारात्मकता असते. कारण त्याने दिलेल्या नीतितत्वाच्या आधारे आपण कोणती कृती करावी यासंबंधी नीट बोध होत नाही.कांटचे तत्व व्यवहारात लागू पडू शकत नाही. हा त्याच्या तत्वातील प्रमुख दोषआहे. प्रत्येक कृतीला सामान्यीकरणाचे तत्व लावून पाहिल्यास जवळ जवळ सर्वच कृती अयोग्य ठरतात. दानशूर माणूस प्रत्येक व्यक्तीने दानशूर असावे अशी इच्छा करु शकत नाही कारण जर प्रत्येक व्यक्ती दानशूर बनली तर दान घेणारा कोणीच उरणार नाही. त्याचप्रमाणे ब्रम्हचर्य प्रत्येकाने पाळावे असे कोणी म्हणणार नाही,कारण त्यामुळे मनुष्य जातच संपुष्टात येईल. व्यावहारिक जीवनात ब्रम्हचर्य, दानशूरपणा हे सद्‌गुण मानले जातात परंतु या कृती कांटच्या तत्वानुसार अयोग्य ठरतात.

३) कांटचे तत्व आकारात्मक आहे. हे तत्व विशिष्ट प्रकारच्या कृतीशी संबंधीत आहे.कोणत्याही कृतीचा तो परिस्थिती निरपेक्ष विचार करतो. परिस्थिती निरपेक्षविचार काही कृतीच्या बाबतीत शक्य असला तरी सर्वच कृतीच्या बाबतीत शक्यनाही. काही कृती मूळातच योग्य आहे कारण त्यांचे सामान्यीकरण होऊ शकते,म्हणजे एकदा ती योग्य आहे असे समजून आपण स्वतः तिला अपवाद राहू नयेअसे कांट समजतो. परंतु रॅशडालच्या मतानुसार आपण कधी विशुद्ध, निस्वार्थी बुद्धीने व विवेक बुद्धीने काही विशिष्ट नैतिक आदेशांना अपवाद ठरतो. उदा. आपण अनावश्यक मानवी दु:ख टाळण्यासाठी सत्य घटनांपासून परावृत्तहोतो.

४) कांटचे तत्वज्ञान फलनिरपेक्षतावादी वा कर्तव्यवादी आहे. अशा तत्त्वज्ञानात दोन किंवा अधिक कर्तव्याच्या परस्पर संघर्षाच्या समस्या उद्‌भवतात. कांटने त्याचे निरसन करण्याचा प्रयत्न केलेला नाही. कांटचा सामान्य निकष आपल्या नैतिकजीवनातील अडचणीचे निरसन करण्यास पुरेसा नाही.

५) ''कर्तव्याकरीता कर्तव्य'' प्रत्येकाने करावे. आपल्या सत्संकल्पाने सांगितलेल्यानैतिक नियमांनुसार प्रत्येकाने आचरण करावे. हे सांगत असताना मनुष्याचे नेमकेकर्तव्य कोणते? सत्संकल्प मनुष्याला नेमके काय सांगत असतो हे कांटने स्पष्टकेलेले नाही. म्हणूनच जॅकोबी या विचारवंताने असे सांगितले आहे की, कांटचासत्संकल्प म्हणजे असा संकल्प होय की जो कोणत्याही गोष्टीचा संकल्प करुशकत नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१) कांटच्या निरुपांधिक आदेशाचे परीक्षण करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.३ सुखवाद / उपयुक्ततावाद (UTILITARIANISM)

मिल्लने आपल्या नैतिक सिद्धांतास 'उपयुक्ततावाद' असे नाव दिले. केवळ त्या शब्दाचा अर्थ पाहिला तर असा अर्थ निघेल की एखादी कृतीयुक्त की अयुक्त हे ठरविण्याचा

निकष म्हणजे त्या कृतीचे होणारे परिणाम. केवळ शब्दांतून निघणारा हा अर्थ मानल्यास त्यात सुखवाद येतोच असे नाही. पण, ज्यांनी हाशब्द सुरुवातीस वापरला, त्यांनी संबंध सुखवादाशी अनिवार्यतया जोडला. कृतीची युक्तता तिच्या स्वरुपावरुन अथवा तिच्या मागील प्रेरणेवरुन ठरवायची नसून तिच्यापरिणामांवरुन ठरवायची असते आणि प्राप्त परिस्थितीत ज्या कृतीमुळे जास्तीत जास्तसुख निर्माण होईल तीच कृती योग्य होय हे सांगण्यासाठी मिल्लने आपले‘उपयुक्ततावाद’ पुस्तक लिहिले.

मानवाच्या आचरणाचा चांगला - वाईटपणा हा परिणामांच्या सुख-दुःखात्मक स्वरुपावर अवलंबून असतो. असे सांगणाऱ्या नीतिमीमांसेला ‘सुखवाद’ असे म्हणतात.‘‘सुख हाच नीतिचा मानदंड असे सांगणाऱ्या ध्येयवादी प्रकाराला सुखवाद असेहीम्हणतात.’’ ‘भावनेच्या आदेशाप्रमाणे आचरण करण्यातच व्यक्तीचे आत्मकल्याणसमावलेले आहे. असे प्रतिपादन करणाऱ्या सिद्धांतास सुखवाद असे म्हणतात.’ सुखवादाचे अनेक प्रकार सांगितले जातात. तथापि आपल्याला केवळ नीतिशास्त्रीय सुखवादाचे स्वरुप पहावयाचे आहे. सुख हाच नैतिकतेचा अंतिम निकषआहे. सुखाच्या अनुषंगाने व्यक्तीच्या आचरणाचे मूल्यमापन केले पाहिजे असे प्रतिपादनकरणारी विचार सरणी म्हणजे नीतिशास्त्रीय सुखवाद होय.सुखवाद म्हणतो की, सुख हे सर्वोच्च मूल्य आहे, जीवनाचे उच्चतम ध्येयआहे. सुखवादी विचारसरणीचे समर्थन करण्याच्या दृष्टीने सुखवाद्यांनी सुखवादाचे

प्रमुख दोन प्रकार केले आहे. १) मानसशास्त्रीय सुखवाद २) नीतिशास्त्रीय सुखवाद.

### २.३.१ सुखवादाचे प्रकार

सुखवादाचे प्रकार आपणास पुढीलप्रमाणे पहाता येतील.

### मानसशास्त्रीय सुखवाद (Psychological Hedonism):

या उपपत्तीनुसार मानवी जीवनात प्रत्येक व्यक्तीच्या पाठीमागे सुखाची अपेक्षा(इच्छा) असते. मनुष्य जेंव्हा-जेंव्हा इच्छा करतो, तेव्हा-तेव्हा तो सुखाचीच इच्छाकरत असतो. धन, वस्तू, सन्मान इ. गोष्टी माणसाला सुखासाठीच हव्या असतात.म्हणून प्रत्येक मानवी इच्छा ही शेवटी सुखेच्छा असते. मानवाचा स्वभाव काय आहे हेमानसशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करतो. या सुखवादात माणूस प्रत्यक्षात काय करतो? म्हणजेच वास्तव काय आहे. याचे स्पष्टीकरण करण्यात येते. प्रत्येक मनुष्य सुख इच्छित असतो. सुख सर्वच क्रियांचा हेतु असतो. सुखसंपादनाच्या हेतूशिवाय अन्य हेतू मानवासमोर असूच शकत नाही. व्यावहारिकजीवनात निरनिराळ्या व्यक्ती वस्तूंकरिता धडपडत असलेल्या दिसतात. कुणी ज्ञानप्राप्तीचा प्रयत्न करतात, तर कुणी दुसऱ्याच एखाद्या ध्येयाची सिद्धी करण्याचाप्रयत्न करतात तर कुणी धन प्राप्तीचा प्रयत्न करतात, कुणी सद्‌गुणी बनण्याचा प्रयत्नकरतात. प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्यातरी ध्येयासाठी वेडा झालेला दिसतो. परंतु या सर्वध्येयरुप मानल्या गेलेल्या वस्तू स्वयं अंतिम साध्यरुप नसून दुसऱ्याच कोणत्यातरी ध्येयाची सिद्धी करण्याकरिता साधनरुप आहेत. व ते अंतिम ध्येय म्हणजे दुसरे तिसरे कोणतेही नसून सुख हेच आहे. सुख हे त्याचे एकमेव लक्ष्य आहे. सुखाचा शोधघेणे हा मानवाचा स्वाभाविक धर्म आहे असे मत प्रतिपादन करतो. म्हणजे या विधानाद्वारा मनाचे वास्तववादी चित्र रेखाटतो म्हणून या वादाला मानसशास्त्रीयसुखवाद असे म्हणतात. प्राचीन काळात सिरॅनिक पंथ तर आधुनिक काळात जेरेमी बेंथॅम व मिल्ल यांनी

नीतिशास्त्रीय सुखवादाला मानसशास्त्रीय सुखवादाची बैठक दिली व सुखवादाचे प्रतिपादन केले आहे.

## नीतिशास्त्रीय सुखवाद (Ethical Hedonism) :-

'सुख' हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे. 'सुख' यानी तिच्या मानदंडावर आचरणाचा चांगला वाईटपणा ठरविला पाहिजे. 'सुख' हे ध्येय मानणाऱ्या विचाराला 'नीतिशास्त्रीय सुखवाद' असे म्हणतात. मनाच्या सुखपूर्ण अवस्था फक्तवांछनीय आहेत व दुःखपूर्ण अवांछनीय. मग त्या कोणत्याही कारणाने निर्माण झालेल्याअसोत. हे मत एपिक्यूरस, हॉब्स, बेंथॅम, मिल्ल, सिज्विक इ. विचारवंतानीस्वीकारलेले आहे. परंतु या ठिकाणी प्रश्न निर्माण होतो। की, सुख म्हणजे नेमके काय? दुःखाचा अभाव, इंद्रियजन्य सुख कीकोणतीही प्रिय अशी मानसिक अवस्था. सामान्यपणे असे म्हणता येईल की, जो अनुभव माणसाला इतर कोणत्याहीकारणाने नव्हे, तर त्या अनुभवाकरीताच आवडतो तोच सुखदायी अनुभव होय. यालाचनैतिक सुखदायी विचार म्हणतात. नैतिक सुखवाद हे मुल्यात्मक विधान आहे. यासुखवादानुसार प्रत्येक मनुष्याला इतर वस्तूंची इच्छा होवू शकते. पण त्याने सुखाचीइच्छा करणे इष्ट आहे. याचाच अर्थ नैतिक सुखवादानुसार सुख वांछनीय आहे.

नीतिशास्त्रीय सुखवादाचे प्रमुख दोन प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे :

अ) स्व-सुखवाद/स्वार्थ सुखवाद

ब) परसुखवाद/परार्थ सुखवाद/उपयुक्ततावाद

परार्थ सुखवाद/उपयुक्ततावाद : (Altruistic Hedonism):

नैतिक सुखवादाचा दुसरा प्रकार म्हणजे परार्थ-सुखवाद/उपपयुक्ततावाद होय.

**परार्थ सुखवादाचे मुख्य सूत्र :** ''अधिकांश लोकांचे अधिकांश सुख'' (Greatest Happiness ofthe Greatest Number) हाच नैतिकतेचा निकष होय. असे मत प्रतिपादन करणाऱ्या विचार प्रवांहास परार्थ सुखवाद असे म्हणतात.या सुखवादानूसार ज्या कृतीमुळे 'अधिकांश लोकांचे अधिकांश सुख' साधले जाईलअशीच कृती नैतिक समजून तिचा स्वीकार केला पाहिजे. या विचार सरणीत कृतीचापरिणाम किंवा उपपयुक्तता लक्षात घेतली जाते. म्हणून या विचारांस'उपयुक्ततावाद' असेही म्हणतात. उपयुक्ततावादाचे अगदी जवळून निरीक्षण केल्यास उपयुक्ततावाद हा तीनमहत्वपूर्ण मुद्यांचा विचार करीत असलेला दिसून येतो. पहिला प्रश्न असा की योग्य कृती कोणती? उत्तमोत्तम परिणाम ज्या कृतीमुळे घडून येतात त्या कृतीला योग्य कृतीअसे म्हणतात. हे पहिल्या प्रश्नाला उपयुक्ततावादाने दिलेले उत्तर आहे. दुसरा प्रश्नअसा की कोणते परिणाम नैतिक मोलाचे आहेत? सुख आणि सुख फक्त नैतिकमोलाची वस्तू आहे हे त्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे. नैतिक मोल किंवा किंमतमोजण्याचा निकष कोणता? हा तिसरा प्रश्न असून ''अधिकांश लोकांचे अधिकांश सुख'' हा निकष आहे असे त्या तिसऱ्या प्रश्नाला उत्तर आहे. या सिद्धांतात अंतर्निहित असलेली अमूर्त कल्पना अठराव्या शतकातीलमॅकेन्झी, शॉप्टसबरी व बटलर यासारख्या नीतिपंडितांच्या लिखाणातून स्पष्ट रुपातमांडली गेली आहे. स्वतःचे विचार जगासमोर ठेवण्याची महत्ववाची दोन कारणे होती.एकतर त्यांना हॉब्जचा स्वार्थसुखवाद खंडित करावयाचा होता. दुसरे असे की मनुष्यहा स्वभावतःच दुसऱ्याच्या भल्याचा विचार करतो, दुसऱ्याचे हित विचारात घेऊनजीवन जगतो. म्हणजे परसुख किंवा सहानुभूती ही मानवी जीवनाशी अविभाज्यपणेसंबद्ध आहे. हे त्यांना सिद्ध

करुन दाखववयाचे होते. हिटचसने (Hutcheson)''नैतिक आचाराचे वास्तव किंवा भौतिक ध्येय अधिकांश लोकांचे अधिकांश सुख हेआहे.'' या विधानाच्या रुपाने वरील परार्थसुखवादी विचारसरणीला निश्चितपणा प्रदानकेला व पुढे हेच विधान इंग्लंडमधील सिज्वीक, बेन्थॅम व मिल्ल या नीतिपंडितांनीस्वतःच्या नैतिक विचारसरणीचे ध्येयवाक्य म्हणून उचलून धरले व त्याच्या आधारावरस्वतःचे नैतिक विचार मांड़ले आहेत. या ठिकाणी आपण जेरेमी, बेन्थॅम व जे. एस. मिल्ल या दोन विचारवंतांच्यानीतीशास्त्रीय सुखवादाविषयक भुमिकांचा परामर्श घेणार आहोत.

**आपली प्रगती तपासा.**

१. सुखवाद म्हणजे काय ?

२. सुखवादाचे प्रकार सांगा.

३. मानसशास्त्रीय व नीतिशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करा.

## २.३.२ जेरेमी बेंथॅमचा परार्थ/नीतिशास्त्रीय सुखवाद (परिणामात्मक उपयुक्तता वाद)

जेरेमी बेंथॅम या ब्रिटिश तत्वज्ञाने सुखवादाची मुलतत्वे शोधावी यासाठी नीतीआणि कायदे यांची मुलतत्वे हा ग्रंथ लिहिला. त्यांची मूळ भूमिका नीतीशास्त्राची नसून विधीशास्त्राची होती. परंतू त्यातूनच त्यांनी सुखनिष्ठ उपयुक्ततावाद किंवा सार्वत्रिकसुखवाद सांगितला आहे.

**बेंथॅमचा नीतिशास्त्रीय सुखवाद :-**

बेंथॅम हा परार्थ सुखवादी विचारसरणीचा असला तरी तो आपल्याविचारातस्वार्थप्रवृत्तीकडे झुकलेला दिसतो. म्हणून त्याच्या विचारात स्वार्थधिष्ठित परार्थसुखवाद असे म्हणतात. बेन्थॅमच्या मतानुसार प्रत्येक व्यक्तिच्या ठिकाणी स्वः प्रेम (Self Love) वपर प्रेम (Benevolence) अशा दोन सहज प्रवृत्ती दिसून येतात. मानसशास्त्रीयदृष्टिकोनातून पाहिल्यास प्रत्येक व्यक्तिची स्व प्रेमाची भावना अधिक प्रबळ असते.कारण जेंव्हा अधिक निर्णायक परिस्थिती निर्माण होते. तेंव्हा व्यक्तिला परप्रेमाच्यातुलनेत स्व-प्रेमच अधिक महत्वाचे वाटते.माणसाचे कल्याण कशात आहे हे नुसतेच कल्पनेने ठरविणे मान्य नाही.

बेन्थॅमच्या मते, प्रत्येक माणून सुखाच्या मागे लागला आहे. निसर्गानेच तशी रचना केली आहे. या नैसर्गिक रचनेचा आधार घेवून सुखवादास बेंथॅमने परमप्राप्तव्य मानले आहे.त्यांची सुखवादाची विचार सरणी मानसशास्त्रीय सुखवादावर आधारलेली आहे. म्हणून्त्यांच्या विचारसरणीला मानसशास्त्रीय सुखवाद असे म्हटले जाते. पण त्यांनी नीतीशास्त्रीय सुखवाद सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या विचारसारणीलासुखनिष्ठ उपयुक्ततावाद किंवा सार्वत्रिक सुखवाद किंवा उपयुक्ततावाद अशी नावे असली तरी त्याच्या विचारात कृतीच्या उद्दिष्टांना म्हणजेच ज्या कृतीचे परिणामअधिकाधिक सुख देणारे असतील ती कृती वा तिची उपयुक्तता चांगली 'अधिकतम लोकांचे अधिकतम हित (सुख)' असा उपयुक्ततावादाचा दृष्टिकोन त्यांच्या

विचारसरणीचा आहे. परंतू सुख हे परम प्राप्तव्य का मानावे? याचे स्पष्टीकरण बेंथॅमने दिलेली नाही. बेंथॅम म्हणतो की, सुख आणि दु:ख या दोन सार्वभौम अधिपत्याच्याप्रभूत्वाखाली निसर्गाने माणसाला ठेवले आहे. माणसाची ओढ केवळ सुखाकडे व दु:ख टाळण्याकडे आहे असे त्यांचे मत आहे.

बेंथॅमने सुखाची एकूण सात मोजमापे सांगितली. या सात परिमाणांच्या आधारावर सुखाचे मोजमाप करुन कृतीची युक्तता ठरवावी. सुखाचा आकार लक्षात घेवून त्याने ती मोजमापे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत -

१) तीव्रता. (Intensity)
२) दीर्घकाळता. (Duration)
३) फलद्रुपता. (Fruitfulness)
४) निश्चितता (Certainity)
५) शुद्धता (Purity)
६) निकटता (Nearness)
७) व्यापकता (Extensity)

बेंथॅमच्या सुखवादामध्ये कृतीच्या उद्दिष्टाला महत्व आहे. कर्त्याचा हेतू गौण आहे. मानवी सुखाची विपुलता हे उद्दीष्ट आहे. नैतिकतेचे मोजमाप या उद्दिष्टांच्या अनुरोधानेच करावे. बेंथॅम हा उपयुक्ततावादी आहे. त्याच्यापुढे अखिल मानवाच्याजास्तीत जास्त सुखासाठी मानवास उद्युक्त कसे करावयाचे हा प्रश्न आहे. स्वत:चे सुख मिळविणे ही नैसर्गिकप्रेरणा आहे. त्यातूनच सुख कसे निर्माण करता येईल.त्याला बेंथॅमने नीतीचे अनुशासक (Sanctions of Morality) असे म्हटले आहे. नीतिला अनुसरुन असणाऱ्या आचरणासाठी प्रेरणा कुठून आणायची हाबेंथॅमपुढे प्रश्न होता. उपयुक्ततावादाच्या दृष्टीने ज्या कृती युक्त होत आणि ज्या कृतीउपयुक्त यांच्या बाबतीत जाणीवपूर्वक भावना निर्माण करण्यात येते, असे बेंथॅमचे मत आहे. त्यामुळेच अधिकांचे अधिक सुख (बहुतांचे बहुत सुख) या आदर्शकडे पोहोचता येईल. 'जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख किंवा अधिकात्म लोकांचे अधिकात्म सुख' (Greatest happiness of the greatest number) यातत्वाचा त्याने उपयोग केल्यामुळे त्याच्या नैतिक विचाराला सार्वत्रीक सुखवाद किंवा उपयुक्ततावाद असे म्हणतात. सुखाचे मोजमाप करताना त्याचे पुढील गुणधर्म लक्षात घ्यावे असे बेंथॅमचे म्हणणे आहे.

बेंथॅमची सुखावरील मोजमापे पुढीलप्रमाणे :

### १) तीव्रता (Intensity) :

दोन सुखांपैकी जे सुख आपल्याला अधिक तीव्रतेने जाणवते त्या सुखाचे परिणाम अधिक असते. असे सुख ज्या कृतीतून निर्माण होते तीच कृती नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजावी अर्थात ही तीव्रता संदर्भानुसार बदलणारी असू शकते. सौम्य सुखापेक्षा तीव्र सुख अधिक आकर्षक असते. उदा. अन्न सेवनातून मिळणारे सुख हे कादंबरी वाचनातून मिळणाऱ्या सुखापेक्षा तीव्र वाटत असेल तर अन्न सेवन हे नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजावे. जेष्ठ मधापेक्षा मधाची गोडी तीव्र असते.

**२) दीर्घकाळता (Duration) :**

दोन सुखांपैकी जे सुख अधिक काळ टिकणारे असते ते श्रेष्ठ समजावे. अल्पकालीन टिकणाऱ्या सुखापेक्षा दिर्घकालीन टिकणारे सुख हे अधिक प्रिय असते. फटाकेउडवण्याच्या सुखापेक्षा फराळाचे जिन्नस खाण्यातील सुख अधिक टिकते.

**३) फलद्रुपता (Fruitfulness) :**

काही सुखे ही निव्वळ सुखे असतात. त्याच्यापासून काहीही नवनिर्मिती होतनाही. परंतु काही सुखे अशी असतात की, जी स्वतःपासून इतर सुखाची निर्मितीकरतात. अशा सुखानाच श्रेष्ठ समजावे.

**४) निश्चितता (Certainity) :**

अनिश्चित सुखापेक्षा जे सुख निश्चित असते तेच श्रेष्ठ समजले पाहिजे. झोपणे या सुखापेक्षा फिरावयास जाण्याचे सुख पसंत करावे कारण फिरण्यामुळे सुख तर मिळते पण आरोग्याचेही सुख मिळते.

**५) शुद्धता (Purity) :**

दुःख मिश्रित नसलेले सुख हे दुःखमिश्रित सुखापेक्षा अधिक चांगले असते.अनेक दुःखे सोसून धंद्यात खूप नफा मिळवण्यापेक्षा धोपटमार्गी कमी पगाराची नोकरी पत्करावी.

**६) निकटता (Nearness) :**

दुरस्थ सुखापेक्षा समीप असणारे सुख परिणामदृष्ट्या श्रेष्ठ असते. म्हणूनच असे म्हणता येईल की, हातचे सोडून पळत्याच्या मागे लागू नये. काही काळानंतरमिळणाऱ्या सुखापेक्षा ताबडतोब मिळणारे सुख अधिक पसंद केले जाते. चार वर्षांनी काश्मीरची सफरकरण्यापेक्षा यंदा महाबळेश्वरला जाणेच बरे.

**७) व्यापकता (Extensity) :**

दोन सुखांपैकी ज्या सुखाचा परिणाम जास्तीत जास्त लोकांवर होतो, त्यासुखाचेमोजमाप अधिक असते. असे सुख ज्या कृतीतून निर्माण होते तीच नैतिक समजावी.

अशा प्रकारे या सात परिणामांच्या आधारावर सुखाचे मोजमाप घेऊन आचरणाची शुद्धाशुद्धता ठरवावी. या पद्धतीप्रमाणे जे आचरण अधिकांश व्यक्तींच्या अधिकांश सुखसंपादनात उपयुक्त ठरेल ते सदाचरण समजले जाते. म्हणून या वादाला उपयुक्ततावाद असे म्हणतात. या सर्व गुणधर्मावर विचार करुन सुखाची निर्मितीकरावी. असे सांगितल्यावरसुखाचे वाटप करण्यासाठी त्याने न्यायाचे एक तत्व सांगितले. ''प्रत्येक माणसाला एकम्हणून मोजावे आणि कोणालाही तो इतराहून कोणी अधिक आहे, असे मोजू नये.''(Every one is to count for one and nobody for more thanone).

उपयुक्ततावादी नैतिक विचारात कृतीच्या उद्दीष्टांना महत्व असते.अधिकाधिक मानवी सुख प्राप्त करणे हे कृतीचे उद्दिष्ट होय कृतीच्या उद्दिष्टांमूळेमिळणाऱ्या सुखासंबंधी उपयुक्ततावादी तत्ववेत्याला विचार करण्याचे कारण नाही.त्याचा मुलभूत प्रश्न नैसर्गिक प्रेरणेचा उपयोग करुन असे कोणते उपाय योजावेत की,ज्यांमुळे व्यक्तीच्या स्व-सुखार्थ केलेल्या

प्रयत्नांतून आपोआपच सार्वजनिक सुखाचा संचय वाढ होत जाईल. बेंथॅम व मिल्ल यांना फक्त नैतिक कृती करण्यास व्यक्तीसकसे उद्युक्त करता येईल? हा महत्वाचा प्रश्न वाटतो. बेंथॅमने उपयुक्ततावादी विचारात ज्या रीतीने व्यक्तीला सार्वजनिक सुखातभर घालण्यासाठी उद्युक्त करता येईल. त्या रीतींना नीतिचे अनुशासन असे म्हटलेजाते. उपयुक्ततावादाच्या दृष्टीने कृती युक्त होते आणि ज्या कृती अयुक्त आहेतयाबाबत जाणीवपूर्वक भावना समाजात निर्माण करण्यात येते हेच नीतीचे आंतरिकअनुशासन होय. कारण या भावना सद्‌सद्विवेक बुद्धीकडून निर्माण होतात. यामूळेचबहुतांचे बहुत सुख किंवा पुष्काळाचे पुष्कळ सुख या उद्दिष्टाकडे पोहचता येईल. याबरोबरच बेंथॅमने नीतिच्या बाह्य अनुशासकांविषयी विचार मांडले आहेत. त्यांच्या मते,बाह्य अनूशासके ही शासकीय सामाजिक, धार्मिक क्वचित नैसर्गिक ही असू शकतात. जर व्यक्ती स्वार्थ प्रवृत्तीची आहे तर मग ती व्यक्ती परार्थासाठी का झटते?या प्रश्नाला उत्तर देतांना बेन्थॅम म्हणतो की, चार प्रकारच्या नीती प्रेरकांमुळे व्यक्ती स्वार्थी असून देखील परार्थासाठी झटते. ती चार नीतिप्रेरके (अनुशासके) पुढीलप्रमाणे

**नीतिप्रेरके/अनुशासके :**

अ) नैसर्गिक/भौतिक अनुशासके
ब) राजकीय अनुशासके
क) सामाजिक अनुशासके
ड) धार्मिक अनुशासके

नीति-अनुशासकाची (प्रेरकाची) कल्पना ही मुख्यतः नीतीकडे पाहण्याच्यावैध वा वैधानिक दृकष्टकांनातून पुढे आलेली दिसते. म्हणजेच तिच्या बाह्य नियमात्मकअधिकाराशी निकट संबंध आहे. अनुशासक याचा मूळ अर्थदृढीकरण वा स्थिरीकरणकरणारा घटक. या दृष्टीने कायद्यांना बळकटी आणून त्यांची कार्यवाही प्रभावी करणाऱ्या शिक्षेला उद्देशून अनुशासक ही कल्पना मांडली गेली.नीतिअनुशासकांचीचर्चा बेंथॅम व मिल्ल यांनी विस्तृतपणे करुन अनुशासकाच्या मूळच्या अर्थाचा नैतिकविचारात विस्तार केला, त्यानुसार कर्तव्यविषयक नियमांना दृढता प्राप्त करुन देणाऱ्याकोणत्याही गोष्टींना, म्हणजेच कर्तव्याचरणास प्रेरक असलेल्या हेतूंना, नीतिअनुशासके किंवा नीति-प्रेरके असे म्हटले जाते. सुखवादानुसार सुखमय व दुःखमयया मूलभूत प्रेरणा असल्याने अनुशासकेही सुख-दुःखकारक स्वरुपाची असतात.

बेंथॅमने अनुशासकांचे चार प्रकार सांगितलेले आहेत. शारीरिक, राजकीय, नैतिक व धार्मिक.

**अ) नैसर्गिक/भौतिक अनुशासके :**

जेव्हा सुख वा दुःख निसर्गतः ओघाने प्राप्त होते तेव्हा त्यास शारीरिकअनुशासक म्हणतात. उदा. अजीर्णाने होणारे क्लेश. निसर्ग नियमानुसार येणारी काहीसुखे आणि दुःखे आपल्या नैतिक आचरणाला प्रेरणा देतात. उदा. अतिरेकीसुखोपभोगांनी आपली गात्रे शिथिल होतात आणि त्यांचे सुखोपभोगाचे सामर्थ्यच क्षीण होते ही गोष्ट त्या अतिरेकापासून आपल्याला वाचविण्यास कारणीभूत होते. यात संकल्पाचा किंवा अध्यवसायाचा संबंध नसतो.

**ब) राजकीय अनुशासके :**

कायदेभंगास होणारे सरकारी शासन हे राजकीय अनुशासकाचे उदाहरणहोय. चोरी,खून इत्यादि गुन्ह्यांना शासनसंस्थेचे प्रतिनिधी दंड देतात आणि त्यामुळेआपण त्या कृत्यापासून अलिप्त राहतो. यात शासकाच्या अध्यवसायाचा संबंध येतो.

**क) सामाजिक अनुशासके :**

अधिकार नसलेल्या अशा सर्वसामान्य जनांच्या अध्यवसायाचा जेथे संबंधयेतो तेथे नैतिक अनुशासक प्रभावी असते. समाजातील व्यक्ती स्वार्थी आचरणाचीनिंदा करतात आणि परोपकारी आचरणाची स्तुती करतात. उदा. वाळीत टाकणे,नैतिक बाबतीत स्तुती अगर निंदा करणे इत्यादी.

**ड) धार्मिक अनुशासके :**

जेव्हा सुखदु:खांचा संबंध दैवी ईहेशी जोडला जातो तेव्हा ते धार्मिकअनुशासक म्हटले जाते. परमेश्वर सत्कर्माबद्दल बक्षीस देतो आणि दुष्कर्माबद्दल दंडदेतो या विश्वासामुळेही माणसे सत्कर्माकडे ओढली जातात आणि दुष्कार्मापासून अलिप्तराहतात. उदा. स्वर्ग, नरक इत्यादी. वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, व्यक्तीच्या केवळ नैतिकच नव्हे तरसामाजिक, राजकीय, धार्मिक अशा सर्वांगीण जीवनात व तत्संबंधी विचारांतहीअनुशासक ही संकल्पना महत्वाची आहे. तिच्या चर्चेचे श्रेय बेंथॅम व मिल्ल यांच्याकडेअसले तरी इतर नीतिशात्रज्ञांच्या विचारातही ती व्यापक अर्थाने भिन्न-भिन्न रुपात अभिप्रेत आहेतच. जेथे नैतिक अधिकाराचा प्रश्न उद्‌भवतो तेथे नीति-अनुशासकेहीआलीच- मग ती बाह्य, आंतरीक वा अन्य कोणत्याही स्वरुपाची असोत. अनुशासक हीकल्पना मुख्यत: ‘बक्षीस व शिक्षा’ या मानसशास्त्रीय तत्त्वांवर आधारलेली असल्यानेसर्वसामान्य जनांच्या वर्तनास लागू पडते, पण हीच तिची मर्यादाही आहे. ‘श्रेष्ठांच्यानीती’ला (संत वा साधुपुरूष) ती लावता येत नाही. या चार नीती प्रेरकांकडे बक्षिस व शिक्षा अशा दोन शक्ती असतात. मनुष्याचास्वभावच असा असतो की त्याला बक्षिस प्रिय व शिक्षा अप्रिय असते.

**आपली प्रगती तपासा**

१) सुखाची मोजमापे (परिमाणे) कोणती ?

२) नीतिशास्त्रातील उपयुक्ततावादातील नैतिक अनुशासके कोणती ?

३) बेंथॅमचा नीतिशास्त्रीय सुखवाद काय आहे ?

**२.३.३ परिक्षण:**

बेंथॅमने सुचविलेली सुखाची मोजमापे व्यावहारिक नाही. त्यांचा कृतीमध्ये वापर करणे शक्य नाही. बेंथॅमच्या मतानुसार दु:खापेक्षा सुखची मात्रा अधिक असणे हीत्या कृतीच्या योग्यतेची निश्चिती होय. उलट सुखापेक्षा दु:खाची मात्रा अधिक असणेत्या कृतीच्या अयोग्यतेची

निश्चिती होय. बेंथॅम म्हणतो. 'सुख मोजा व दु:ख मोजा, जे शिल्लक असेल त्यावरुन कृतीच्या योग्यायोग्यतेचा प्रश्न सुटेल.' परंतु सुख किंवा दु:ख या मानसिक घटना असल्यामुळे त्याचे व्यक्तिबाह्य अशा साधनानी मोजमाप करणे शक्य नाही. सुखालाच माणसाचे परमप्राप्तव्य का मानावे ? म्हणून याचा विचार बेंथॅमने केला नाही. त्याच्या मते, प्रत्येक माणूस सुखाच्या मागे आहे. प्रत्येकास अनुभवास येते.मानवी मनाच्या रचनेचा नैसर्गिक आधार घेऊन सुखालाच माणसांचे परमप्राप्तव्येबेंथॅमने मानले आहे. म्हणूनच बेंथॅमच्या विचारसारणीला ''मानसशास्त्रीय सुखवाद''असे म्हटले जाते. तर माणसाच्या विशिष्ट मनोरचनेमुळे ते सुखाची इच्छा करीत असतील तर तशी इच्छा करणे हा मानसशास्त्रीय नियम होईल. त्याला नैतिक उपपत्तीम्हणता येणार नाही. माणसाने सुखाची इच्छा का करवी ? याचा शोध घेतला तर तोनैतिक सिद्धांत म्हणून मानता येतो. असा प्रयत्न जॉन स्टूअर्ट मिल्ल याने केला. तसाप्रयत्न बेंथॅमच्या लिखाणात आढळत नाही. बेंथॅमने मानवाच्या नैसर्गिक प्रेरणेवर भर देऊन अधिकाधिक सुख मिळविणेएवढेच उद्दीष्ट समोर ठेवले. त्यामुळे त्याच्या विचार सरणीला मानसशास्त्रीय सुखवादअसे म्हणतात. परंतु सुख प्राप्त करणे ही एक नैसर्गिक प्रेरणा होय. तिला माणसाचेपरमप्राप्तव्य का मानावे ? याचे समर्थन करण्याचा प्रयत्न बेंथॅमने केला नाही. बेंथॅमच्या मते, उपयुक्ततावादाचे नैतिक ध्येय परसुख आहे आणि तोच असेहीम्हणतो की, परसुखसंपादनात आपले सुख साधले जाते. म्हणून आपण परसुखार्थ झटतो किंवा झटावे. परंतु या दोन विधानांमध्ये विरोध दिसून येतो. पहिल्या विधानातपरसुख साध्य ठरते तर दुसऱ्या विधानात तेच परसुख स्वसुख संपादनाचे साधन असल्याचे दिसून येते. याप्रमाणे बेंथॅमचा परार्थसुखवाद शेवटी स्वार्थसुखवादात अंत पावतो. म्हणूनच बेंथॅमच्या नैतिक सुखवादाला परार्थसुख वाद म्हणताना स्वार्थाधिष्ठित परार्थसुख वाद म्हणून मानावे लागते.

**आपली प्रगती तपासा**

१) बेंथॅमच्या नीतिशास्त्रीय सुखवादाचे परिक्षण स्पष्ट करा.

___

___

___

___

___

## २.३.४ मिल्लचा उपयुक्तता वाद / गुणात्मक उपयुक्तता वाद (Mill's Utilitarianism)

जॉर्ज स्टूअर्ट मिल्ल हा एक इंग्रज तत्वज्ञ व नीतीपंडित होता. त्याने आपल्यानैतिक सिद्धांतास 'उपयुक्ततावाद' असे नाव दिले. त्याच्या नैतिक सिद्धांतानुसारकृतीच्या युक्तायुक्तेचा एकमेव निकष म्हणजे कृतीचा परिणाम होय. ज्या कृतीमुळे जास्तीत-जास्त लोकांचे सुख निर्माण होईल ती कृती योग्य होय. हे मत प्रतिपादनकरण्यासाठी त्याने 'उपयुक्ततावाद' (Utilitarianism) हे पुस्तक लिहिले. जॉर्ज स्टुअर्ट मिल्ल ने उपयुक्ततावादी किंबहुना नीतीशास्त्रीय सुखवादाचापूरस्कार केला आहे. बेन्थॅम प्रमाणेच 'पूष्कळांचे पुष्कळ सुख' किंवा 'अधिकतमलोकांचे अधिकतम सुख' येथे साध्य होईल, तेच नैतिकदृट्या चांगले असे मिल्लमानतो, परंतु बेंथॅमच्या विचारापेक्षा मिल्लचे विचार काही बाबतीत भिन्न आहेत. बेंथॅमनेसुखाचे जे गणित सांगितले त्यात सुखाच्या परिणांमाचाच केवळ विचार केला

असूनसुखाच्या गुणवत्तेचा विचार केला नाही. त्यामुळे मिल्लचा उपयुक्ततावाद बेंथॅमच्याउपयुक्ततावादापेक्षा वेगळा ठरतो.

मिल्लच्या मते, निसर्गातच सर्व माणसे सुखाच्या पाठीमागे असतात. असा सर्वत्र अनुभव येतो. प्रत्येक माणसाला सुख हवे असते हे सिद्ध करण्यासाठी त्याने पुढीलप्रमाणयुक्तीवाद केला.''जे पाहिले जात असते ते पाहण्यायोग्य असते, जे ऐकले जात असतेते ऐकण्यायोग्य असते, जे इच्छीत असते ते वांछण्यायोग्य (इच्छीण्यायोग्य)असते, सर्व लोक सुख इच्छीतात, म्हणून सुख इच्छीण्यायोग्य असते.''

वरील युक्तीवादाप्रमाणे मिल्ल सुखवाद सिद्ध करतो. त्याने ''आपण जे जेइच्छीतो तेआपले सुख '' अशी सुखाची व्याख्या केली. या व्याख्येमधील सर्व माणसेसुखाच्या पाठीमागे असतात. हे विधान सिद्ध होत नाही. मिल्लच्या व्याख्येमध्ये अनेकदोष आढळून येतात. त्याच्या युक्तीवादात चक्रीय दोष निर्माण झाला आहे. णाणूस कशाची इच्छा करतो ? या प्रश्नाचे उत्तर तो सुखाची इच्छा करतो असे मिल्लचे मतआहे. पुन्हा सुख म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर माणूस ज्या कशाची इच्छा करतो ते मिल्लच्या या उत्तरातून काही एक निष्पन्न होत नाही.

इच्छीत गोष्ट प्राप्त झाल्यावर प्रत्येकाला इष्ट प्राप्तीचे सुख असते. कारण सुखाचा विचार घेण्यापूर्वी माणसाच्या एखाद्या गोष्टीची ही इच्छा होते. उदा. भूकेलेल्या माणसाला अन्नाची इच्छा होते. अन्न मिळून तृप्ती झाल्यास त्याला सुख प्राप्त होईल. म्हणजेच अन्नाची इच्छा हे सुखाचे कारण आहे. सुखामुळे इच्छा केली जाते. हे म्हणणे चूकीचे आहे. मिल्लने सदैव सुख हवेच असते. हे एक मानसशास्त्रीय सत्य आहे, असे वाटू लागते. मिंल्लने मांडलेल्या मानसशास्त्रीय सुखवादातून त्याला नीतीशास्त्रीय सुखवाद उभा करायचा आहे. 'सुख हेच प्राप्तव्य आहे' हे त्याने पुढील युक्तीवादामध्ये सिद्ध केले.'एखादा पदार्थ दृश्य आहे, त्याला पुरावा म्हणजे तो पदार्थ प्रत्यक्ष दिसतो हाच आहे. याहून दुसरा असूच शकत नाही. माणसे सुखाची इच्छाकरतात, याला पुरावा म्हणजे प्रत्यक्षात आपणास तसे दिसतेच हा होय.त्यामुळे सुख ही गोष्ट इच्छा करण्यास योग्य अशीच आहे.'

एखाद्या गोष्टीची इच्छा केली जाते. त्यावरून तशी इच्छा करणे योग्य आहे.असे सिद्धहोत नाही. दिसणे आणि दृश्य या दोन शब्दातील संबंधासारखा संबंध एखादी गोष्ट इच्छिणे आणि एष्टव्य (इच्छा) या दोन शब्दातील संबंध सारखे नाहीत. मिंल्लने वरील युक्तीवादात 'सुख हे इष्ट आहे' हे सिद्ध केले असेल परंतु सुख हे इच्छा करण्यास योग्य आहे का ? हे मात्र मिल्लने सिद्ध केले नाही. सुख हीच चांगली गोष्टआहे. असे मानले तर जितके सुख अधिक तितकेच ते अधिक चांगले आणि म्हणून आपण ते अधिकाधिक पसंत करणे असे निष्पन्न होईल. परंतु मिल्लने असे म्हटले आहेकी, 'सुखात लोळणाऱ्या डूकराच्या आयुष्यापेक्षा दुःखात होरपळणाऱ्यामाणसाचे आयुष्य पसंत करावे. मुर्ख माणसाच्या समाधानी आयुष्यापेक्षाअसमाधानी सॉक्रेटिसचे जीवन अधिक चांगले.'(It is better to human being dissatisfied than Pig satisfiled. It is better to beSocrates, dissatisfied than a fool Satisfied). याचाच अर्थ सुखात प्रकारभेद आहे. मिल्लचे म्हणणे असे की माणसाने केवळ अधिक सुख मिळवावे असे नाही तर, सुखाच्या दर्जाचाही त्याने विचार करावा, वरच्या प्रतीचे थोडे सुख हे खालच्या प्रतीच्या केवढ्याही मोठ्या सुखापेक्षा अधिक चांगले होय असे मिल्लने म्हटले आहे.

सुखा-सुखामध्ये प्रकारभेद केल्यास सुखवाद नष्ट होतो. जर सुख हेच मूल्य मानले तर जितके सुख अधिक तितके त्याचे मूल्य अधिक, परंतु असे होत नाही.कारण सुखाचे मूल्य सुखामुळे ठरत नाही. तर सुखाची प्रतवारी लावणे हेच खरे मूल्य आहे. सुखाचे प्रकारभेद मानण्याने सुखवादच नाकारला जातो. हे मिल्लच्या लक्षात आले नाही. ज्या अर्थी प्रत्येक व्यक्तीचे सुख हेच तिचे हित होय. त्या अर्थी सर्वांचे जास्तीत जास्त सुख हे कोणत्याही व्यक्तीचे हित होय. मिल्लने काढलेला हा निष्कर्ष चुक आहे. सुख एकमेकांत मिसळता येत नाही. एकाचे सुख आणि दुसऱ्याचे सुखमिळून मोठा सुखानुभव तयार होत नाही. यावरुन सांगितलेल्या सुखनिष्ठउपयुक्ततावादास त्याला योग्य तो पुरावा देता आला नाही, असे टीकाकार म्हणतात.

मिल्लने पुढील युक्तीवाद सिद्ध केला. ''प्रत्येक व्यक्तीचे सुख सर्व व्यक्तीच्या समूहाला इष्ट आहे. म्हणून सर्वांचे सुख प्रत्येकाला इष्ट आहे.'' मिल्लच्या या युक्तीवादातसमूहाभास नावाचा तर्कदोष निर्माण झाला आहे.

मिल्लच्या सुखनिष्ठ उपयुक्ततावादावरील काही आक्षेपांवर आपण विचार केला परंतु मिल्लच्या लिखाणात थोड्या विसंगती असल्यामुळे जरी आक्षेप घेता आला तरी अशी विसंगती निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मिल्लने जे लिखाण केले त्याचे उद्दिष्ट सामाजिक संस्थामध्ये बदल घडवून आणणे आणि मानवी जीवन अधिक समृद्ध करणे हे होते. त्याने 'उपयुक्ततावाद' या पुस्तकात अंतिम उद्दिष्टांच्या प्रश्नांबाबत साक्षात सिद्धांत देता येणे शक्य नसते. असे म्हटले आहे. ज्या अर्थी त्याने अंतिम उद्दिष्टे असा अनेकवचनी शब्दप्रयोग केला आहे. त्या अर्थी सुख हेच एकजिनसी, एकरस उद्दिष्ट माणसापेक्षा असते. असे मिल्ल मानत नव्हता.माणसाची अंतिम उद्दिष्टे घेऊ शकणाऱ्या चांगल्या गोष्टी अनेक आहेत. त्याचा संग्रह करणारी एखादी व्यापक रचना केली तर ती स्वीकारता येईल किंवा तिचा अव्हेर करता येईल. परंतु तिचा सिद्धांत देता येणार नाही असे मिल्लने स्पष्ट म्हटले आहे. माणसाला इष्ट असणाऱ्या सर्व गोष्टीचा निर्देश तो सुख या संकल्पनेने समाधान म्हणजे सुखच असते.

बेंथॅमने सांगितलेल्या सात सुखवादी परिमाणांमध्ये मिल्लने 'गुण' Quality हे आठवे परिणाम सुचविले आहे. यावरून बेंथॅमचा संवेदनात्मक उपयुक्ततावाद म्हणून व त्यामानाने मिल्लचा सुसंस्कृत उपयुक्ततावाद म्हणून मानावे लागते. तसेच बेंथॅमनेसुचविलेले चारही प्रेरक बाह्य स्वरूपाचे असल्यामुळे नैतिक प्रेरक म्हणून त्यांचा स्वीकार करणे उचित ठरत नाही. ते खऱ्या नीतिमत्तेला जन्म देऊच शकत नाही.म्हणून मिल्लने पाचवा आंतरिक प्रेरक मानला व त्याच्याद्वारा नैतिक जीवनाची व परार्थसुखवादाची संगती जुळवून आणली.

बेंथॅमने जी चार अनुशासके सांगितलेले आहेत ती शारीरिक (भौतिक), राजकीय,सामाजिक व धार्मिक ही होत. कमी-अधिक प्रमाणात ही सर्वच शारीरिक अनुशासके होत. कारण शेवटी या प्रत्येक बाबतीत सुख-दुःख हे शारीरिकपातळीवरीलच आहे. म्हणून मिल्ल बाह्य अनुशासके म्हणतो व त्याव्यतिरिक्तसद्सद्भावना हे महत्त्वाचे आंतरीक अनुशासक स्वीकरतो. सत्कृत्यांचे समाधान व दुष्कृत्यांची टोचणी ही सद्सद्भावनेच्या अनुशासकत्वाचे स्वरुप होय. तेमानसिकस्वरुपाचे व म्हणूनच अधिक प्रभावी आणि महत्त्वाचे आहे. सद्सद्भावनेचे महत्व ध्यानात घेऊनच बटलरने तीस केवळ अनुशासक न मानता नैतिक सर्वाधिकारी मानले आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) मिल्लचा नीतिशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करा.

२) मिल्लचा उपयुक्ततावाद स्पष्ट करा.

**२.३.५ मिल्लच्या उपयुक्ततावादाचे परिक्षण:**

मिल्लने सांगितलेल्या पहिल्या युक्तीवादात 'शब्दसाम्यमूलक' तर्कदोष घडला आहे. कारण 'जे इच्छिले जाते ते इच्छिण्या योग्य असते' हे बरोबर आहे काय?इच्छिलेल्या सर्वच गोष्टी असतात का? आपण वाईट गोष्टींची इच्छा केली तर ती इच्छिण्या योग्य असते का? अर्थातच नाही म्हणून मिल्ल चे मत योग्य वाटत नाही. मिल्लने सुख म्हणजेच Happiness व उपयूक्तता म्हणजे Utility या शब्दाचा पर्याय म्हणून वापरला आहे. म्हणून 'सुख' हेच अंतिम ध्येय आहे असे मिल्लचेम्हणने योग्य दिसते. असा अर्थ घेतला तर मिल्लचा सुखवाद आणि G.E. मूरच्या मतानुसार उपयुक्ततावाद यामध्ये तत्त्वतः फरक नाही असे वाटते.

मिल्लने सुखाचे श्रेष्ठ-कनिष्ठ असे प्रकार केले हे मूरला गैर वाटते. परंतु मिल्लच्यामनात 'सुख' या शब्दाचा अर्थ इष्ट गोष्टीची प्राप्ती आणि त्याचबरोबर असणारे समाधान असा होता. त्यामुळे इष्ट गोष्टीच्या दर्जा प्रमाणे त्यात फरक असणेशक्य आहे.

सुख ही इच्छा करण्यास योग्य अशी गोष्ट आहे. या मिल्लच्या मतावर मूरने कडाडून हल्ला केला आहे. एखादी गोष्ट घडते म्हणून ती घडावी किंवा ती चांगली आहे. असे त्यातूनच मूल्य निष्पन्न करावे याला मूर प्राकृतीकतेचा तर्काभास असे म्हणतात. परंतु माणसाचे प्राप्तव्य आणि त्याची इच्छा याचा संबंध तोडता येणार नाही. अंतिम कल्याणाची जी कल्पना करायची त्यासाठी माणसाची प्रकृती विचारात घेतलीच पाहिजे म्हणून मिल्ल म्हणतो त्याप्रमाणे माणसाच्या प्रकृतीत 'सुख' हा महत्वाचा घटक आहे. म्हणून कोणत्याही इच्छा केल्याशिवाय अंतिम कल्याणाची कल्पना कशी करणार?

सुखाची इच्छा करणे ही तर माणसाची प्रवृत्ती आहे. म्हणूनच प्राकृतिक तर्काभास हा तर्कदोष मिल्ल कडून घडला हे म्हणणे बरोबर नाही. जी.ई. मूरच्या म्हणण्याप्रमाणे एखादी गोष्ट चांगली आहे हे सिद्ध करणे, बुद्धीला अशक्य आहे. असाचविचार मिल्लने सुद्धा मांडला होता. त्याच्या मते अंतिम उद्दिष्टांच्या प्रश्नाबाबत साक्षात सिद्धता देता येणार नाही. म्हणून मिल्लने माणसाची उद्दिष्टचे कोणती असावीत याचा विचार केला. असा विचार करतांना मिल्लच्या शब्दरचनेत काही विसंगती असल्या तरी त्याच्या विचाराचा ओघ बरोबर होता.

**आपली प्रगती तपासा**

१) मिल्लच्या सुखवादाचे परिक्षण स्पष्ट करा.

## २.५ सारांश

ह्यूमचे नीतिशास्त्र हे प्रामुख्याने अनुभवावर, उपयुक्ततेवर व भावनावर आधारित आहे. तो विवेकबुद्धीच्या विरुद्ध नाही. परंतु विवेकबुद्धी ह्या नैतिक कृतींना प्रेरीत करीत नाही असे तो मानतो. विवेक बुद्धी ही विकारांची दासी असते असे तो मानतो. माणसांना स्वहित आणि समाजहित साधण्यासाठी जे जे करणे योग्य वाटते, ते त्याच्या भावनांच्या अनुषंगाने व्यक्ती निर्णय घेत असतो. त्याच्या विकारांनि म्हणजेच उत्कट भावनांनी प्रेरित होउन तो कृती करतो. ह्यूमची नितीविषयक भूमिका मुख्यतः अनुभववादी, भावनावादी व उपयुक्ततावादी आहे. सद्‌गुणांचे दोन प्रकार आहेत जे सद्‌गुण स्वतःप्रवृत्तीने असतात. परहितैवा, पितृवात्सल्य त्यांना नैसर्गिक सद्‌गुण म्हणतात, तर समता, न्याय यासारखे सद्‌गुण जे समाजहितासाठी आणि समाजस्वास्थ्यासाठी आवश्यक आहे त्यांना कृत्रिम सद्‌गुण म्हणतात.

कांटचा 'निरूपाधिक आदेशा'चा नियम सार्वदेशिक, निरूपाधिक, अनिवार्य व अनुभपूर्व स्वरूपाचा असून प्रज्ञेमध्ये अनुस्यूत असतो. त्याची जरी स्पष्ट जाणीव सर्वसामान्य माणसाला नसली तरी तो या नियमाचा दावा मान्य करतो. या नियमाने त्याचे नीतिविषयीचे निर्णय निर्धारित होत असतात व तो त्याच्या इष्टानिष्टतेच्या निर्णयाचा गमक व माप किंवा निकष असतो.

व्यक्ती व समाजाच्या समस्यांमध्ये अनेक घटक महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असतात या घटकांमध्ये महत्वाचा घटक म्हणजे अधिकार व कर्तव्याची योग्य जाणीव व त्यांचे आवश्यक त्या परिस्थितीनुरुप आचरण होय. प्रत्येकाला आपले जीवन परिपूर्ण बनविण्यासाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते. हे अवलंबित्व व्यक्तिच्या जन्मापासून ते मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत असते. आपल्या समस्यांमधून बाहेर येण्यासाठी आपणांस इतरांच्या सहकार्याची आवश्यकता असते. पण अशा वेळेस त्याने हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की, इतरांना त्यांच्या अडचणीत मदत करणे हे आपले कर्तव्य आहे.

कर्तव्य हे करावेच लागते. शिवाय कर्तव्य करत असतांना तेथे परतफेडीची अपेक्षा ठेवायची नसते. थोडक्यात अगदी निरपेक्ष भावनेने प्रत्येकाने आपल्या जीवनातील कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. हाच मुद्दा इम्यान्युएल कांट या जर्मन तत्त्ववेत्याने आपल्या नीतिमीमांसेस स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच भगवद्‌गीतेतील निष्काम कर्मयोगाची संकल्पना देखील कर्तव्याशी निगडीत आहे. कर्मे करतांना फलाची अपेक्षा न ठेवता 'ईश्वरार्थ' कर्तव्ये करावी ही गीतेची प्रमुख नैतिक शिकवण आहे.

सुखवाद ही एक नीतिशास्त्रीय ध्येयांची व मुल्यांची मीमांसा करणारी उपपत्ती आहे. मानवाच्या आचरणाचा चांगला वाईटपणा हा कृतीच्या परिणामांच्या सुखदु:खात्मक स्वरुपावर अवलंबून असतो असे सांगणाऱ्या नीतिमीमांसेला सुखवाद असे म्हणतात. सुखाचे दोन प्रकार पडतात १) मानसशास्त्रीय सुखवाद २) नीतिशास्त्रीय सुखवाद.

नीतिशास्त्रीय सुखवादाचे दोन प्रकार पडतात.
१) स्व-सुखवाद
२) परसुखवाद/परार्थ सुखवाद.

नैतिक सुखवादी उपपत्तीनुसार प्रत्येकाने अधिकाधिक सुख मिळवावे हे तत्व मान्य केले तर असे अधिकाधिक सुख कोणाचे ? सुख म्हणजे शारिरिक सुख नव्हे तर सुख म्हणजे चित्ताचे समाधान व आत्म्याचा संतोष होय.

ईश्वराच्या चिंतनातून मिळणारे सुख हे इंद्रियांपासून मिळणाऱ्या सुखापेक्षा श्रेष्ठ असते. समष्टीचे सुख नीतिचे ध्येय म्हणून स्वीकारण्यात व तसेच सुखा सुखामधील प्रकार भेद मान्य करण्यात मिल्लने सुखवादाला निश्चितच प्रतिष्ठा मिळवून दिली पण एक सुसंगत नैतिक तत्वज्ञान म्हणून त्याचे एकूण मत मात्र स्वीकारता येत नाही.

## २.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) कांटचा निरुपाधिक आदेशाचा सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.
२) कांटचे निरुपाधिक आदेश सांगून त्याचे मुल्यमापन करा.
३) कांटचे नीतिशास्त्र स्पष्ट करून, कांटचे निरुपाधिक आदेशाचे सिद्धांत स्पष्ट करा.
४) बेंथॅमच्या नीतिशास्त्रीय सुखवादाचे सविस्तर विवेचन करा.
५) सुखवाद म्हणजे काय ? नीतिशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करा.
६) स्वार्थ व परार्थ सुखवाद सविस्तर स्पष्ट करा.
७) टिपा लिहा.
   १) सोपाधिक आदेश
   २) कांटचे निरुपाधिक आदेश
   ३) सोपाधिक व निरुपाधिक आदेशातील फरक
   ४) सत्संकल्प
   ५) स्वार्थ सुखवाद
   ६) परार्थ सुखवाद
   ७) नीतिची अनुशासके
   ८) सुखाची परिमाणे.

❖❖❖❖

# घटक -३

## पर्यायी नीतिशास्त्रीय उपपत्त्या

## (ALTERNATIVE ETHICAL THEORIES)

### (स्त्रीवादी नितिशास्त्र व अस्तित्ववादी नीतिशास्त्र)

**घटक रचना :**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ संत अगस्तिन पर्यायी नैतिक उपपत्ती

३.३. स्त्रीवादी नीतिशास्त्र - कॅरोल गिलीगन

 ३.३.१ लिंगभेद - नि:पक्षपाती पुरुष आणि भावबंध (आस्था) असणाऱ्या स्त्रीया

 ३.३.२ स्व-प्रतिमा पुरुष विलगता आणि स्त्रीची संबंधता.

 ३.३.३ स्त्रीच्या नैतिक विकासाच्या अवस्था मानसशास्त्रीय दृष्टीकोन

 ३.४.४ कुणाची काळजी करता ?

 ३.५.५ मूल्यमापन

७.४ अस्तित्ववादी नीतिशास्त्र जिन पॉल सार्त्र

 ३.४.१ अस्तित्ववाद म्हणजे काय ?

 ३.४.२ सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र.

 ३.४.३ निवडीचे स्वातंत्र्य (Freedom of choice)

 ३.४.४ कुश्रद्धा (दांभिकता Bad faith)

 ३.४.५ असतेपणा आणि नसतेपणा (Being and nothingness)

 ३.४.६ मूल्यमापन

३.५ सारांश

३.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न


## ३.० उद्दिष्ट्ये

१) संत अगस्तिन यांची पर्यायी नैतिक उपपत्ती समजून घेणे.
२) त्यांनी मांडलेली नीतितत्वे कशी धर्माधिष्ठित आहेत ते तपासणे.
३) आधुनिक काळातील पाश्चात्य स्त्रीवादी नीतिशास्त्राचे आकलन करुन घेता येईल.
४) लिंगभेद, भावबंध किंवा आस्था असणाऱ्या स्त्रीया, स्त्रीची संबंधता, स्त्रीयांचा नैतिक विकास (Moral development) यांचा तसेच स्त्रीवादी नीतिशास्त्रचा (Feminist Ethics)अभ्यास करता येईल.

५) अस्तित्ववाद म्हणजे काय ? ही विचारसरणी समजून घेणे.

६) सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र जाणून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

पाश्चात्य देशात स्त्री मुक्तीच्या व स्त्री पुरुष समतेच्या विचारांना केंद्रस्थानी मानून अनेक प्रकारचे तात्त्विक सिद्धांत अनेक विचारवंतानी मांडले. त्यातून स्त्रीवादाची अनेक रुपे पुढे आली. त्यातीलच एक रुप म्हणजे स्त्रीवादी नीतिशास्त्र होय. स्त्रीवादी नीतिशास्त्र ही विचारसणी गेल्या दोन दशकापूर्वी उदयाला आली. ही विचारसरणी अमेरिकन स्त्रीलेखिका व मानसशास्त्राच्या प्राध्यापिका श्रीमती कॅरोल गिलीगन यांनी मांडून त्याचा पुरस्कार केला. स्त्रीयांची नैतिक विचारांमधील ठळक वैशिष्ट्ये कोणती हे सांगून भावबंधाचे (आस्थेचे) नीतिशास्त्र (Ethics of care) म्हणून स्त्रीवादी नीतिशास्त्राचे जोरदार समर्थन करुन स्त्री पुरुष समतेचे नैतिक तत्त्वज्ञान मांडले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी सत्ताशास्त्राला व चिद्‌वादी तत्त्वज्ञानाला विरोधीअसे अनेक विचार प्रवाह निर्माण झाले. या वैचारिक प्रवाहांनी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासालानवीन दृष्टीकोन दिले. यात प्रामुख्याने तार्किक प्रत्यक्षार्थवाद, विश्लेषणवाद, फलःप्रामाण्यवाद, नववास्तववाद, अस्तित्ववाद ह्या विचारप्रणाल्या होत. या विविधविचारप्रणाल्यांपैकी अस्तित्ववाद ही सत्ताशास्त्राला विरोधी अशी विचारप्रणाली आहे. याविचारप्रणालीचा पुरस्कार किर्केगार्द, कामू यास्पर्स, मार्शेल, हायडेगर व सार्त्र यातत्त्ववेत्यांनी केला. ते अस्तित्ववादी तत्त्वज्ञ म्हणूनही ओळखले जातात. त्यांनीमानवाच्या अस्तित्वाचा प्रमुख विचार मांडला. अस्तित्व व सारतत्त्व यांच्यात भेद करुनमानवी अस्तित्वाला केंद्रस्थानी मानून, मानवी समस्यांकडे पाहाण्याचा अस्तित्ववाद हाएक नविन दृष्टीकोन त्यांनी दिला. विशेषतः सार्त्र ह्या फ्रेंच अस्तित्ववादी तत्त्वज्ञानेअस्तित्ववाद व मानवतावाद व इतरही अनेक ग्रंथ लिहून त्यांने अस्तित्ववादीनीतिशास्त्राचे विचार मांडले. स्त्रीवादी नीतिशास्त्र व अस्तित्ववादी नीतिशास्त्र या दोनआधुनिक काळातील नीतिशास्त्रीय उपपत्त्या असून त्यांचा अभ्यास आपण या प्रकरणातकरणार आहेत.

## ३.२ संत अगस्तिन पर्यायी नैतिक उपपत्ती

संत अगस्तिन (सन ३५४ - सन ४३०)

संत अगस्तिन, हे ख्रिश्चन जगतामधील एक फार मोठे धर्मवेते व तत्वज्ञ होते. पाश्चिमात्य ख्रिश्चन संस्कृतीवर तसेच मध्ययुगीन पाश्चात्य तत्वज्ञानावर त्यांचा अत्यंत प्रभाव पडलेला दिसतो. त्यांच्या विपुल लेखनापैकी “City of God” व “Confessions” हे ग्रंथ विशेष महत्त्वाचे समजले जातात.

संत अगस्तिन यांना कायम प्राचीन व मध्ययुगिन तत्वज्ञानामधील दुवा समजण्यात येते. प्राचीन काळातील अभिजात ग्रीक तत्वज्ञान तसेच प्रामुख्याने प्लेटोत्तर विचारधारा त्यांनी मध्ययुगाच्या सुरुवातीच्या काळात धर्मतत्वज्ञानात आणली. अनेक विचारवंतांच्या मते ते जसे धर्मवेत्ते म्हणून श्रेष्ठ होते तद्वतच ते एक स्वतंत्र तत्वदार्शनिकही होते. अर्थात त्यांची संपूर्ण जडणघडण ही ख्रिश्चन युगामधील असल्याने त्यांच्या तत्वज्ञानाची पाळेमुळे ही कुठेना कुठे ख्रिश्चन धार्मिक विचारामध्ये रुजलेली आढळतात.

माणसाचे इच्छा स्वातंत्र्य, मानवी उत्पत्ती, मानवी नैतिकता, या विषयीचे धार्मिक ख्रिश्चन विचार, या सर्वांची, संत अगस्तिन यांनी सुंदर सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे व त्यामुळेच त्यांचे नैतिक सिद्धान्त निराळे ठरतात. रुढार्थाने प्राचीन, अर्वाचीन, सुखवादी व कर्तव्यवादी, अशी कोणतीच बिरुदावली त्यांच्या तत्त्वज्ञानाला लावता येत नाही. म्हणूनच त्यांच्या नीतिशास्त्राचा विचार आपण पर्यायी नीतिशास्त्र म्हणून करतो.

बॉनी केंट यांच्या मते, संत ऑसस्टीन, यांच्यासाठी नीतिशास्त्र म्हणजे दूसरे तिसरे काहीही नसून मानवी श्रेयसाचा, घेतलेला वेध आहे. अशा एका तत्वाचा शोध ज्यामुळे सर्व मानवजात सुखी होऊ शकेल.

संत अगस्तिन यांच्या काळात तत्वज्ञानाचे प्रामुख्याने ३ भाग होते. नीतिशास्त्र, भौतिक शास्त्र व तर्कशास्त्र. थोडक्यात 'शिव', 'सुंदर' व 'सत्य' ह्या मूल्यांचा शोध एकूण तत्वज्ञान करत होते. ख्रिश्चन धर्माच्या जडणघडणीच्या काळामध्ये अनेक नैतिक तत्वे तसेच निर्बंध मांडले गेले (जसे की सर्वच धर्मांमध्ये असतात) परंतु ख्रिश्चन नीतिशास्त्र प्रथम मांडण्याचा मान संत अगस्तिन यांचा आहे. प्लेटोने मांडलेले आत्मतत्व त्यांनी ख्रिश्चन धर्मज्ञानाशी जोडून घेतले आहे. प्रथमच अत्यंत स्वच्छपणे त्यांनी हा विचार मांडला की मनुष्याचे खरे स्वरूप हे बौद्धिक - आत्मिक आहे. तसेच शरीर हे आत्मिक उन्नतीचे निव्वळ बाह्य साधन आहे.

पुढे जावून संत अगस्तिन यांनी अशी मांडणी केली की, मनुष्याला सतत सुखाचा ध्यास लागलेला असतो. मनुष्याचे सुख खरे म्हणजे मृत्यु नंतर ईश्वरासी तदरुप होण्यात सामावले आहे. म्हणूनच ह्या भौतिक जीवनात मनुष्याने भौतिक देहिक सुखांच्या मागे न धावता केवळ आत्मसुखाचा ध्यास घेतला पाहिजे. वैचारिक सांस्कृतिक, आत्मिक, वर्तणुकीवर अधिक भर दिला पाहिजे म्हणूनच यापुढे एक पाऊल जावून ऑगस्तिन व ख्रिश्चन जग असे मानू लागले कि भौतिक सुखे ही केवळ कमी दर्जाची असतात असे नव्हे तर ती आत्मोद्धाराच्या वाटेतले फार मोठे अडथळे बनू शकतात.

ग्रीकांच्या 'युडिमोनिस्टिक' विचाराला अनुसरुन संत ऑगस्तिन यांनी 'मानवी सुखाला' कल्याणाला व शांतीला, त्यांच्या नितीशास्त्रामध्ये मध्यवर्ती स्थान दिले.

ऑगस्टिनच्या नीतिसिद्धान्त सोप्या भाषेत पुढीलप्रमाणे मांडता येईल.

आदम म्हणजे ईश्वराच्या पहिल्या मुलाने आपल्या पित्याची, साक्षात ईश्वराची आज्ञा पालन न केल्यामुळे त्याच्या शीरावर, कायमचे पाप आले आहे. तोच पापाचा भार आदमच्या प्रत्येक अपत्याच्या म्हणजे तुमच्या आमच्या सगळ्यांच्या शीरावर आहे व म्हणूनच त्याचे व आपले जीवन, दुःख दैन्य, यांनी वेढलेले आहे. ह्या सर्वांतून केवळ ईश्वर आपली सुटका करु शकतो. ह्या सुटकेसाठी मनुष्याला एक गोष्ट करावी लागणार आहे व ती म्हणजे, ईश्वराच्या पहिल्या आज्ञेचे 'ईश्वरावर प्रेम करा' केलेले विनाशर्त पालन, अनुसरण. जे हे करतात, करु शकतात, केवळ त्यांचा आणि त्यांचाच उद्धार ईश्वर करतो. अर्थात यात कुठेतरी माणसांच्या पाप / पुण्य, शुभ / अशुभ निवड करु शकणाऱ्या इच्छा स्वातंत्र्याचा बळी जातो.

संत ऑगस्टिन यांची सर्वसाधारण नितिशास्त्रामधील २ गृहीतकांच्या बाबतीत एक वाक्यता आढळते. ती म्हणजे.

१) सर्व मानव सदैव सुखाचा शोध घेत असतात.

२) काही भौतिकवादि माणसे मला वाटेल तसं वागत राहणे, यांस चुकून सुख समजतात. संत ऑगस्टिन यांच्या मते, ईश्वरावर निस्सिम, विनाशर्त प्रेम करणे हाच एकमेव सुखप्राप्तीचा मार्ग आहे. भरपूर संपत्ती असलेला मनुष्य मनातून अतृप्त असेल तर तो सुखी नसतो. संपत्ती वाईट नसते. पण केवळ संपत्तीला सुख समजणे, ही सुखाविषयीची गैरसमजूत आहे.

अर्थातच सेंट ऑगस्टिन ह्यांच्या नीतिसिद्धांतावर अनेक जणांनी विविधांगी टीका केली आहे.

उदा. आपल्या सुख कल्याणासाठी ईश्वरावर प्रेम करणे कितपत योग्य आहे? शिवाय जेव्हा आपण (Commandments) चे आज्ञापालन करण्यात 'इच्छास्वातंत्र' उरते का? हा ही नैतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा प्रश्न ठरतो. कारण इच्छा स्वातंत्र्य हा संपूर्ण नीतिमत्तेचा, नीतिवर्तणुकीचा गाभा / पाया आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) प्राचीन ग्रीक नीतिशास्त्राची सांगड, संत ऑगस्टिन यांनी ख्रिश्चन धर्मशास्त्राशी कशी घातली आहे.

२) संत ऑगस्टिन यांचा नीतिसिद्धांत विषद करा.

## ३.३ स्त्रीवादी नीतिशास्त्र - कॅरोल गिलीगन (FEMINIST ETHICS)

आधुनिक काळात स्त्रीजीवनाच्या अनेक अंगानी सांगोपांग विचार बुद्धिवादीविचारवंत करीत आहेत. समाजात स्त्रीयांविषयी भेडसावणाऱ्या ज्वलंत समस्याहीआहेत. हुंडाबळी, अमानुष छळ, बलात्कार, स्त्री भ्रूणहत्या इ. सामाजिक समस्याभेडसावतात. स्त्रीमुक्तीची समस्या, लिंगभेद, विविध क्षेत्रातील स्त्रीयांचे स्थान वभूमिका, स्त्रीपुरुष समानता, स्त्रीवादी नीतिशास्त्र या विविध अंगानी स्त्रीवादी आपलेविचारमंथन करीत आहेत. 'स्त्रीवादी नीतिशास्त्र' ही आधुनिक विचारधारा गेल्या दोनदशकापूर्वी उदयास आली. ही विचारप्रणाली अमेरिकन स्त्रीलेखिका व मानसशास्त्राच्याप्राध्यापिका श्रीमती कॅरोल गिलीगन यांनी प्रभावीपणे मांडली. कॅरोल गिलीगन यांनी१९८२ मध्ये ''विभिन्न आंतरिक आवाज'' या ग्रंथातस्त्रीवादी नीतिशास्त्राचे प्रभावीपणे समर्थन केले. कॅरोलगिलीगन यांचा जन्म इ.स. १९३६ मध्ये अमेरिकेत झाला. त्या हारवर्ड विद्यापीठातमानसशास्त्र व शिक्षणशास्त्राच्या प्राध्यापिका होत्या. त्यांनी स्त्रीयांचा नैतिक विचारांचाविकास होण्याचे ठळक वैशिष्ट्य विशद केले. नातेसंबंध जोडण्याची आस्था किंवाभावबंध हे ठळक वैशिष्ट्य सांगून स्त्रीवादी नीतिशास्त्रात स्पष्ट केले. त्यांनी भावबंधाचेवा आस्थचे नीतिशास्त्र यावर अधिक लक्ष केंद्रित केले. किंबहूनास्त्रीवादी नीतिशास्त्राचे समर्थन केले आणि स्त्री पुरुष समानतेच्या नीतिशास्त्राचापुरस्कार केला.

### ३.३.१ लिंगभेद - नि:पक्षपाती पुरुष आणि भावबंध (आस्था) असणाऱ्यास्त्रीया:-

गेल्या अनेक शतकांपासून नैतिक सिद्धांतवादी दोन प्रमुख मूल्यांबद्दलबोलतांना दिसतात. ती दोन मूल्ये म्हणजे न्याय व प्रेम होत. श्रेयस, युक्त, कल्याण,निर्णय व उपयुक्तता या नैतिक संकल्पानांमध्ये आज अनेक बदल पहावयास मिळतात.श्रीमती गिलीगन यांनी स्त्रीयांच्या विभिन्न आवजांची ओळख करुन देण्यासाठी 'भावबंध'(आस्था-आपुलकी) यासाठी मै हा इंग्रजी शब्द उपयोगात आणतात. गिलीगनच्यामते जबाबदाराची जाणीव हे वास्तव स्वीकारुन या जगातील विविध समस्यांचा वदु:खांचा नाश करता येतो. आपण जेव्हा जबाबदारी किंवा न्याय हे शब्द वापरतो तेव्हामाणसाकडून काही चुकीचे कृत्य झाले तर त्याला आपल्या कृत्याबद्दल अपराधीअसल्याचे वाटते. परंतु भावबंध वा आस्था असणाऱ्या स्त्रीया इतरांची दु:खे वा वेदनासमजून त्या इतर स्त्रीयांच्या दु:खांचा उपशम करण्यासाठी आपुलकीने वा ममतेने लक्षघालतात. ज्या स्त्रीया काहीच न करणाऱ्या म्हणून त्या स्वतः:च जबाबदार असतात.कॅरोल गिलीगन आपल्या 'विभिन्न आंतरिक आवाज' (In a different Voice) या ग्रंथात काही नैतिक संकल्पनांचा उहापोह करुन, न्याय, कर्तव्य, हक्क व अधिकार यानैतिक संकल्पनांचा विचार स्त्रीया कशा प्रकारे करतात हे प्रभावीपणे मांडतात.गिलीगनच्या मते स्वप्रतिमा (Self Image) ह्या न्याय व भावबंध या संकल्पनांनानैतिक निर्णय घेण्यासाठी आधारभूत ठरतात. त्यांनी परिमाणात्मक व गुणात्मकसंबंधावर आधारित भावबंध (आस्था) विषयक नीतिशास्त्र (Ethics of care) आणि न्यायाचे नीतिशास्त्र (Ethics of Justice) असा भेद स्पष्ट केला. व्यक्तिचे हक्कवा अधिकार, कायद्यापुढे सर्व समान, नि:पक्षपाती खेळ ही नैतिक ध्येये व्यक्तिनिरपेक्षम्हणून साध्य करावयाची असतात.

### ३.३.२ स्वप्रतिमा :-

**पुरुषाची विलगता आणि स्त्रीची संबंधता वा संलग्नता :-**गिलीगनने अनेक स्त्रीयांना आमंत्रित करुन आपल्या स्वत्वप्रतिमेविषयीचाआवाज काय सांगतो या विषयी विचारले असता त्यांना पुढील उत्तरे स्त्रीयांकडूनचऐकावयास मिळाली. याविषयी काही स्त्रीया अबोल वा अनुत्तरित झाल्या, तर काहीस्त्रीया अडखळत बोलत होत्या तर काही स्त्रीया एकत्रीतरित्या स्वत्वप्रतिमेविषयीचीअभिव्यक्ती करतांना आढळल्या की जो इतर स्त्रीयांना मार्गदर्शक ठरणारा होता. यास्त्रीवादी दृष्टीकोनात ओळख व जवळीकता यांचा प्रतिसाद पुढीलप्रमाणे दिसून आला.स्त्री ही आपल्यामध्ये एक माता, एक मुलगी, एक प्रियसी (प्रेमीका), एक मैत्रीण अशासंबंधते विषयी बोलतात. स्त्रीया या प्रामुख्याने नातेसंबंधाचे वर्णन करतात. या उलटपुरुष हे विलगतेबद्दल बोलतात. 'मी' असा शब्दप्रयोग करुन विलगतादर्शवितात. ते आत्मकेंद्री असतात. पुरुष आपल्याला मिळालेल्या यशाचे गमकव्यक्तिगत पातळीवर इतरांना स्वत:पासून वेगळेच समजतात. पुरुषाची ही विलगताएकांगी दृष्टीकोनाची आहे. अर्थात लहानमुलांच्या बाबतीत स्त्रीलिंगी व पुलिंगी स्वप्रतिमाह्या भाकित वा कपोलकल्पित कल्पनांसारख्या आहेत.

गिलीगनच्या मते पुरुषीप्रतिमा या स्त्रीलिंगी नातेसंबंधाच्या आकृतीबंधाशीसुसंगत असतात. साधारणपणे प्रौढ पुरुषाचे मैत्रीचे संबंध अधिक विस्तृत असले तरीत्यांच्यात मैत्रीची जवळीकता नसते. याउलट स्त्रीयांमध्ये अनेकांशी आपुलकी वाजवळीकता करण्याचा कल अधिक असतो. अनेक केंद्राशी वा संघटनेशी त्या संपर्कातराहून जवळीकता घडवून आणतात. नातेसंबंध जोडण्याचा केंद्रवर्ती दृष्टीकोनस्त्रीयांमध्ये असल्याने समूहाच्या कार्यात मिसळतात. त्या समूहाला एकत्रित धरुनठेवतात व आपुलकीने लक्ष घालून इतरांसाठी परीश्रमही करतात.

सिगमंड फ्रॉईड या मानसशास्त्रज्ञाने व्यक्तिमत्त्व विकासाची मनोलैंगिकउपपत्ती मांडली. मनोलैंगिक विकासाच्या सहा अवस्थांपैकी लिंगवर्ती अवस्थेत (३ ते ६वर्षापर्यंतच्या कालावधी) मुलांचा लैंगिक विकास कसा होतो? मुलांना लैंगिकभेदकसा समजतो? हे फ्रॉइडने सांगितले. गिलीगन ह्या फ्रॉईडने सांगितलेल्या लिंगवर्तीअवस्थेच्या पूढेही जाऊन लैंगिक भेदाच्या जाणीवा मुलांमुलींमध्ये व तरुणतरुणीमध्येकशा विकसीत होतात हे स्पष्ट करतात. पुरुष इतरांपासून विलग दिसतात. तर स्त्रीयाइतरांशी संबंध जोडण्याचा विचार करतात. लिंगभेद हा प्रामुख्याने कुमारांमध्ये दिसूनयेतो. तरुण स्त्री व पुरुष स्वजाणीवयुक्त असतात. तेव्हा त्यांच्याठिकाणी लिंगभेदओळख व नैतिक निर्णय घेण्याची जबाबदारी येते. कुमारवयीन मुले स्वतःला स्वतंत्र वस्वायत्त समजतो. तेव्हा त्याच्याठिकाणी न्यायाची एक नैतिक परिपक्वता विकसीतहोते. तो स्वतःकडे स्वायत्त म्हणून पहातो. या उलट कुमारवयीन मुली स्वतःला भावबंध(आस्था) विषयक अशा जबाबदारीने इतरांशी संबंधतेने वा संलग्नतेनेपहातात. ममता/आपुलकी ठेवतात.

### ३.३.३ स्त्रीच्या नैतिक विकासाच्या अवस्था एक मानसशास्त्रीय दृष्टीकोन:-

मानसशास्त्रज्ञांनी व्यक्ति विकासातील नैतिक व बौद्धिक विकासाचा अभ्यासकरुन त्यांनी असा निष्कर्षकाढला की, पुरुषांचे अनुभव बालीश म्हणून योग्य तरनैतिकतेविषयीचे विचार अयोग्य असल्यामुळे पुरुषांनी घालून दिलेले आदर्श वा मानदंडस्त्रीया या स्वीकारीत नाहीत. गिलीगन ह्या हारवर्ड विद्यापीठात लॉरेन्स कोहलबर्ग यांचेसहकारी म्हणून व प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या कोहलबर्गने सूचविलेल्या नैतिकविचारांच्या विकासातील अवस्था व सांगितलेल्या सिद्धांत कल्पनेचे नैतिक द्वंद्व (HYPOTHETICL MORAL DILEMMA) यांचा गिलीगनने अभ्यास करुनस्त्रीयांचा नैतिक विचार प्रक्रियेचा विकास कसा होतो यावर भर दिला. कोहलबर्ग या मानसशास्त्रज्ञाने नैतिक विचारविषयक विकासाच्या तीन प्रमुखपातळ्या (अवस्था) सांगितल्या. याचे विवेचन पहिल्या प्रकरणात केलेले आहे.

१) पूर्व सांकेतिक नैतिक पातळी (Preconventional Morality)
२) सांकेतिक नैतिक पातळी (Conventional Morality)
३) सांकेतिकोत्तर नैतिक पातळी (Post Convention Morality)

### ३.३.४ कुणाची काळजी करता ?

कोहलबर्गच्या नैतिक विकासाच्या वरील तीन प्रमुख अवस्थांचे प्रारुप (मॉडेल) घेऊन गिलीगनने त्यावर टीका केली व स्त्रीवादी नितिशास्त्राचे वा भावबंध (आस्था) विषयक नीतिशास्त्राचे तीन दृष्टीकोन मांडले.कोहलबर्ग पुरुषाच्या नैतिक विकासावर भर देतो. तर गिलीगन स्त्रीच्या नैतिकविकासावर भर देते. गिलीगनने स्त्रीच्या नैतिक विकासाच्या तीन अवस्था सांगितल्या.त्या पुढीलप्रमाणे-

### १) प्रारंभिक जीवनाकडून व्यक्तिगत जगण्याकडे :

या अवस्थेत स्त्रीया एक जीवाची हत्या म्हणून स्वतःमध्ये शोधतात. याप्रतिकूल जगात त्या स्वतः एकाकी आहेत असे त्यांना वाटते. १८ वर्षे वयाच्या सूसनया गर्भवती स्त्रीला आपल्या गर्भाविषयी विचारले असता, ती म्हणाली मला हा गर्भ नकोआहे. या स्त्रीच्या नकारार्थी व अहंकेंद्रवादी विचाराला गिलीगनने नैतिक शून्यवादअसे म्हटले आहे. खरोखर या स्त्रीला काय हवे असते, यानिवडविषयक समस्येला सामोरे जावे लागते. तसेच एक माता म्हणून मला मूल हवेआहे. अशा म्हणणाऱ्या स्त्रीला मला गर्भाची काळजी घ्यावयाची आहे असे म्हणतात. येथेनवीन जन्माला येणाऱ्या नवजात अर्भकाच्या संबंधाचा अर्थ अभिप्रेत आहे.

### २) आत्मत्याग एक चांगुलपणा (Goodness as self-sacrifice):

स्त्रीची नैतिकता ही कोहलबर्गच्या सांकेतिक पातळीवरील (Conventional level) अवस्थेत स्वार्थी न राहता इतरांसाठी त्याग करणारीहोते. नीतिमत्तेच्या या अवस्थेत इतरांची काळजी घेण्याची क्षमता, इतरांबद्दलची आवडविकसीत होते. स्त्रीचा आत्मत्याग एक चांगुलपणा ठरतो.

### ३) निवडीच्या परिणामांची जबाबदारी (Responsibility for consequences of choice):

कोहलबर्गची तिसरी अवस्था ही सांकेतिकोत्तर नैतिक विकासाची अवस्थाअसून हा विकास विवेकानुसार होतो. निवड केलेल्या गोष्टींच्या परिणामांची जबाबदारीही स्वच्छेने स्वीकारणे होय. गिलीगनने या प्रारुपाला (मॉडेलला) ''नितिमत्तेच्या निर्णयाचे सार'' (Essence of Moral decision) असे म्हटले आहे. अहिंसा यानैतिक तत्त्वाचे इतरांना व स्वतःला इजा किंवा दुःख न देणे हे ध्येय गिलीगनच्या याप्रारुपात येते.

### ३.३.५ मूल्यमापनः

स्त्री पुरुष असा नैसर्गिक लिंगभेद असला तरी येथे प्रश्न उपस्थित होतो की,नितिमत्तेत लिंगभेद कुठे असतो? पूर्वीच्या काही तत्त्ववेत्यांनी पुरुषापेक्षा स्त्रीया कमीबुद्धिमत्तेच्या असतात. असे म्हटले आहे. परंतु त्यांचे हे म्हणणे नीतिमत्तेला आधारभूतठरते का ? सामान्यतया असे आढळून येते की पुरुषापेक्षा स्त्रीयांमध्ये नैतिक विकासकमी होतो. वॉलस्टोन क्राफ्टचा ह्या विचाराला विरोध आहे. त्याच्या मते स्त्री पुरुषांमध्येएक बुद्धिशील प्राणी म्हणून दोहोंची बौद्धिक क्षमता सारखीच असते. याशिवाय दोहोंचाहीनैतिक विकास समान होतो. जरी त्यांच्यात लिंगभेद असला तरी बौद्धिक क्षमता वनैतिक विकास सारखाच होतो. स्त्रीमध्ये बुद्धिमत्ता कमी असते. याचे वॉलस्टोनक्राफ्टच्या मते स्त्रीयांना दिले गेलेले चुकीचे शिक्षण (Miseduction) होय.

गिलीगनने कोहलबर्गच्या नैतिक विकासाच्या अवस्थांचे प्रारुप (मॉडेल) एकबौद्धिक परिमाण व न्याय संकल्पना म्हणून नीतिमत्तेत गृहीत धरलेले आहे. गिलीगनने स्त्रीयांमधील नैतिक विकास हा त्यांच्या नातेसंबंध (Relationship) जोडण्यातीलत्यांचा भावबंध (आस्था) यावर अधिक प्रकाशझोत टाकून सुस्पष्ट केला आहे. काहीनीतिशास्त्रज्ञांच्या मते नीतीमत्तेच्या विकासावस्थेत न्याय या संकल्पनेपेक्षा भावबंध(आस्था) ही संकल्पना अधिक महत्त्वाची आहे.

पुरुषांपेक्षा स्त्रीया कमी सामाजिक भूमिका बजावतात. हा लिंगभेदाविषयीचा विचार समाजाने (Society) स्त्रीयांवर लादला आहे काय? आजही जगाच्या काही भागात पुरुषांप्रमाणेच शिक्षणाचे सर्व फायदे स्त्रीयांना दिलेले नाहीत. स्त्रीयांना सामाजिक कार्यात, सत्तेत व इतर क्षेत्रात संधी देण्यात सहभागी केलेले नाही. म्हणूनच वॉलस्टोनक्राफ्ट म्हणतात की स्त्री पुरुषाच्या लिंगभेदाविषयी समाजाने विषमतेची दिलेली वागणूकयोग्य नव्हे. स्त्री पुरुष समतेचा विचार ही बौद्धिक समज म्हणून समाजाला यायला हवी.स्त्रीपुरुषांमधील लिंगभेग, वांशिकभेद दूर ठेवून स्त्री पुरुष समतेची सामाजिक वराजकीय तत्त्वज्ञांनी मांडणी केली पाहिजे असे गिलीगनही म्हणतात. त्यांनी स्त्रीवादीनीतिशास्त्रात आधुनिक पद्धतीने मांडलेला नैतिक विकासाच दृष्टीकोन महत्त्वाचा आहे.त्यांनी स्त्रीवादी नितिशास्त्रात दिलेले योगदान आधुनिक काळाशी सुसंबंधीत आहे.

**आपली प्रगती तपासून पहा :-**

१) भावबंध (आस्था) विषयक नीतिशास्त्र व न्यायाचे नीतिशास्त्र यामधील भेद सांगा.

२) स्वप्रतिमेबद्दल पुरुषाची विलगता व स्त्रीयांची संलग्नता कशी दिसून येते ?

३) गिलीगनने स्त्रीच्या नैतिक विकासाच्या कोणत्या अवस्था सांगितल्या ?

४) गिलीगनने स्त्रीवादी नीतिशास्त्राचे समर्थन कसे केले ?

## ३.४ अस्तित्ववादी नीतिशास्त्र जिन:- पॉल सार्त्र

'अस्तित्ववाद (Existentialism) ही विसाव्या शतकातील सत्ताशास्त्राला वचिद्वादी तत्त्वज्ञानाला एक विरोधी विचारप्रणाली आहे. ही विचारप्रणालीमानसघटनाशास्त्राची सुधारित मांडणी आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.अस्तित्ववादात ''मानवाच्या अस्तित्वाचा'' प्रमुख विचार मांडलेला आहे. याविचारप्रणालीचा पुरस्कार किर्केगार्द, यास्पर्स मार्टिन हायडेगर, मार्सेल, कामु व सार्त्र इ.तत्त्ववेत्यांनी केला. अस्तित्ववाद्यानी मानवी जीवनातील भयानक अर्थशून्यता, व्याकूळता, भय, भीती, निराशा, अस्वस्थता ताण-तणाव, काळजी चिंता, संघर्ष, मृत्यूइ. संकल्पनांचे विश्लेषण करुन मानवी अस्तित्वाचा सखोल विचार केला. मानवीजीवनाचे सार, मानवी जीवनाचा अर्थ व मानवी जीवनाची मूल्ये व नीती या प्रश्नांकडेपहाण्याची अस्तित्ववाद ही प्रमुख विचारप्रणाली होय. या विचारप्रणालीत 'मानवी प्रश्न'केंद्रस्थानी मानून मानवी चिंता, निराशा, भय प्रेम, संघर्ष, व्याकुळता, सार, मृत्यू,स्वातंत्र्य या संकल्पनांचे विश्लेषण करुन मानवी जीवनाविषयी सूक्ष्म व सखोल चिंतनअस्तित्ववाद्यांनी केले. अस्तित्ववादी विचारप्रणाली ही आधुनिक काळातील वैचारिकचळवळ आहे.

### ३.४.१ अस्तित्ववाद म्हणजे काय ?

सोरेन किर्केगार्द हा डॅनिश तत्त्वज्ञ आधुनिक अस्तित्ववादाचा जनक मानलाजातो. किर्केगार्द, यास्पर्स व मार्शेल हे आस्तिक अस्तित्ववादी तर मार्टिन हायडेगर वसार्त्र हे नास्तिक अस्तित्ववादी होते. ग्रीक तत्त्वचिंतक सॉक्रेटिस याच्या विचारातअस्तित्ववादाची बीजे दिसतात. भारतीय तत्त्वज्ञानात अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा विचारगौतमबुद्धांच्या विचारात दिसून येतो. सॉक्रेटिस व गौतम बुद्धांनी मानवी अस्तित्वमूलकविचार प्रथम मांडले. २० व्या शतकात 'अस्तित्ववाद' हा शब्द सारेन किर्केगार्देच्याचिंतनातून पुढे आला. अस्तित्ववादातील अस्तित्व हा शब्द जगाचे अस्तित्व, ईश्वराचेअस्तित्व, वस्तुंचे अस्तित्व या शब्दांपेक्षा वेगळा आहे. ''**अस्तित्व म्हणजे मानवाचेअस्तित्व, माझे अस्तित्व**'' अशा अर्थाने वापरला आहे. मानवी अस्तित्व म्हणजे उच्चविकासासाठी झटत असलेले मानवी व्यक्तिमत्त्व होय. अस्तित्ववाद म्हणजे मानवाचेस्वत्व, स्वातंत्र्य, स्वतः निर्णय घेण्याची जबाबदारी व त्यानुसार निर्भयपणे कृती करणेहोय, यातच माणसाचे अस्तित्व आहे. किर्केगार्दने अंतर्मूख होऊन प्रत्येक माणसानेआंतरिक जीवन स्वतः शोधले पाहिजे असा अस्तित्ववाद शब्द प्रथम प्रचलित केला.त्याच्या समोरचा माणूस

स्वतःचे अस्तित्वच हरवून बसला आहे. व्यक्तीचे अस्तित्व वात्यांचे स्वत्व जेव्हा समाजात धोक्याचे होऊ लागते तेव्हा माणसे रुढीग्रस्त व भयभीतहोतात. तो स्वतःला विसरतो. सामाजिक भीतीने, दंडशक्तिच्या भयाने पैसा, सत्ता वप्रलोभणे यांच्या अमिषाने माणूस हा स्वतःचे निर्णय, स्वातंत्र्य व जबाबदारी हरवूनबसतो. अशा वेळी किर्केगार्द म्हणतो की, जरी माणूस म्हणून माणसे जन्माला आली तरीत्याला खऱ्या अर्थाने माणूस व त्याचे स्वत्व व्हायचे असते. तो स्वातंत्र्याचा शोध घेतो.

### ३.४.२ सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र (Existential Ethics):

जिन पॉल सार्त्र हा फ्रेंच नास्तिक अस्तित्वादी तत्त्वज्ञ होय. त्यानेअस्तित्ववाद आणि मानवतावाद, असतेपणा आणि नसतेपणा, Critique of Dialectical Reason हे ग्रंथलिहिले. तो काही काळ तत्त्वज्ञानाचा प्राध्यापकही होता. तो साहित्यात वैशिष्टपूर्णस्थान निर्माण करणारा एक प्रतिभावंत तत्त्वचिंतक होता. त्याने लिहिलेल्यासाहित्यकृतीतून मानवी जीवनाचा अर्थ समजून घेण्याची तळमळ व्यक्त होते. सार्त्रच्यामते मानवी जीवन हे विविध प्रकारच्या समस्यांनी व आव्हानांनी भरलेले आहे. विशिष्ट परिस्थितीत कोणता निर्णय घ्यावा ही नैतिक समस्या प्रत्येक मनुष्यात निर्माण होते.त्याच्या मते धार्मिक व देववादी माणसे परावलंबी बनतात व आपले कल्याण करणाराकुणीतरी आहे असे समजून दुबळी बनतात. सार्त्रला सत्ताशास्त्रीय व ज्ञानशास्त्रीयसमस्यांपेक्षा नीतिशास्त्रीय समस्यांमध्ये अधिक रस होता म्हणूनच इतरअस्तित्ववाद्यांपेक्षा त्याची भूमिका काहीशी वेगळी वाटते. त्याने स्वतःच आपणअस्तित्ववादी असल्याचे म्हटले आहे.

सार्त्रच्या मते माणूस हा जन्मतःच स्वातंत्र्य असून तो स्वतःचा निर्णय स्वतःघेतो. निवड व स्वातंत्र्य यांचा बोध घेऊन आपल्याला पाहिजे तसा बनवितो. म्हणूनचमाणसाने स्वतःच्या कृतीची निवड करुन त्याची जबाबदारी निर्भयपणे स्वीकारलीपाहिजे. स्वतः विचार करुन स्वतः निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य याचा बोध अस्तित्ववाद यापदाने होतो. एकूणच सार्त्रने मानवी स्वातंत्र्यावर सखोल चिंतन केलेले आहे. सार्त्रनेअस्तित्व (Existence)आणि सारतत्त्व (Essence) यांच्यात भेद करुन मानवीअस्तित्वाला प्राधान्य दिले. त्याने अस्तित्ववादाचे एक सूत्र मांडले ''अस्तित्व हेसारतत्त्वाच्या आधी येते. (Existence precedes Essence). या सूत्राचा अर्थस्वतःचे आयुष्य घडविणाऱ्या माणसाच्या संदर्भात 'अस्तित्व हे आधी असते व नंतरसारतत्त्व असते. माणसाचे वैशिष्ट्य हे आहे की, त्याचे अस्तित्व आधी येते व माणसाचे'स्वत्व' हे सारतत्त्व नंतर येते. थोडक्यात अस्तित्व हे पूर्ववर्ती आहे तर सारतत्त्व हेउत्तरवर्ती आहे ही अस्तित्ववादाची मुख्य भूमिका आहे. माणूस व इतर वस्तुंचा भेददाखविण्यासाठी सार्त्र पुढील उदाहरण देतो. माणसाने बनवलेली कागद कापण्याची सुरीव माणूस यांची तुलनाही सार्त्र करतो. सुरी निर्माण करणाऱ्या कारागिराच्या मनात सुरीम्हणजे काय? ती कशी बनवायची, तिचा उपयोग काय याविषयीची आधी कल्पनाकरतो. त्या कल्पनेनुसार तो ती सुरी बनवितो. कागद कापण्याची सुरी अमूक प्रकारचीअसावी. तिच्याकडून अमूक एक काम व्हावे असे आधी ठरलेले असते त्या प्रमाणेसुरीचे असणे हे त्या सुरीचे सारतत्त्व होय. सुरीची संकल्पना केली म्हणजे कारखान्यातजेव्हा प्रत्यक्षात अस्तित्वात येते तेव्हा तिचे गुणधर्म आधीच धरलेले असतात. सुरीचेसारतत्त्व अस्तित्वाच्या आधी येते हा एक अर्थ होय. दुसऱ्याबाजूला मानवी व्यक्तीची कोणी साधी संकल्पना केलेली असते. त्याबरोबरकाहीएकविशिष्ट हेतू साधण्यासाठी त्या अस्तित्वात येतात असे म्हणता येणार नाही. त्या अस्तित्वात येतात. बस्स एवढेच.

सार्त्रच्या अस्तित्ववादी सूत्रानुसार मनुष्य प्रथम अस्तित्वात येतो. नंतर त्याचेस्वत्व म्हणजेच सारत्तत्त्व येते. पाश्चात्य धर्मशास्त्रानुसार ईश्वराच्या मनात माणसाचेसारतत्त्व अगोदर असते नंतर ईश्वर माणसाला अस्तित्वात आणतो. हा पाश्चात्यधर्मशास्त्राच्या विरुद्ध विचार सार्त्रने मांडलेला आहे. मनुष्य हा कोणत्याही संकल्पनेनुसारबनविला गेलेला नाही. ईश्वराने निर्माण केलेली प्रतिमा म्हणजे माणूस हे सार्त्रला मान्यनाही. कारण सार्त्र हा ईश्वर मानत नाही. तो निरीश्वरवादी होता.

### ३.४.३ निवडीचे स्वातंत्र्यः

सर्व अस्तित्ववाद्यांनी स्वातंत्र्याविषयीचे विचार मांडले. पण मानवी स्वातंत्र्यावर सखोल चिंतन सार्त्रने केलेले आहे. त्यामुळे तो स्वातंत्र्याच्या संदर्भात अस्तित्ववादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. सार्त्रच्या मते स्वातंत्र्य हा माणसाचा स्वभाव आहे. माणूस जन्मतःच स्वतंत्र असून त्याची निवड करुन तो स्वतःचा निर्णय स्वतःच घेतो. म्हणूनचसार्त्र म्हणतो की माणसाने स्वतःच्या कृतीची जबाबदारी निर्भयपणे स्वीकारली पाहिजे.माणसाने स्वतः विचार करुन स्वातंत्र्य आणि निवड यानुसार स्वतः निर्णय घेतलापाहिजे. असा निर्णय घेतांना तो चांगला की वाईट, त्यानुसार केलेली कृत्ये योग्य कीअयोग्य या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे निकष सार्त्रने मांडलेले नाही. माणसाने समाजातवावरतांना माझी निवड कशीही असली तरी ती माझी निवड आहे. म्हणून ती चांगलीआहे असे म्हणून चालत नाही. त्याला स्वत्वाची जाणीव असून त्या कर्माची जबाबदारीस्वीकारावी लागेल. सार्त्रने माणसाचे स्वत्व, स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय व त्यानुसार होणारीकर्माची जबाबदारी यावर जोर अधिक दिला आहे. सार्त्रने कागद कापण्याच्या सुरीचे जेउदाहरण वर दिलेले आहे ते तितकेसे बरोबर नाही. त्याला सारतत्त्वात अधिक रस होता. अस्तित्ववादाच्या सिद्धांताप्रमाणे स्वतंत्र निवडीमुळे व्यक्तिमत्त्व घडतगेले पाहिजे ही गोष्ट सार्त्रच्या विचारात वगळली गेली. व त्याच्या जागी निवडीचेस्वातंत्र्य ही अमूर्त गोष्ट सार्त्रने आणून बसविली आहे. त्यामुळे कृतीचा कर्तासुद्धा एकअमूर्त अस्तित्व होऊन राहतो असे समालोचन मेरीवॉरनॉक यांनी केले आहे.

फ्रेंच गणिती तत्त्ववेत्ता देकार्तने ''मी विचार करतो म्हणून मी आहे.'' (Cogito ergo sum) देकार्तने मी एक जाणणारी विचार करणारी व्यक्ती यापद्धतीने स्वतःचे अस्तित्व सिद्ध केले. देकार्तच्या वरील प्रमेयातील विचार करणाराकिंवा जाणणारा माणूस हा शून्य वा निरर्थक जगात अवतीर्ण झाला आहे की या जगातआपण अनावश्यक व उपरे आहोत हे त्याला जाणवते. एकंदर जगताविषयी घृणा येते.त्याला कुणाचाच आधार नसल्याने जबाबदारी मात्र वाढत जाते. निराधारता, यातना वचिंता यामुळे त्याला एक प्रकारची भीती वाटते. सार्त्र देकार्तच्या पुढे जाऊन असा दावाकरतो की, जाणीवेचे सारभूत तत्त्व म्हणजे ती कोणत्यातरी विषयाकडे रोखलेलीअसते. येथे सार्त्रच्या विचारावर मानसघटनावादी तत्त्वज्ञ हूसर्लचा प्रभाव पडलेलादिसून येतो. जाणीव ही विषयलक्षी असते. त्याचे त्याने स्पष्टीकरणन देता सार्त्रने ती गृहीत धरलेली आहे. जाणीव असलेल्या व्यक्तिस सार्त्र आत्मनेसत् being for itself असे म्हणतो. तर जाणीवरहित वस्तू या स्वरुपसत् (being in themselves)होत. या वस्तू मूर्तपणे अस्तित्वात असतात. स्वरुपसत् वस्तुंच्याअस्तित्वाला कोणताही धक्का न लागता तशाच राहातात. सार्त्रच्या मते जाणीव ही अस्तित्वात असते. ती बाह्य विषयांशी संबंधित राहूनच असते. सार्त्र येथे जाणीवअसलेल्या व्यक्ती व विषयवस्तूंचे जग यांच्या संबंधाचा विचारही करतो आत्मनेसत्असलेल्या चेतन व्यक्ती स्वरुप सत् (being in themselves) होण्याची इच्छाअसतात. जगातील पदार्थांची विविधता व अव्यवस्था ध्यानात घेतल्याने त्यांना शिसारीकिंवा

वीट येतो. आपण सर्वस्वी स्वतंत्र आहोत. हे व्यक्तीच्या लक्षातआल्यावर त्यांनी व्याकूळता वा अस्वस्थता येते. या ठिकाणी शिसारी व व्याकूळता हे शब्द भावनायुक्त असून या भावनांना तो प्राधान्य देतो. हा विचार व्यक्तकरण्यासाठी सार्त्रने मानवी जीवन व्यर्थ किंवा अर्थहीन आहे असे म्हटले.

सार्त्रच्याविचारात मानवी जीवन अर्थहीन आहे असे येण्याचे कारण म्हणजे मनुष्याचे स्थानकेवळ विचारी एवढेच नसून कशानेही नियत न झालेला जगातील क्रियावान घटकहोय. सार्त्र स्वतःच्या अंतर्यामी कृतीचे सामर्थ्य असलेला आणि स्वतःला हवे तसेबनविण्यास स्वतंत्र असलेला कृतीशील मानव यावर अधिक भर देतो. जबाबदारी वनिवडीचे स्वातंत्र्य यावर त्याने अस्तित्ववादी नीतिशास्त्रात प्रामुख्याने महत्त्व दिले आहे.

### ३.४.४ कुश्रद्धा (दांभिकता-Bad faith):

सार्त्रच्या मते माणूस पूर्णपणे स्वतंत्र असून स्वतःची निवड स्वतःच करुशकतो. स्वतःचे भवितव्य स्वतः घडवू शकतो. त्यामुळे स्वतःच्या कृतीला माणूसस्वतःच जबाबदार असतो. हे सर्व विसरुन तो जेव्हा इतर कशावर तरी श्रद्धा ठेवतो तीत्याची पळवाट असते. ही त्याची श्रद्धा कुश्रद्धा होय कुश्रद्धा म्हणजेनिवडीच्या स्वातंत्र्याला दिलेला नकार होय. अमुक एका रीतीने कृती करण्यासाठीआपण बांधलो गेलो आहोत. अशारीतीने स्वतःकडे पाहिल्यास ''मला निवडायचेस्वातंत्र्य नाही.'' तर आपण स्वतःलाच फसवीत आहोत. येथे कुश्रद्धा किंवा दांभिकताम्हणजे स्वतःला फसविणारा (आत्मवंचनेचा) प्रकार होय. आपण कृतीची निवडकरण्यास असमर्थ असणे म्हणजे दांभिकता वा कुश्रद्धा होय. आपण अनेक सबबी,आवडी-निवडी व मते सांगतो तेव्हा त्या नियत होतात. अशा व्यक्तीबद्दल दांभिकता वाकुश्रद्धा ही संकल्पना उपयोगी पडते. व्यक्ती दांभिकतेचा स्वीकार अशाकरिता करतोकी काय करावे याची निवड करण्याची आवश्यकता राहणार नाही. अशी जाणीवरहितस्वरुपसत् अशी वस्तू बनविण्याचा प्रयत्न करते.

सार्त्रने एक नैतिक सिद्धांत मांडून त्या सिद्धांताची तुलना कांटच्या कर्तव्यवादीसिद्धांताशी केली आहे. सार्त्र म्हणतो की एक माणूस म्हणून स्वतःचे स्वातंत्र्य हे माझेउद्दिष्ट असणारच. त्यासाठी प्रयत्नशील असेल तर इतरांचे स्वातंत्र्य हे माझे उद्दिष्टअनिवार्य होते. एक साध्य म्हणून स्वातंत्र्याची इच्छा करताना त्याचे सार्वत्रीकरण केलेनाही आणि इतरांच्या स्वातंत्र्याचा समावेश केला नाही तर माझी इच्छा आत्मव्याघातीहोईल. ज्या स्वातंत्र्याचा व्यक्ती विचार करते ते नियतत्त्वाच्या विरुद्ध असलेले निवडस्वातंत्र्य नव्हे तर ते राजकीय स्वातंत्र्य होय. हा विचार स्वीकारला तर अनेक उद्दिष्टेचेतयार होऊन त्यातून नैतिक व राजकीय कृतीचा कार्यक्रम निघू शकतो.

### ३.४.५ असतेपणा आणि नसतेपणा (Being and nothingness) :

सार्त्र असतेपणा व नसतेपणा या पुस्तकात म्हणतो की सर्व मूल्यांचा उगम हास्वतःमध्ये आहे हे नैतिक कर्त्याच्या लक्षात आले म्हणजे त्याच्या स्वातंत्र्यालाआत्मजाणीव येईल. व्याकुळतेत स्वतःचे प्रकटीकरण करील. ही व्याकुळता मूल्यांचेएकमेव उगमस्थान आहे ज्याच्यामुळे हे जगत अस्तित्वात येते. त्या रितेपणातही त्यास्वातंत्र्याचा अविष्कार होईल. कृती करण्याच्या शक्यता इतर व्यक्तींच्या संदर्भातवास्तवात येईल. त्याही निवड करु शकतात. त्यांची निवड माझ्या निवडीवर परिणामकरु शकतात. ज्या विशिष्ट परिस्थितीत निवड केली जाते त्यात स्वातंत्र असलेलीव्यक्ती आपली सुटका करुन घेऊ शकते असे सार्त्र म्हणतो.

### ३.४.६ मूल्यमापन:

अस्तित्ववादी तत्त्वज्ञ सार्त्र हा मानवकेंद्री तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करतो. तोमानवी अस्तित्वाला महत्त्व देऊन कृती करण्याचे स्वातंत्र्य, निवड व स्वयंनिर्णयाचीजबाबदारी निर्भयतेने करणे यातच मानवाचे अस्तित्व आहे. सार्त्रचा माणूस स्वातंत्रपणेआपल्या भविष्याला आकार देणारा आहे. त्याने नियतवादाचा धिक्कार करुन, ईश्वरीनिर्मित माणूस त्याला मान्य नाही. तो ईश्वरावर श्रद्धा ठेवीत नाही. या अर्थाने तोनिरीश्वरवादी आहे. स्वातंत्र्य ही माणसाची सत्ताच आहे असे सांगतो. अस्तित्व स्वातंत्र्यअसे समीकरण सर्वच अस्तित्ववादी मांडतात. त्याने स्वातंत्र्याची व्याख्या दिली नाही.सार्त्रच्या अस्तित्ववादी विचारात अनेक प्रकारची अतिरंजीत विधाने व त्याच्याविचारातील विसंगती, उणीवा व मर्यादा मेरी वॉरनॉकने आपल्या इ.स. १९०० पासूनचानीतिविचार या ग्रंथात प्रभावीपणे मांडल्या आहेत. त्यामुळे अस्तित्ववाद ही विचारप्रणालीफार काळ तग धरु शकली नाही.कारण जेथे विवेकाचा धिक्कार असतो तेथेतत्त्वज्ञानाची भरभराट होत नाही. अस्तित्ववाद ही एक मानवी जीवनासंबंधीचेप्रामाणिक आकलन असून अस्तित्ववाद्यांनी ही एक वैचारिक चळवळ उभी करुन त्यांचेयोगदान नाकारता येणार नाही. सार्त्रचे अस्तित्ववादी तत्त्वज्ञानच अपूर्ण असल्यानेत्यात संदिग्धता व मर्यादा आढळून येणे हे वास्तव आहे.

**आपली प्रगती तपासून पहा :**

१) अस्तित्ववाद म्हणजे काय ?
२) 'अस्तित्व हे सारतत्त्वाच्या आधि येते' या अस्तित्ववादी सूत्राचा अर्थ सांगा.
३) सार्त्र हे निवड स्वातंत्र्यावर व कृतीच्या जबाबदारीवर जोर का देतात ?
४) सार्त्रच्या आत्मनेसत् व स्वरुपसत या संकल्पनांचा अर्थ सांगा.
५) सार्त्रने प्रतिपादन केलेली कुश्रद्धा (Bad faith) म्हणजे काय ?
६) अस्तित्ववादी नीतिशास्त्राचे मूल्यमापन करा.

## ३.५ सारांश

आधुनिक काळात स्त्रीचा भावबंध व स्त्रीपुरुष समानता या विचारांना केंद्रस्थानी मानून प्रा. कॅरोल गिलीगन यांनी स्त्रीवादी नीतिशास्त्राचा प्रामुख्याने पुरस्कार केला. त्यांनी लिंगभेदानुसार नि:पक्षपाती पुरुष व भावबंध (आस्था)असणाऱ्या स्त्रीयांची वैशिष्ट्ये सांगून न्याय, कर्तव्ये व अधिकार या नैतिक संकल्पनांचा व स्त्रीयांची वैशिष्ट्ये सांगून न्याय, कर्तव्ये व अधिकार या नैतिक संकल्पनांचा स्त्रीया कशाप्रकारे विचार करतात हे स्पष्ट करतात. स्वप्रतिमाबाबत पुरुषांची विलगता व स्त्रीची संलग्नता कशी असते याचे विवेचन करतात. स्त्रीच्या नैतिक विकासाच्या अवस्था स्पष्ट करण्यासाठी कोहलबर्गप्रणीत नैतिक विकासाच्या अवस्थांचे प्रारुप घेऊन नव्याने

मांडणी करतात. स्त्रीवादी नीतिशास्त्राचा आधुनिक दृष्टीकोन विशद करुन स्त्रीपुरुष समतेचे लिंगभेद व वंशभेद दूर ठेवून सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाची मांडणी करतात.

अस्तित्ववाद ही एक २० व्या शतकातील सत्ताशास्त्रविरोधी विचार प्रणाली असून किर्केगार्द हा या विचारप्रणालीचा जनक होय. यास्पर्स, मार्शेल, हायडेगर, कामू व सार्त्र हे अस्तित्ववादाचे पुरस्कर्ते होत. त्यांनी मानवाच्या अस्तित्वाचा प्रमुख विचार मांडला. विशेषतः सात्रने अस्तित्ववाद व मानवतावाद व इतरही अनेक ग्रंथ लिहून मानवी जीवनाच्या अर्थाचे खरे रहस्य मांडले. सार्त्रने मानवी स्वातंत्र्याचे सखोल चिंतन करुन अस्तित्व हे सारतत्त्वाच्या आधि येते. हा प्रमुख विचार मांडला. त्याने माणसाचे स्वत्व, स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय व त्यानुसार कर्माची जबाबदारी यावर अधिक भर दिला. कुश्रद्धा, असतेपण व नसतेपण याचेही अस्तित्ववादी नीतिशास्त्रातील महत्त्व सांगून मानवकेंद्री तत्त्वज्ञानाचा व मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. तो निरीश्वरवादी होता. त्याने पाश्चात्य धर्मशास्त्राविरुद्धचे विचार अस्तित्ववादी विचारात मांडले. त्याच्या विचारात अनेक उणीवा, विसंगती व मर्यादा मेरीवॉरनॉक यांनी १९०० पासूनचा नीतिविचार या ग्रंथात दाखवून दिल्यामुळे ही विचारसरणी फार काळ तग धरु शकली नाही. तरीही या विचारप्रणालीचे महत्त्व नजरेआड करुन चालणार नाही.

## ३.५ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) प्राचीन ग्रीक नीतिशास्त्राची सांगड, संत ऑगस्टिन यांनी ख्रिश्चन धर्मशास्त्राशी कशी घातली आहे.

२) संत ऑगस्टिन यांचा नीतिसिद्धांत विषद करा.

३) कॅरोल गिलीगन यांच्या स्त्रीवादी नीतिशास्त्राचे सविस्तर विवेचन करुन त्याचे मूल्यमापन करा.

४) अस्तित्ववाद म्हणजे काय? सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र सविस्तर स्पष्ट करुन त्याचे मूल्यमापन करा.

५) टिपा लिहा

अ) सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र

ब) स्वप्रतिमा म्हणून पुरुषाची विलगता व स्त्रीची संलग्नता

क) स्त्रीच्या नैतिक विकासाच्या अवस्था

ड) गिलीगनचे स्त्रीवादी नीतिशास्त्र

इ) अस्तित्ववाद

फ) कुश्रद्धा

ग) आत्मनेसत् व स्वरुपसत् यामधील फरक

❖❖❖❖

# घटक -४

## शिक्षेच्या उपपत्त्या
## (THEORIES OF PUNISHMENT)

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ शिक्षेचा अर्थ
४.३ शिक्षेच्या उपपत्त्या
४.४ फाशीची (मृत्यूदंडाची) शिक्षा.
४.५ देहान्त शिक्षेचे समर्थन
४.६ सारांश
४.७ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## ४.० उद्दिष्ट्ये

१) शिक्षेचा अर्थ समजावून घेता येईल.
२) शिक्षेच्या विविध उपपत्त्या कोणत्या आहेत याविषयीचे आकलन होईल.
३) फाशीची शिक्षा योग्य आहे की नाही ते समजेल. फाशीच्या शिक्षेचे समर्थन कसे करता येईल यासंबंधीचे आकलन होईल.

## ४.१ प्रस्तावना

पाप अथवा दुराचरण ही गोष्ट म्हटल्यावर तिचे निराकरण कसे करावयाचे हा प्रश्न मात्र नीतिमीमांसेचा होऊ शकतो. 'दुरितांचे तिमिर' घालविण्यासाठी अपराधी व्यक्तीस शिक्षा करणे ही मानवी संस्कृतीत निर्माण झालेली एक रीत आहे. म्हणून शिक्षेसंबंधी तात्विक विचार हा नीतिमीमांसेत करावा लागतो. नीतिला स्वतःप्रामाण्य आहे. पण तिचे बल तोकडे पडते. नीतीला जसे प्रामाण्य आहे तसे सामर्थ्यही असते तर नीती ही विश्वरचनेचे नियामक तत्व बनली असती. Had it strengh as it hath manifest authority, it would absolutely rule the world (Bishop Butler) पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. म्हणून जगात अपूर्णता आहे. दुःख आहे, दुर्जनता आणि दुरित आहे. त्याचे काही निराकरण व्हावे म्हणून 'अपराध्यास दंड' ही संस्था निर्माण झाली. माणसाकडून अनेक वेळा अपराध होतात. त्या अपराधांना आपण अनैतिक (वाईट) असे म्हणतो. व्यक्ती ज्या वेळेस अनैतिक मार्गनिवडते त्या कृतीला अनैतिक कृती म्हणणे म्हणजे आपण त्याला अपराध म्हणतो. आजच्या समाजात गुन्हेगारी/ अनैतिक कृत्य करणारे चोर, गुंड, दुष्ट, दुर्जन आहेत. अशा गुन्हेगारांकडून समाजाचे स्वास्थ्य बिघडते.

सामाजिक विकास थांबतो, प्रगतीला अडसर ठरतो. त्यामुळे गुन्हेगारीची समस्या किंवा अशुभ घटना दूर करण्यासाठी शिक्षेची अथवा दंडनीतीचे कार्य मोलाचे आहे. गुन्हेगाराने कायदा मोडल्यावर त्याला शिक्षा द्यावी का? असा प्रश्न नीतीशास्त्राला पडतो. त्यामुळे ती एक नैतिक समस्या बनते. गुन्हेगारांना शिक्षा देताना त्यात अनेक दोष किंवा उणिवा दिसून येतात.

## ४.२ शिक्षेचा अर्थ व कार्य

जेंव्हा व्यक्तीकडून कायद्याचे उल्लंघन होते तेंव्हा ती व्यक्ती अपराधी किंवा गुन्हेगार ठरते. या गुन्हेगारास शिक्षा होऊ शकते. समाज विरोधी व्यक्ती वागली की ती अपराधी ठरते. अशा अपराध्यास शिक्षा मिळणे योग्य आहे. शिक्षेमध्ये पुढील गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. १) शिक्षा ही गुन्ह्याबद्दल देण्यात आली पाहिजे. २) शिक्षा ही मानवाने देण्यात आली पाहिजे. ३) कायद्याचे उल्लंघन झाल्यामुळे वस्तुनिष्ठ पद्धतीने शिक्षा सत्ताधारीने दिली पाहिजे। गुन्हेगाराला शिक्षा देताना शिक्षा द्यावी का? शिक्षा कोणाला द्यावी? या संबंधीचे प्रश्न विचारात घ्यावे लागतात. लहान मुले, आजारी व्यक्ती, वेडे, प्राण्यांचे वर्तन, दहशतीला बळी पडून वाईट कृत्य करणारी माणसे शिक्षेपासून वगळण्यात येतात. तरीही त्यांना किती शिक्षा द्यावी हे प्रश्न उपस्थित होतात. कायद्याचे अज्ञान शिक्षा टाळण्यासाठी सबब चालू शकत नाही.

उदा. मद्यपान करुन मोटार चालविणारा चालक. मद्यपान करुन मोटार चालविणे हा गुन्हा आहे. हे त्यास माहिती नाही असे तो सांगू शकत नाही. शिक्षा टाळण्याची ही सबब नव्हे.

जगात दुर्जनता आहे. समाजात गुन्हे होतात माणसे अपराध करतात. एखाद्याने अपराध केला याचा अर्थ, समाजात जी नैतिक धारणा असते अथवा जो नैतिक तोल असावा असा आपला संकल्प असतो, त्याला काही धक्का लागला असा होईल तो पुन्हा आणावा, निर्माण झालेले दुर्जनत्व हे कोणत्या तरी रीतीने निपटून काढावे, हे शिक्षेचे अथवा दंडनीतीचे कार्य आहे असे स्थूल मानाने मानता येईल.

## ४.३ शिक्षेच्या उपपत्त्या (THEORIES OF PUNISHMENT):

शिक्षेचे हे कार्य लक्षात ठेवून शिक्षेसंबंधीच्या निरनिराळ्या उपपत्तींचा विचार करणे आवश्यक आहे. प्राप्तव्यवादी आणि कर्तव्यवादी या नीतिमीमांसेच्या दोन प्रमुख उपपत्त्या आहेत. त्याला अनुसरून शिक्षेसंबंधीच्या उपपत्त्यासुद्धा मुख्यतः दोन प्रकारच्या आहेत. कारण शिक्षचे कार्य ढासळलेल्या नैतिक तोलाची पुनःस्थापना हे आहे. नीतीच्या अर्थाकडे पाहण्याच्या दोन तऱ्हा आहेत. म्हणून शिक्षेसंबंधीसुद्धा त्यांना समांतर अशा दोन उपपत्त्या प्राप्तव्यवादी अथवा उपयुक्तावादी आहे. आणि दुसरी नियमवादी अथवा कर्तव्यवादी आहे. शिक्षेच्या उपपत्त्या पुढील प्रमाणे आहेत.

### ४.३.१ शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती (प्रायश्चित्त) (Retributive Theory of Punishment):

एखाद्या व्यक्तीने गुन्हा केल्यास ती व्यक्ती शिक्षेस पात्र आहे, या एकमेव कराणासाठी शिक्षा देण्याचा उद्देश असतो. या उपपत्तीचा पुरस्कार कांट या जर्मन तत्त्ववेत्त्याने आपल्या

Philosophy of Law या ग्रंथात केला. न्यायालयीन शिक्षा व्यक्तीने गुन्हा केल्यास तिला दिली जावी. केवळ गुन्हेगाराला शिक्षा दिल्यामुळे तिच्यातून दुसरी चांगली गोष्ट निर्माण होईल म्हणून शिक्षा दिली जाते. हे स्पष्ट होण्यासाठी कांटने पुढील उदाहरण दिले आहे. समाजातल्या एखाद्याने आत्महत्या करण्याचे ठरविले तर काही निष्पन्न होणार नाही. गुन्हेगाराला शिक्षा दिली पाहिजे. ब्रॅडले व बोसांके या नीतीपंडीतांनी सुद्धा प्रतिशोध उपपत्तीला मान्यता दिली आहे. ब्रॅडले म्हणतो आपण शिक्षेला पात्र असल्याने आपण ती स्वीकारतो. या शिवाय कुठल्याही उद्देशाने गुन्हेगाराला शिक्षा दिली गेल्यास ती अनैतिक ठरेल आणि त्या व्यक्तीवर घोर अन्याय होईल.

बोसांके म्हणतो की शिक्षेचा हेतू पापाचा व गुन्ह्याचा नाश करणे आहे, पण दुःख देणे नव्हे. जर गुन्हेगाराला शिक्षा दिली नाही तर त्याचे कृत्य वाईटच ठरेल. त्याच्या वाईट कृत्याचा नाश करण्यासाठी त्याला शिक्षा दिली पाहिजे. या उपपत्तीनुसार गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे. भावनेची कदर होता कामा नये. कायद्यासमोर सर्व समान आहेत. श्रीमंत असो वा गरीब असो, गुन्हेगाराविषयी भेदभाव न करता त्याला शिक्षा देणे आवश्यक आहे. न्यायाधीश गुन्हेगाराला सुडाच्या भावनेतून शिक्षा देत नसून त्याने केलेल्या गुन्ह्याच्या बदल्यात त्याला शिक्षा देत असतो. एवढेच नव्हे तर ते न्यायाधीशाचे कर्तव्य आहे.

एखाद्या गुन्हेगाराने ज्या प्रकारचा गुन्हा केलेला असेल त्याला त्याच प्रकारची शिक्षा मिळावी असे समर्थन ही उपपत्ती करते. मराठीतील 'जशास तसे' 'करावे तसे भरावे' या म्हणीचा अवलंब केला जातो. एखाद्या व्यक्तीने किंवा गुन्हेगाराने एखाद्याचा दात पाडला किंवा हात तोडला तर त्या गुन्हेगाराचाही दात पाडणे किंवा हात तोडणे अशी शिक्षा देणे होय. थोडक्यात प्रतिशोध उपपत्ती ''Tooth for Tooth or Eye for Eye'' या न्यायतत्वावर आधारलेली आहे. गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याबद्दल या प्रकारची शिक्षा किंवा प्रायश्चित मिळाले पाहिजे म्हणून या उपपत्तीस प्रायश्चित उपपत्ती असेही म्हणतात.

शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती जे मानतात ते या सूडभावनेचा पुरस्कार करीत नाहीत. सूडबुद्धी ही एक भावना आहे. भावनेच्या भरात केलेली कृती नैतिक होणार नाही असे कर्तव्यवादी नीतिमीमांसक मानतीलच मानतील. सूडबुद्धीतील भावनेचा म्हणजे विकाराचा अंश काढून टाकण्यासाठी समाजाने न्याययंत्रणा निर्माण केली आहे. समाजाचा नैतिक विवेक न्यायाधीशाच्या मुखाने शिक्षा सुनावतो. न्यायाधिशाच्या मनात सूडाची भावना नसते. म्हणून प्रतिशोध उपपत्ती पत्करल्यावर आपण असंस्कृत माणसाच्या सूडबुद्धीपाशी येऊन पोहोचतो असे बिलकुल नाही. या उपपत्तीचे म्हणणे इतकेच आहे की, गुन्हा केला हेच शिक्षा करण्यास पुरेसे समर्थन आहे. शिक्षेचे फायदे काय होतील याचा विचार करणे म्हणजे अपराधी माणसाकडे तो इतरांच्या हिताचे साधन आहे अशा दृष्टीने पाहिल्यासारखे होईल. ही दृष्टी नीतिशास्त्राला मंजूर असणार नाही, कारण मनुष्यव्यक्ती हे साध्य आहे, साधन नाही. आपली प्रगती तपासा. १. शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती स्पष्ट करा.

**प्रतिशोध उपपत्तीचे मुल्यमापनः-**

१) प्रतिशोध उपपत्तीत गुन्हेगाराला त्याने केलेल्या गुन्हासाठी त्याच प्रकारची शिक्षा देणे हे सुसंस्कृत माणसाला शोभत नाही. गुन्हेगाराने व्यक्तीचा दात पाडला म्हणून गुन्हेगाराचाही दात पाडावा हे योग्य नाही. कारण त्याला जी शिक्षा दिली जाते ती सूडभावनेतून तयार

झाली आहे. म्हणून ही उपपत्ती सूडाच्या भावनेला उत्तेजन देते. सूड ही एक भावना आहे. भावनेच्या भरात केलेली ही कृती नैतिक (चांगली) नाही.

२) ही उपपत्ती स्वीकारली तर गुन्हेगारांना शिक्षा होऊनही गुन्हेगारीचे प्रमाण वाढतच आहे याचे स्पष्टीकरण ही उपपत्ती देत नाही.

३) कांट, ब्रॅडले, टी.एच.ग्रीन व हेगेल या तत्त्ववेत्यांनी ही उपपत्ती स्वीकारली असली तरी रॅशडाल या तत्ववेत्याने या उपपत्तीस विरोध केला आहे. त्याच्यामते 'दाताला दात' 'डोळ्याला डोळा' ही न्यायकल्पना चुकीची आहे. सध्या गुन्हेगाराला शिक्षा न्यायसंस्था देते. पण सूडभावनेतून शिक्षा दिली जात नाही. सूड ही खाजगी बाब आहे. याचेही स्पष्टीकरण ही उपपत्ती देत नाही.

४) या उपपत्तीत शिक्षेच्या परिणामाचा विचार केलेला नाही. कारण कठोर शिक्षा देऊनही जे गुन्हेगार सराईत आहेत, त्यांच्यावर परिणाम होईल की नाही याचे स्पष्टीकरण ही उपपत्ती देत नाही. याशिवाय गुन्ह्याचे प्रमाण न पाहता न्यायाधीश वाटेल ती शिक्षा गुन्हेगाराला देऊ शकतो. गुन्हा भयंकर असूनही शिक्षा कमी झालेली असते, याचेही स्पष्टीकरण ही उपपत्ती देत नाही.

५) रॅशडालच्या मते ही उपपत्ती असमाधानकारक आहे. कारण बरेच गुन्हे मानासिक विकृतीतून घडतात. अशा विकृत गुन्हेगारास उपचाराची आवश्यकता असते, शिक्षेची नसते. अर्थात रॅशडालच्या या उपपत्तीमधला आक्षेप चुकीचा आहे. कारण प्रत्येक गुन्हा मानसिक विकृतीतून उदभवत नाही. आज जे गुन्हे घडतात. जसे खून, दरोडे, बलात्कार, फसवणूक, भ्रष्टाचार इ. प्रकारचे गुन्हे जाणीवपूर्वक व योजनाबद्ध पद्धतीने केले जातात. याचा अर्थ अशाप्रकारचे गुन्हे करणाऱ्या व्यक्ती विकृत असतात, हे रॅशडालचे म्हणणे चुकीचे आहे. उलट अशा प्रकारच्या अनैतिक कृती केल्या तर त्या गुन्हेगाराला शिक्षा करणे हे नैतिकदृष्ट्या योग्य आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. शिक्षेची प्रतिशोधवादी उपपत्ती स्पष्ट करा.

___

___

___

___

___

### ४.३.२ शिक्षेची निवारणवादी (प्रतिबंद) उपपत्ती (Deterrent Theory of Punishment) :

शिक्षेची ही एक महत्वाची उपपत्ती असून या उपपत्तीनुसार गुन्हगार गुन्हा शाबित झाल्यावर तो शिक्षेस पात्र आहे. केवळ या एकाच कारणामुळे गुन्हेगाराला शिक्षा दिली जावी असा उद्देश या पाठीमागे असतो. या उपपत्तीनुसार गुन्हेगारावर वचक बसावा आणि गुन्हेगारानं तो गुन्हा पुन्हा करु नये, यासाठी त्याला चांगली अद्दल घडावी. या उद्देशाने शिक्षा देणे आवश्यक आहे. गुन्हेगाराला शिक्षा दिली म्हणजे ती शिक्षा इतर लोक पाहून त्यांच्यावरही वचक बसण्यास मदत होते. समाजामध्ये गुन्हेगारांकडून पुन्हा तसल्या प्रकारचे गुन्हे होऊ नयेत म्हणून त्यास शिक्षा देण्यात यावी हा उद्देश या उपपत्तीचा आहे.

शिक्षेच्या निवारणवादी उपपत्तीमध्ये गुन्हेगाराला गुन्ह्यापासून परावृत्त करणे किंवा त्यास पायबंद घालणे किंवा वाईट कृत्यापासून त्याला प्रतिबंध घालणे हा उद्देश असतो. म्हणून या उपपत्तीला 'प्रतिबंध' उपपत्ती म्हणतात. ही उपपत्ती एका न्यायधीशाने मोठ्या मार्मिकपणे व चातुर्याने गुन्हेगारास शिक्षा देतांना व्यक्त केली आहे. एका गुन्हेगाराने एका मेंढपाळाच्या मेंढ्या चोरल्या नंतर त्या गुन्हेगाराला पकडले व न्यायाधीशासमोर हजर केले. त्यावेळेस न्यायधिशाने गुन्हेगाराला सांगितले की, ''तू मेंढ्या चोरल्यास म्हणून तुला शिक्षा देण्यात येत नसून पुन्हा मेंढ्या चोरल्या जाऊ नयेत यासाठी शिक्षा देण्यात येत आहे''. न्यायाधिशाच्या या वाक्यात इतर लोकांना या गुन्ह्यापासून प्रतिबंध करण्याचा प्रमुख उद्देश असतो.

या उपपत्तीत समाजातील गुन्हेगारी नियंत्रीत करण्यासाठी शिक्षा उपयुक्त ठरते. त्यामुळे लोकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होते. या उपपत्तीत बहुसुख हे गृहीत धरलेले आहे.

वर सांगितलेली निवारणवादी उपपत्ती ही मूलतः उपयुक्तवादी आहे. तीमध्ये शिक्षेचे फायदे विचारात घेतले जातात. पण वर सांगितलेले आक्षेप तिच्यावर येत असल्यामुळे तिच्या ऐवजी जिच्यात शिक्षेचा कोणताही फायदा विचारात घेतला जात नाही अशी दुसऱ्या टोकाची एक उपपत्ती स्विकारली जाते. तिचे नाव प्रतिशोध उपपत्ती असे आहे. कांट, ब्रॅडले यांनी तिचा पुरस्कार केला आहे. आपली प्रगती तपासा प्रश्नः शिक्षेची निवारणवादी उपपत्ती स्पष्ट करा.

**निवारणवादी उपपत्तीचे मुल्यमापनः-**

१) या उपपत्तीचे गुन्हेगाराला गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली पाहिजे. म्हणजे गुन्हेगार शिक्षेशिवाय सुटता कामा नये. म्हणून गुन्हगाराला समाजासमोर शिक्षा करुन लोकांना/समाजाला जबर बसावी हा असतो पण एखाद्या वेळेस गुन्हेगार न सापडता दुसऱ्या निरपराध व्यक्तीला शिक्षा देणे हे अन्यायकारक होते. या संबंधीचे स्पष्टीकरण ही उपपत्ती देऊ शकत नाही.

२) घडलेला गुन्हा व त्याबद्दल दिलेली शिक्षा यामध्ये फार अंतर पडते. लोकांना त्या शिक्षेचे परिणाम काय आहेत हे समजण्यास वेळ लागतो. शिवाय शिक्षेचे प्रमाण, प्रतिबंधासाठी कोणती शिक्षा न्यायधिश करतो, त्यामुळे निवारणवादी उपपत्ती क्रुर ठरण्याची शक्यता असते.

३) या उपपत्तीमुळे लोकांना भीतीच्या दडपणाखाली सदाचारी बनविणे हे योग्य नाही. भीती आणि अनिती यांच्यात फरक राहत नाही. भीतीपोटी शिक्षा देऊन नैतिक बनविते हे या उपपत्तीत योग्य दिसत नाही. भीतीपोटी शिक्षा देण्याची शक्यता या उपपत्तीत असेल तर ते योग्य नव्हे.

४) प्रसारमाध्यमांद्वारा जसे आकाशवाणी, दूरदर्शन आणि वर्तमानपत्र इत्यादीमधून शिक्षेस पुरेशी प्रसिद्धी दिली गेली, तर शिक्षेची ही उपपत्ती अधिक प्रभावी ठरेल. या उपपत्तीत गुन्हेगारांचे पुनर्वसन करायचे असेल तर प्रसिद्धीने हे उद्दिष्टसाध्य होणार नाही म्हणजे गुन्हेगाराचे पुनर्वसन होणार नाही. अशाप्रकारे शिक्षेची निवारणवादी उपपत्ती ही शिक्षेचे समाधानकारक समर्थन देण्यात अपुरी ठरते.

**आपली प्रगती तपासा.**

१. शिक्षेची निवारणवादी उपपत्ती स्पष्ट करा.

### ४.३.३ शिक्षेची सुधारणावादी उपपत्ती (Reformative Theory of Punishment):

शिक्षेसंबंधी आणखीही एक उपपत्ती आहे. तिचे नाव सुधारणावादी उपपत्ती असे आहे. शिक्षेचे कार्य अपराध्याची सुधारणा करावी असे या उपपत्तीत मानले जाते. ही उपपत्ती स्वीकारूनच मराठीत 'शिक्षा' हा शब्द आलेला आहे. 'शिक्ष्'या क्रियापदाचा अर्थ शिकवणे असा आहे.

आज सुसंस्कृत समाजात या शिक्षेची उपपत्ती मानवतावादी दृष्टीने गुन्हेगाराकडे पाहते. गुन्हेगाराला शिक्षा द्यायची म्हणजे नेमके काय करायचे? तर त्याला वाईट गोष्टींपासून दूर करून त्याच्यात सुधारणा घडवून आणणे होय. गुन्हेगारामध्ये शिक्षेऐवजी सुधारणा घडवून आणणे हा मूलभूत उद्देश या उपपत्तीमागे आहे. गुन्हेगाराला शिक्षा देण्याऐवजी शिक्षण द्यावे. नीतीचे पाठ शिकवावे व सुसंस्कृत किंवा चांगला नागरिक बनविणे याचाच अर्थ तुरुंगाचे रुपांतर संस्कार शाळेत करावे असे स्पष्टीकरण ही उपपत्ती करते. गुन्हेगार गुन्हगारीकडे का वळला? त्याची मानसिक अवस्था कोणती होती? गुन्हेगारीची कारणे शोधून गुन्हगारांच्या हृदयात परिवर्तन घडवून आणून त्यांच्यात सुधारणा होण्याची शक्यता आहे, असे ही उपपत्ती स्पष्ट करते. पाश्चिमात्य कारागृहात ख्रिस्ती धर्म उपदेशक नियमितपणे कैद्यांची भेट घेऊन खरे काय? खोटे काय? चांगले काय? वाईट काय? यामधील फरक समजावून सांगतात आणि कैद्यात नैतिक परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न करतात. गुन्हगार सुधारेल अशी त्यांना आशा ही वाटते. गुन्हेगार निश्चितच सुधारू शकेल अशी खात्री या उपपत्तीच्या समर्थकांना वाटते.

**सुधारणावादी उपपत्तीचे मुल्यमापनः**

१) या उपपत्तीची नैतिक जबाबदारी नाहीशी होते. कारण गुन्हेगाराला शिक्षा न देता उलट त्याला दया व सहानभूती दाखवून त्यांच्यात सुधारणा घडवून आणली जाते. चांगला नागरिक बनविणे असा उद्देश या उपपत्तीचा आहे. पण जे लोक वेडे अज्ञानी किंवा मानसिक दृष्ट्या विकृत आहेत. त्यांच्या बाबतीत कोणती सुधारणा घडवून आणायची याचे स्पष्टीकरण ही उपपत्ती देवू शकत नाही. शिवाय गुन्हेगाराला शिक्षा न देता त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी कोणत्या नीतीचे पाठ शिकवावे हा ही एक मोठा प्रश्न आहे. उलट गुन्हेगारामध्ये सुधारणा होईल असे ठाम म्हणता येत नाही. या उलट त्यांचे नैतिक अध:पतन होण्याची शक्यता असते.

२) भीतीने मानवात सुधारणा होवू शकत नाही केवळ भीती दाखवून खोट्याचे परिवर्तन करता येत नाही. जर एखाद्या व्यक्तीस शिक्षा करणे भाग पडते तर त्या व्यक्तीस सुसंस्कृत म्हणू शकत नाही. या उपपत्तीत वाल्याचा वाल्मिकी होऊ शकतो. हे हृदय परिवर्तन काही

व्यक्तींच्या बाबतीत होऊ शकते पण सर्व गुन्हेगारांच्या बाबतीत हृदय परिवर्तन होणार नाही व ते सुधारणारही नाहीत.

३) गुन्हेगाराला आपण नैतिक गोष्टीचे उल्लंघन केले आहे, हे समजले पाहिजे. त्याची सद्सद्विवेक बुद्धी जागृत झाली पाहिजे. पण सुधारणेमुळे या गोष्टी गुन्हेगाराला समजतीलच असे नाही. याचे योग्य ते समर्थन ही उपपत्ती देऊ शकत नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१. शिक्षेची सुधारणावादी उपपत्ती स्पष्ट करा.

___

___

___

___

___

### ४.३.४ समावेशक उपपत्ती:

शिक्षेच्या वर दिलेल्या उपपत्ती अपुऱ्या असल्यामुळे त्या प्रत्येकीतील सत्यांश घेऊन खालीलप्रमाणे एक सर्वसमावेशक उपपत्ती देता येईल.

मुळात व्यक्ती शिक्षेला पात्र होते ते तिने काही अपराध केला होता म्हणून. इतरांचा काही फायदा व्हावा म्हणून ती शिक्षेस पात्र ठरत नाही. प्रतिशोध उपपत्तीतील हा भाग स्वीकारण्यासारखा आहे. त्यामुळे निरपराध माणसास शिक्षा करण्याचा प्रश्नच येणार नाही. पण शिक्षेचे प्रमाण किती असावे हे ठरवताना तिच्या परिणामांकडे नजर देणे वावगे नाही. अपराधी व्यक्तीने गुन्हा करून इतरांच्या अधिकारावर ज्या मर्यादेपर्यंत आक्रमण केले असेल त्या मर्यादेपर्यंत तिने आपले अधिकार गमावले आहेत. पण या मर्यादाच्या आत राहून परिणामांकडे नजर ठेऊन शिक्षेचे प्रमाण कमी-जास्त करता येईल. हे म्हणणे स्वीकारल्यास निवारणवादी उपपत्तीतील सत्यांश आपण घेतला असे होईल. अगदी क्वचित प्रसंगी असे घडेल की अपराध्याला नैतिकदृष्ट्या जबाबदार धरण्याऐवजी तो अज्ञानी आणि मानसिक रोगी आहे हा दृष्टीकोन योग्य होईल. अशा थोड्या बाबतीत सुधारणावादी उपपत्तीसुद्धा मान्य करता येईल. या उपपत्तीत तिन्ही प्रसिद्ध उपपत्तींचा संग्रह केला गेला आहे.

## ४.४ फाशीची (मृत्युदंडाची) शिक्षा (CAPITAL PUNISHMENT) :

देहांत शासन म्हणजे गुन्हेगाराच्या गळ्याला फास लावून त्यास मरेपर्यंत टांगणे होय. खुनासारख्या अतिगंभीर गुन्ह्याबद्दल फाशीची शिक्षा ठोठावली जाते. पुर्वीच्या काळी ही शिक्षा घरफोडी अशा इतरही शुल्लक गुन्ह्यासाठी दिली जात असे. आजच्या सुसंस्कृत समाजात फाशीची शिक्षा रानटी आणि अत्यंत क्रुर व अमानुष प्रकारची शिक्षा आहे. म्हणून काही सुसंस्कृत राष्ट्रातून फाशीची शिक्षा रद्द करण्यात आली आहे. कारण त्यांना एखाद्या मानवाचा अशा पद्धतीने जीव घेणे रानटी व क्रुरपणाचे वाटते. म्हणून गुन्हेगाराला मृत्यूदंडाची शिक्षा देण्याऐवजी शिक्षेचा एखादा चांगला मार्ग शोधणे आवश्यक वाटते. आपल्या घराची एखाद्याने घरफोडी केली म्हणून

आपण त्याचे घर फोडत नाही. तसेच एखाद्याने खून केला म्हणून आपण त्याला ठार मारत नाही. शिवाय ही शिक्षा गुन्हेगाराचा जगण्याचा हक्क हिरावून घेते. शिवाय ही शिक्षा गुन्हेगाराला भीतीने देण्यात येते. ही शिक्षा योग्य की अयोग्य या विषयक पुढील मते आहेत.

### ४.४.१ फाशीच्या शिक्षेसंबंधी अनुकूल मतेः

१) प्रत्येकाला जिवंत राहण्याचा हक्क आहे. जर एखाद्या गुन्हेगाराने खून केला तर त्याने त्या माणसाचा जिवंत राहण्याचा हक्क हिरावून घेतला, अशा अनैतिक कृत्याना देहदंड किंवा फाशीची शिक्षा देणे योग्य होय.

२) देशद्रोह, राजद्रोह, खून आणि सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आणणाऱ्या गुन्हेगारांसाठी फाशीची वा मृत्युदंडाची शिक्षा देणे आवश्यक आहे.

३) मृत्यूदंड किंवा देहदंडाची शिक्षा ही इतर शिक्षेपेक्षा अधिक परिणामकारक असल्यामुळे इतरांवर जबर बसते व गुन्हेगाराला दहशत बसते. म्हणजे मृत्यूदंडाची शिक्षा ही प्रतिबंधक ठरते. अर्थात मृत्यूची भीती ही गुन्हेगाराच्या बाबतीत प्रतिबंधक ठरु शकते.

४) काही विचारवंताच्या मते फाशीच्या शिक्षेपेक्षा जन्मठेपेची शिक्षा बरी पण जन्मठेपेच्या शिक्षेमुळे गुन्हेगाराला जन्मभर असाध्य यातना सोसाव्या लागतात. तसेच गुन्हेगारांवर संरक्षणाचा खर्चवाढतो. जन्मठेप भोगूनही गुन्हेगार सुधारेल याची खात्री देता येत नाही. समाजालाही त्याच्याविषयी सहानुभूती वाटत नाही. म्हणून फाशीची किंवा देहदंडाची शिक्षा देणे योग्य आहे.

५) देहान्त शिक्षेचे समर्थन करणारा शिक्षेचा प्रतिशोध  सिद्धांत होय. या सिद्धांतानुसार गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे. त्याने एखाद्या व्यक्तीचा जीव घेतला तर त्याला देहांताची शिक्षा देवून भरपाई केली पाहिजे.

अशाप्रकारे फाशीच्या शिक्षेच्या समर्थनार्थ अनुकूल मते मांडण्यात आली आहेत. त्याच्यात फाशीची शिक्षा देणे हे २० व्या शतकातील सुसंस्कृत माणसाला शोभत नाही. कारण या शिक्षेत अनेक दोषही आहेत.

### ४.४.२ फाशीच्या शिक्षेसंबंधी प्रतिकुल मतेः-

१) २० व्या शतकाचा उत्तरार्धात  व २१ व्या शतकाच्या प्रारंभी अनेक अंगानी वैज्ञानिक, तांत्रिक व सांस्कृतिक प्रगती झालेली आहे. अशा सुसंस्कृत समाजात गुन्हेगाराला फाशी देणे मानवतेला काळीमा फासणारे आहे. गुन्हेगारांचा जगण्याचा हक्क हिरावून घेणे हे योग्य नव्हे. फाशी देतांना गुन्हेगाराला अपराधी न मानता मानवी दृष्टीकोन समोर ठेवून त्याला योग्य अशीच पर्यायी शिक्षा दिली पाहिजे. शिवाय अनेक गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देवून ही गुन्हेगारी कमी झाली नाही. अर्थातच फाशीची शिक्षा ही सामाजिक अपयशाची बनली आहे.

२) मानव हा नेहमी वाईटच असतो असे नव्हे तर परिस्थिती त्याला गुन्हेगार बनवण्यास प्रवृत्त करते. म्हणून अशा गुन्हेगाराची सुधारणा करावी पण फाशी देवू नये असा दृष्टीकोन 'ॲम्नेस्टिक इंटरनॅशनल सोसायटी' या मानवी हक्क संरक्षण करणाऱ्या संस्थेने मांडला आहे. त्यांच्या मते फाशीची शिक्षा ही मानवतावादाला कलंक लावणारी आहे. म्हणून या शिक्षेऐवजी गुन्हगारला सुधारण्याची संधी द्यावी.

३) गुन्हेगारांने भयंकर स्वरूपाचा गुन्हा केल्यास त्याला मरेपर्यंत फाशी दिल्याने गुन्ह्याची भरपाई होत नाही. मग फाशीची शिक्षा का द्यावी ?

४) कधी कधी चुकीच्या न्यायदानामुळे निरपराधी व्यक्तीला देहदंडची शिक्षा मिळण्यीची शक्यता असते. अपराधी म्हणून निरपराधी व्यक्तीलाच फाशी दिली जाते आणि निरपराधी व्यक्तीला फाशी दिली तर त्यची शिक्षा भरून कशी काढणार. म्हणजेच न्यायदानातील चुकीची दुरुस्ती करणे हे अशक्य आहे. निरपराध व्यक्तीला फाशी दिल्यावर खरा गुन्हेगार नंतर शाबीत होतो. निरपराधी व्यक्तीवर झालेला अन्याय या शिक्षेमुळे भरुन काढणे अशक्य आहे.

वरील विवेचनानंतर देहांताची शिक्षा (मृत्युदंडाची शिक्षा) ही काही विशिष्ट गुन्हेगारांना देण्यात यावी. जसे अतिरेकी, बलात्कार करणारे, खुन करणारे, राजद्रोह, देशद्रोह करणारे यांना ही शिक्षा देण्यात यावी असे वाटते. तेव्हा मृत्युदंडाची किंवा देहदंडाची शिक्षा नसणे हे योग्य दिसत नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१. फाशीच्या शिक्षेसंबंधी अनुकूल मते स्पष्ट करा.

२. फाशीच्या शिक्षेसंबंधी प्रतिकुल मते स्पष्ट करा.

## ४.५ देहान्त (मृत्युदंडाच्या) शिक्षेचे समर्थन

इतिहासात फार प्राचीन कालापासून देहान्ताच्या शिक्षेची पद्धत सुरु आहे. केवळ एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचा जीव घेतला एवढ्या एकाच कारणावरुन ही शिक्षा दिली जाई असे नाही. राजद्रोह, व्यभिचार अशा भिन्न-भिन्न प्रकारच्या गुन्ह्यांबद्दल या शिक्षेस मान्यता होती. १८ व्या शतकाच्या आसपास या शिक्षेला विरोध होऊ लागला. इटालियन तत्त्वचिंतक सिसेरे बॅक्करिआ याने १७६४ मध्ये शिक्षेच्या या प्रकाराबद्दल विरोध दर्शविणारे एक पुस्तक लिहिले. व्होल्टेअर, ह्यूम व ॲडम स्मिथ यांनीही देहान्ताच्या शिक्षेविरुद्ध चळवळीत भाग घेतला.

कांटच्या प्रतिशोध उपपत्तीचा (Retributive Theory) देहान्ताच्या शिक्षेला विरोध असणार नाही. त्या उपपत्तीच्या मते ती शिक्षा गुन्हागाराची कमाई आहे. ती आपण नाकारणे हा समाजाचा गुन्हा होईल. ही समाजाची अनैतिकता ठरेल. समाजमान्य न्यायोचित रीतीने ती शिक्षा माफ केली गेली तर मात्र या उपपत्तीचा त्याला विरोध असणार नाही. अपराध्यास शासन व्हावे आणि गुन्हेगारांना जबर बसावी या हेतूने शिक्षा देण्याला निवारणवाद्यांचा विरोध नाही. अपराध्यास शासन व्हावे आणि भावी गुन्हेगारांना जरब बसावी या हेतूने शिक्षा देण्याला निवारणवाद्यांचा विरोध नाही. विरोध असतो तो जिवे मारण्याला. अपराध्यास पुरेसा पश्चाताप होण्यास त्याला आपण संधी देत नाही. तसा पुरेसा पश्चाताप होऊन त्या प्रकारचा गुन्हा तो परत करणार नाही अशी योग्य अधिकाऱ्यांची खात्री झाल्यास त्या अपराधकर्त्यांची देहान्ताची शिक्षा रद्द करावी असे सुधारणावादी उपपत्तीचे प्रतिपादन असेल.

शिक्षेला विरोध करणाऱ्या निवारणवादी किंवा सुधारणावादी तत्वचिंतकांचे म्हणणे असते की, शासनाने एका व्यक्तीला देहान्ताची शिक्षा करणे हा मानवी व्यक्तीत्वाच्या अधिकाराचा भंग आहे. दुसऱ्या बाजुची प्रतिशोध उपपत्तीचे समर्थक म्हणतात की, सर्वसामान्य न्यायाचा हा प्रश्न आहे. खुन्याला जिवंत सोडणे हा खून झालेल्या व्यक्तीवर आणि तिच्या आप्तेष्ट स्वकीयांवर अन्याय नाही का? जपान, अमेरिका सोडून इतर बहुतेक सर्व विकसित राष्ट्रांचा त्या शिक्षेस विरोध आहे. तर भारतासह इतर विकसनशील देशात त्या शिक्षेस मान्यता आहे.

पूर्वी  शिक्षा भर रस्त्यात अनेकांच्या नजरेस पडावी अशा रीतीने देत असत. आता एकतर तुरुगांच्या आवारात फाशी देतात किंवा सुधारलेल्या देशांतून विषारी इंजेक्शनने किंवा विजेच्या धक्याने गुन्हेगार व्यक्तीचा मृत्यु घडवून आणतात. पण जसजसा उदारमतवादी शिक्षणाचा प्रसार होईल, निरोगी लोकशाहीची प्रगती होईल तसतशी सूडाच्या भावनेची तीव्रता कमी होईल. आणि दुसऱ्या माणसाची हत्या करावी इतक्या अंशापर्यंत ती चढणार नाही. धार्मिक कडवेपणाने निरपराध लोकांच्या हत्या होत राहतील. जर धर्माचे संस्थापक अथवा संघटनात्मक रुप बदलून आपण वैयक्तिक स्वरुप देऊ शकू तर धार्मिक दंगलीही संपतील.

शिक्षेची निवारणवादी उपपत्ती लक्षात घेतली तर, दुसऱ्या माणसाचा जीव घेण्याइतके ज्याचे मन सूडबुद्धिने व्यापलेले आहे तो या अपराधाचे परिणाम काय होतील याचा विचारच करु शकत नाही. 'मी मेलो तरी बेहत्तर पण तूझा काटा काढेन.' असे स्वतःशी म्हणतच तो आपल्या विरोधकाची हत्या करतो. लोभासारख्या इतर भावना प्रबळ होऊन जेव्हा माणूस सदोष मनुष्यवधाची कृती करु पाहतो अशा थोड्या वेळी आपण विचार केला किंवा त्याने विचार केला तर फाशी जाऊ या भीतीने तो हत्येपासून परावृत्त होईल. त्याने गुन्हा केला म्हणून त्याला आपण शिक्षा नाकारणे हा समाजाचा गुन्हा होईल. ती समाजाची अनैतिकता ठरेल.

**आपली प्रगती तपासा.**

१. देहान्त (मृत्युदंडाच्या) शिक्षेचे समर्थन स्पष्ट करा.

## ८.६ सारांश

समाजामध्ये विविध समस्या अस्तित्वात असलेल्या दिसून येतात. अशा समस्याना सामाजिक समस्या असे म्हणतात. कारण त्यांचे परिणाम संपूर्ण सामाजिक स्वास्थ्यावर होत असतो. या सामाजिक समस्यांपैकी एक महत्वाची समस्या म्हणजे गुन्हेगारीची समस्या होय. व्यक्तीच्या हातून वेगवेगळ्या परिस्थितीत गुन्हे घडत असतात. काही व्यक्तींच्या हातून नकळत गुन्हा घडतो तर काही व्यक्ती जाणूनबुजून गुन्हा करतात. अशा परिस्थितीत प्रश्न असा निर्माण होतो की, खरा गुन्हेगार ओळखायचा कसा? कारण नकळत / अज्ञानाने गुन्हेगार किंवा निरपराध नसलेल्या व्यक्तीला देखील शिक्षा होऊ शकते.

दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो की, गुन्हेगाराला शिक्षा करावी की सुधारण्याची संधी द्यावी ? यावर असे म्हणता येईल की सर्वच गुन्हेगारांकडून नकळत गुन्हे घडत नाहीत त्यामुळे जे गुन्हेगार जाणूनबुजून पून्हा-पून्हा गुन्हे करतात त्यांना शिक्षा देणे हाच पर्याय उरतो. गुन्हेगाराला शिक्षा देण्याचे उद्देश हे भिन्न असल्याने या संदर्भात शिक्षेच्या तीन उपपत्या सांगितल्या आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की, शिक्षेविषयक स्पष्ट करण्यात आलेल्या तीनही उपपत्या समाजामध्ये उपयुक्त असून त्या लागू पडतात याचे कारण आज समाजात वरील तीनही उपपत्तीत बसणाऱ्या गुन्हेगार व्यक्ती दिसून येतात. कारण त्यांना शिक्षा देण्यासाठी उद्देश भिन्न आहेत.

## ४.८ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) शिक्षा म्हणजे काय ? शिक्षेच्या उपपत्ती थोडक्यात विशद करा.
२) शिक्षा म्हणजे काय ? शिक्षेची निवारणवादी व प्रतिशोध उपपत्ती सविस्तर स्पष्ट करा.
३) शिक्षा म्हणजे काय ?शिक्षेची प्रतिशोध व सुधारणावादी उपपत्ती स्पष्ट करा.
४) शिक्षा म्हणजे काय ? शिक्षेची निवारणवादा व सुधारणावादी उपपत्ती स्पष्ट करा.
५) शिक्षेच्या विविध उपपत्त्या थोडक्यात स्पष्ट करा.
६) फाशीची, मृत्यूदंडाची शिक्षा द्यावी का नको याविषयी तुमचे मंत मांडा.
७) फाशीच्या शिक्षेसंबंधी अनुकूल व प्रतिकूल मते स्पष्ट करा.
८) टिपा लिहा
  १) शिक्षेची निवारणवादी उपपत्ती
  २) शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती
  ३) शिक्षेची सुधारणावादी उपपत्ती
  ४) फाशीच्या शिक्षेसंबंधी अनुकूल मते
  ५) फाशीच्या शिक्षेसंबंधी प्रतिकूल मते

❖❖❖❖